REGISTERED N No. 5

वर्गणी बद्दल

वर्षाची आगाऊ ५ टपालशील ०।१

सहामाही „ ३ „ ०।८

साल अखेर „ ७ „ १ ०।८

किरकोळ अंकास ............................०।३

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस......... ०।१ ०।१

दुसरे खेपेस ..... ..... ....०।१

SUBSCRIPTION.

Annual in advance 5 Postage 1

Annual in arrears 7 „ 1 Rs 8

Six monthly......... 3 ..................

Single copy ..................................

Advertisement

Below 10 lines ......

Perline over 10 ......

Repetition Per line....


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXVI AKOLA MONDAY 2 JUNE 1902 NO 21

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २ माहे जून सन १९०२ इ० अंक २१




## खरदी करा !

### रास्कोपचीं थेट व खरीं पेटंट वाचेस

### नक्कली मालास भुलून पैसे खर्चु नका !!!

रेल्वेच्या व इतर अनजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमी रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून मुलखांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्यांना आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅाक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### गोल्ड ५ वर्षाच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१९०

१९ „ हंटिंग, नकशीचे ............२९०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८

१९ „ सेकंद कांट्यासह............२०

१९ „ मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ..................२२

१९ „ हाफ हंटिंगचें..................२०

१९ „ हंटिंगचें .......................२०

१४ „ रिस्ट वॉच ......................२०

### इनामेल्ड ३ वर्षाच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस.............. २०

१९ „ हंटिंग.............................२०

१४ „ रिस्टवॉच..........................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षाच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ..............३०

१४ „ हंटिंग..............................३९

१८ व १९ „ ओपनफेस...............३०

१९ „ सेकंद कांट्यासह ..............३२

१९ „ मध्यमार्गी सेकंद कांटा असलेलें ..................३९

१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३९

१९ „ हंटिंग ......................... ४९

लेडिज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपये ६९–२०० पर्यंत.

सी. हनीगर आणि कंपनी,

ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.

९ हार्नबी रोड, मुंबई.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.


## नोटीस

रा. रामचंद्र व सुंदेत ऊर्फ बाबुराव कोल्हटकर मुक्काम उमरावती यास खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझे शेत डापकी ता. बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ३७ हें तुमचे ताब्यांत कोर्ट मार्फत दिलें होतें त्याची मुदत सन १३०८ चे एप्रील सन १८९९ इसवी महिन्यात संपली असोन सदर्हू शेत तुह्मी सन १३०९ व सन १३१० असे दोन सालचीं दोन पीकें विनाकारण ज्यास्त खाल्लीं. त्याचे खापीत्याबद्दल दोन सालचे १५० रुपये तुह्मास उमरावती येथें मी मागण्यास माहे एप्रिल सन १९०१ इसवी महिन्यांत आलो असतां तुह्मी शेताचा कबजा सोडून शेत माझे स्वाधीन केले आणि नफ्याचे सदरील रुपये मजला माहे मार्च सन १९०२ इसवी महिन्यात देण्याचे कबूल केले त्या प्रमाणे तुह्मी पाठविले नाहींत करितां ही नोटीस पावल्या दिवसापासून ८ दिवसाचे आंत नोटिसीचे खर्चा सुद्धां रुपये देऊन माझी पावती घ्यावी. या प्रमाणें न केल्यास फिर्याद करून रुपये घेतले जातील कळावे ता. २६ माह मे सन १९०२

सही ( उर्दूत )

सय्यद इस्माइल वल्लद सय्यद आजम राहणार आकोला.

## मोरोपंत

### निवडक वेंचे.

( मागील अंकावरून पुढें चालू )

कर्ण पर्व

कर्णाच्या मृत्यूची वार्ता ऐकून धृतराष्ट्रानें केलेला शोक.

अ. १

धृतराष्ट्राति कथाया,
संजय तें वृत्त सद्र्थावरुनी
जाय कुरुक्षेत्राहून,
रात्रौ त्या गजपुरा त्वरा करुनी १
सूत ह्मणे गा राया !,
तव अपराधेंदुर्गाति में आलें
कौरव–वृत्त–फळ तुला,
द्याया आलों सुफळ कीं झालें २७
सावध हो धीर धरीं,
होणार प्राप्त जें जगा काळीं
सुखदुःख बहु विधिनें,
लिहिलें पहिलेंचि कीं असे भाळीं २८
सुखदुःख प्राप्तीनें,
कवि हर्षविषाद–लेश न धरीती
वर्षेवर्षीं जेंवि न,
वृद्धिक्षय सिंधु हेचि सुधे रीती २९

अ. २

अतुल पराक्रम केला,
पारे वधिला अर्जुनें रणीं कर्ण
मी आलों या वृत्ते,
संतप्त करावया तुझे कर्ण १९

अ. ३

कर्ण–क्षय–वार्ता–विष–
धारा कर्णीं जया क्षणीं पडली
त्याच क्षणीं क्षिति तळीं,
क्षितिप तनुहि काळजी मनीं मडली १
राजा मूर्छित पडतां,
गांधारीसह तिच्या सुना रडती
उरीकुट–शोकभरा,
कुररी ज्या एकदाचि आरडती २

अ. ५

स्वजय-प्रासादाचे.
पडले मोडोनि भीष्म गुरु स्तंभ
शोक भरें मन मूर्छा,
आली क्षण मात्र संजया पाव १४

अ. ६

इष्ट–विरह–शोकोत्थित,
दुःसह मूर्छेत लोटली घटिका
कर्ण-वध क्षितिपाच्या,
चित्तास गमे क्षणक्षणीं कटिका १
शोषण जल–राशीचें,
संस्पर्शण जेंवि रत्न–सांनूचें
अद्भुत धैर्ये मरण गमे,
कीं गगनाहूनि पतन भानूचें २
नृपति बहु विलाप करी,
सूतासि ह्मणे अहा! कसें घडलें
बा संजया ! अकस्मात,
रविबिंब गळोनि भूतळीं पडलें ३
( कर्णाच्या अद्भुत पराक्रमाचें वर्णन करून धृतराष्ट्र भूपति संजयास ह्मणतो. )
तो वधिला पाडुसुतें,
कांति–जित–स्वर्ण–वर्ण कर्ण रणीं
शोकार्णवीं बुडालों.
झालों हत-पुत्रमित्र वृद्धपणीं १४
पावक-कुंडांत शिरूं!
कीं सेवूं संजया महाविष मी
किंवा चढों पडाया,
मरणार्थ महाद्रिच्या शिरीं विषमीं १६
संजय ह्मणे महर्षि–
प्रतिमा! विव्हल न हो विषादानें
मरण अकालीं न घडे,
भृगुपातें पावकें विषादानें १७

वि. आ. का.

४ कर्णाचे मृत्यूची वार्ता हीच विषधार
५ शोकाचा ज्यांनीं अंगीकार केला ७
६ पक्षिविशेष. ७ राजमंदिर. ८ स्वजन
विरह शोकापासून उत्पन्न झालेलें

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ११ शके १८२४

## राष्ट्रीय सभा

या संस्थेचा अठरावा वार्षिक समारंभ अमदाबादेस होणार असल्या कारणानें या निमित्त आमच्या गुर्जर बंधूंनीं अगदीं कडेकोट तयारी चालविली आहे. या प्रांतांत दुष्काळाचा तडाखा चालू आहे तरी त्याला न जुमानतां व्यवस्थापक मंडळीनें आपलीं कामें मोठ्या नेटानें चालविलीं आहेत. सभेचें स्थळ निश्चित झालेंच आहे. वर्गणीचे आंकडे १२ हजार रुपयांवर पडले आहेत. राष्ट्र सेवेची उत्कंठा पाहून तिकडील मंडळींचा धन्यवाद केल्या वांचून राहवत नाहीं. राष्ट्र सेवेचें वारें अंगांत शिरलें आहे ही आनंदाची गोष्ट खरी पण राजकीय प्रकरणांत अंधळी कोशिंबीरच वारंवार होत असते आणि या खेळांत नेटिवांचेच डोळे बांधण्याची पाळी नेहमीं येते. या ब्रिटिश सत्तेचा सूर्य चांगला प्रकाश देतो पण आमच्या लोकांचे डोळे बांधलेले असतात व ते कोणी सोडूं देत नाहींत या मुळें त्या तमोमय प्रकाशाचा कांहींच स्पष्ट लाभ आमच्या लोकांस मिळत नाहीं. अठरा वर्षांचा अनुभव सांगतो कीं, ब्रिटिश साम्राज्या खालीं प्रजेचे हक्क तिला मिळण्याला फार प्रयास पडतात. आमच्या राष्ट्रीय सभेच्या मार्गांत निराशेचे निवडुंग फार लागतात. हा बिकट मार्ग संपून गुलाबाचा ताटवा डोळ्याला दिसेल तो सुदिन खरा! राष्ट्रीय सभेनें देशभक्तीचा एक उत्तम धडा शिकविला आहे. प्रयत्नाची कांस बळकट धरावी आणि निराशेला जुमानूं नये असें आह्मांस पक्कें समजून चुकलें आहे.

राष्ट्रीय सभेला आपला कार्यक्रमच बदलला पाहिजे. सरकारचा उंबरठा झिजविण्या पेक्षां स्वतांच कंबर बांधली पाहिजे. चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं असा आजकालचा दिवस आहे. पराक्रमाचा जिना आपण चढला पाहिजे. सरकाराला अर्ज करीत बसण्या पेक्षां सरकाराच्या संरक्षणाखालींच आपल्याला ज्या गोष्टी पाहिजेत त्या आपण साध्य करून घेतल्या पाहिजेत. सर्व सद्गुण जसे कांचनाबरोबर फिरते राहतात तद्वत् राष्ट्राच्या सांपत्तिक उन्नतीबरोबरच प्रजेचे सर्व हक्क सरकार पाठवून देत असते, आपल्या देशाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याच्या उपायाकडे आपणच अहर्निश लागलें पाहिजे. राष्ट्रीय सभेचा नवा उपदेश असाच आहे. याच धोरणानें औद्योगिक प्रदर्शनें या संस्थेला जोडलीं आहेत. सरकारद्वारा आमची निराशा वारंवार होते आणि तीच सांगते कीं आमच्या पाहिजे, आणि ही शक्ति येण्यास औद्योगिक उन्नतीच मुख्य कारण आहे असें सर्व सुधारलेल्या राष्ट्रांचा इतिहास सांगतो. राष्ट्रीय सभेच्या निर्जीव ठरावांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. विलायतचा व्यापारी संबंध दूर होईल तितका अवश्य दूर झाला पाहिजे. आपल्या देशावरच आपली सर्व भिस्त पाहिजे. अमदाबादच्या राष्ट्रीय सभेनें असा निराळा मार्ग घालून दिला पाहिजे. आणि राज्यारोहणाच्या उत्सवाच्या सुमुहूर्तावर आपण हा नवा संकल्प केला पाहिजे. राष्ट्रीय महत्वाच्या गोष्टींत थोडाबहुत एककल्लीपणाच लागतो. मोठा निर्धार पाहिजे, आणि जे राज्यकर्ते आपली हेळसांड व निराशा करितात त्यांचे नांवगांवही विसरलें पाहिजे. असा अलिप्तपणा धरल्या वांचून आपलेपणा वाटत नाहीं आणि त्याचा खरा महिमाही कळत नाहीं.

---

दिल्लीचा दरबार १९०३ सालच्या १ ले तारखेस भरणार आहे आणि या दरबाराच्या मोठ्या उत्सवाला सर्वांस जातां यावें ह्मणून राष्ट्रीय सभेच्या बैठकीला प्रारंभ डिसेंबरच्या तारीख २९ ला होऊन तिसऱ्या दिवशीं सभेचें काम संपूर्ण होईल. या व्यवस्थेनें राष्ट्रीय सभा व दिल्लीचा दरबार हे दोन्ही समारंभ सुखानें सर्वजणांस पाहण्यास मिळतील. यंदाच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्या विषयीं लार्ड स्टानले आफ् आलडर्ली यांस विनंती करावी असा पुष्कळांचा विचार आहे.

---

वऱ्हाडांत ८ सिव्हिल हास्पिटल्स व २९ धर्मार्थ दवाखानें आहेत. सन १८९९, १९००, व १९०१ या तीन वर्षांचा रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे आणि या त्रैवार्षिक रिपोर्टावरून कळतें कीं दवाखान्यांत औषध घेण्यासाठीं येऊन राहिलेल्या दुखणेकऱ्यांची संख्या ४९८३ असून बाहेरच्या बाहेर औषधी नेणाऱ्या रोग्यांची संख्या १,६०,९७३ आहे. अखेरच्या रोग्यांची संख्या फार कमी आहे. असें होण्याला मुख्य कारण असें घडलें कीं गेल्या दुष्काळांत पुष्कळसे लोक गिट्टी फोडण्याच्या कारखान्यात व कंगालखान्यांत जमले होते आणि ह्मणून धर्मार्थ दवाखान्याकडे जाणाऱ्या लोकांची संख्या पुष्कळच उतरली. एकंदर ११२६९ रोग्यांवर शस्त्रक्रियेचे प्रयोग करण्यांत आले आणि त्यां पैकीं पुष्कळजणांस चांगला आराम पडला. इतक्या रोग्यांपैकीं फक्त २३ इसम मृत्युमुखीं पडले. शस्त्रक्रियेच्या प्रयोगांत डाक्टर रो साहेबांचा गुण वर्णन करण्यासारखा आहे; त्यांच्या खालो खाल बुलडाण्याचे सिव्हिल सर्जन डाक्टर मारिसन यांचा लौकिक आहे. चांदूर बझारचे हास्पिटल असिस्टंट मि. अबदूल अझीजबेग यांचीहि वाखाणणी चांगल्या शस्त्रक्रियेबद्दल करण्यांत आली आहे.

क्विनीनच्या पुड्या पोस्ट आफिसांतून विकण्याची सोय लोकांस चांगली आवडते असें दिसतें. वऱ्हाड प्रांतांत १८७ पोस्ट अशा १०२ पुड्या एका पाकिटांत असतात अशीं पाकिटें ३१२८ गुदस्तां विकलीं गेलीं आणि उत्पन्न ३९१८ रुपये ८ आणे ३ पै झालें.

धर्मार्थ दवाखान्यांतून जे सुखवस्तु लोक औषधी नेतात त्यांच्या कडून औषधांची किंमत ह्मणून निराळी वार्षिक फी ६ रुपये वसूल करण्यांत येत असते. हा फीचा दर खामगांवच्या दवाखान्याला इतके दिवस लागूं नव्हता पण तो गुदस्ताच्या आगष्ट महिन्या पासून लागूं करण्यांत आला आहे. ही फीची रक्कम ह्मणजे एका प्रकारचा दंड आहे, सर्व बाजूंनीं सरकार रयतेला पिळीत आहे आणि त्या पैकींच ही औषधाची फी आहे असें ह्मणतां येईल.

## आर्यवैद्यक

सरकारी दवाखान्यांपासून लाभा पेक्षां हानि मोठी आहे. विलायती औषधींचा खप वाढला आणि देशी औषधींचा ऱ्हास होत चालला. इंग्रजी वैद्यकाला राजाश्रय आहे ह्मणून सर्वत्र त्याचीच अभिवृद्धि होत आहे. देशी वैद्यकाला कोठेंच आश्रय नाहीं. देशी वैद्यकाचा अभ्यासही मलिन होत चालला असून त्या विद्येची अवहेलना मोठी होत आहे. औषधी तयार करण्याची देशी विद्या लोपल्या सारखी झाली आहे. देशी विद्या पाठशाळांत देखील चालत नाहीं. असा हा आपत्काल देशी वैद्यका संबंधानें आलेला आहे. हा विनाशकाळ पाहून मनाला मोठा झटका बसतो. आमचे लोक इंग्रजी औषधीनें जगण्या पेक्षां ते मरतील तर त्यांच्या मरणानें थोडीशी देशसेवा घडेल असें एक वेळ आमचा एक विद्वान मित्र बोलला. हा त्याचा उद्गार ध्यानांत धरण्या सारखा आहे. देशी वैद्यकाला अग्रस्थान देऊन देशी वैद्याशिवाय औषधी घ्यावयाची नाहीं असा निश्चय आमच्या लोकांनीं केला पाहिजे. देशी औषध स्वल्प खर्चाचें असतें. पण तें कमी गुणकारी नसतें. इंग्रजीच्या पूर्वीं देशी वैद्यकावरच माणसांची रोगमुक्तता होत असे. पण काल इतका बदलला आहे कीं विलायती औषधी शिवाय आमच्या लोकांची प्राणधारणाच नीट होत नाहीं. राष्ट्रीय सभेनें एखादा कंठाळी ठराव कागदावर लिहीत बसण्या पेक्षां देशी वैद्यकाविषयीं लोकामध्यें पूज्यभाव उत्पन्न करावा आणि विलायती औषधींचा उपयोग न करण्याविषयीं लोकांच्या कडून शपथ घेववावी.

देशी वैद्यक अस्तास गेलें इतकेंच नाहीं तर त्याच्या बरोबर औषधिक वनस्पतींचें ज्ञानही लयास पोचलें. वनस्पतींच्या शास्त्रांचें इंग्रजी पुस्तक पाठ येतें व इत्यादिन नाममाळा मुखोद्गत आहे पण सामान्य वनस्पतींचीं मराठी नांवें देखील ठाऊक नसतात, असा हा प्रस्तुतचा अभ्यासक्रम आहे. आमच्या पैकीं विद्वानांस एखाद्या बगिच्यांतील सामान्य फुलझाडें व फळझाडें ओळखतां येतील असा देखील आह्मांस भरंवसा नाहीं. वनस्पतीविषयीं आमचे पुरातन ग्रंथ अतोनात माहिती सांगतात पण ते ग्रंथ जर उधईच्या स्वाधीन केले व ते निरुपयोगी ह्मणून फेंकून

दृष्टांनें आमचें वनस्पतीशास्त्र मोठें आहे पण हें शास्त्र त्यांचें वाचन करणाऱ्यांसच फलदायी होईल. इंग्रजी विद्येचा अपकार दूर करण्याला आपण आपली देशी विद्या उर्जित दशेला आणिली पाहिजे. देशी वैद्यकाचा अभिमान जागृत करण्याला निराळा मुहूर्त पाहण्याला अवसर आतां राहिला नाहीं.

---

### गोड विचार

राजाला वृक्षाची उपमा देत असतात. वृक्ष जसा तीव्र ताप सहन करितो आणि आश्रितांस आपल्या शीतल छायेनें संतोषवितो तद्वत् राजानेंहि आपलें वर्तन ठेवावें अशी कविश्रेष्ठ कालिदासाची आज्ञा आहे. ही आज्ञा आमचे चक्रवर्ती एडवर्ड महाराज अक्षरशः खरी करून दाखवितील असा आह्मांस पक्का भरंवसा आहे. प्रस्तुत एडवर्ड महाराज चालूं २६ साव्या तारखेच्या सुमुहूर्तावर आपल्या परम भाग्यशाली मातोश्रीच्या सिंहासनावर विराजमान होणार आहेत आणि त्या राज्यारोहणाचा आनंदोत्सव कसा बहुगुणित करावा या संबंधानें प्रजाजन नाना युक्त्या योजीत आहेत. या युक्ती पैकीं आह्मांस एक युक्ति फार आवडली, आणि ती वरील वृक्षाच्या उपमेला अत्युत्तम शोभते. चक्रवर्ती महाराजांच्या नांवानें नवे छायावृक्ष लावावे असा हा विचार आहे. वृक्षारोपणाची कल्पना फार जुनी आहे. पण वरील प्रसंगाच्या अनुरोधानें आह्मी या कल्पनेला विशेष महत्व देतो. ही कल्पना न्यूझीलंड वगैरे कॉलनींतून प्रथम निघाली व तिचें अनुकरण मद्रासेकडील बहुतेक सार्वजनिक संस्था करणार आहेत. वृक्षवाटिका उभारण्याची ही गोष्ट आह्मी आमच्या प्रांतांतील सार्वजनिक संस्थांस मुद्दाम सुचवितो. जसजसे वृक्ष वाढत जातील, आपली घनदाट छाया पसरतील, आणि पुष्पें व फळें यांनीं पांथस्थांस आल्हाद देतील तसतसें या राज्यारोहणाचें स्मरण आनंदानें पुनःपुनः होत जाईल. वृक्षारोपणाची कल्पना सर्वांसच आवडेल आणि तिची परिपूर्ती प्रत्यक्ष वृक्षदर्शनानें होईल अशी आह्मांस बळकट आशा आहे.

आह्मी वर नवीन वृक्ष लावण्याची सूचना केली आहे पण तिच्या स्वीकाराबद्दल मनांत मोठी शंका येते. हल्लींच्या दारिद्र्यानें आमच्या कल्पनाहि दरिद्री झाल्या आहेत. दारिद्र्याचे चष्मे दृष्टी फार आकुंचित करितात. आणि प्रत्यक्ष तात्कालिक फायद्या पलीकडे दृष्टीच पोचत नाहीं. जीवनाला जशा आहारादि गोष्टी अत्यावश्यक आहेत तशा विहारादि गोष्टी वाटत नाहींतशा ह्मारख्या आहेत. आमच्या म्युनसिपल संस्था इतक्या निकार बनल्या आहेत कीं त्यांची क्रिया पुष्कळशा चांगल्या चांगल्या गोष्टींचा विध्वंस मात्र करिते. सुंदर, रमणीय बागबगीचा हातून नवीन तर होणेंच नाहीं, पण जशा जुन्या लाभलेल्या गोष्टी मोडून मात्र टाकीत आहेत. आकोल्या सारख्या शहरीं सार्वजनिक बगीचा नसावा ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे. बाग बगीचा सारखीं रम्य स्थळें आवश्यक नाहींत असा आमच्या म्युनसिपालिटीचा समज दि-

आह्मी समजतो कीं, सार्वजनिक आरोग्य-रक्षणाला हा एक क्षयरोगच लागला आहे. आमच्या शहाण्या व समजूतदार म्युनसिपल सभासदांच्या कृपण व कोत्या दृष्टी बद्दल आह्मास मोठा खेद वाटतो. आणि अशाच विचारांच्या प्रसाराने वरिष्ट अधिकाऱ्यांच्या समजुतीहि मळस्याच बनत चालल्या आहेत. अशा या स्थितींत वृक्ष लावण्याची आमची सूचना कितपत मान्य होईल याची वानवाच आहे. हल्लींचे विचार बदलल्याशिवाय किंबहुना, प्रस्तुत पुढें सरसा वलेली सार्वजनिक मंडळी घरीं बसल्या शिवाय कोणत्याच उदात्त विचारांना आश्रय मिळेल असें आह्मांस वाटत नाहीं.

---

फ्याक्टरीमुळें सर्पण फार महाग झालें आहे. इंजिनाकडे जळाऊ लांकडांचा जो उपयोग करितात तो बंद करण्यापर्यंत मजल पोचली आहे. दगडी कोळसा इंजिनाला चालतो आणि तोच इंजिनांत जाळावा असा सरकारी कायदा झाला पाहिजे असें वाटूं लागलें आहे. प्रस्तुत बाभळीच्या झाडांची व तसेंच ज्या लांकडांचा कोळसा टिकाऊ व जोमदार असतो त्या लांकडाच्या झाडांची तोडणी फार सपाट्यानें चालत असते. हीं इंजिनें फारच लकडी घेतात आणि त्यामुळें इंधन अती महाग झालें आहे. लोकांची मोठी गैरसोय होते इतकेंच नाहीं तर प्रस्तुतच्या क्रमानें जंगलांत बाभळीचीं किंवा तशींच इतर झाडें शिल्लक राहणार नाहींत अशी भिती आहे. या प्रांतांत जळाऊ लांकूड जितकें उपलब्ध आहे त्या पेक्षां फ्याक्टरीकडे लांकडाचा पुरवठा मोठा लागतो. जों पर्यंत दगडी कोळशापेक्षां जळाऊ लांकडें स्वस्त पडतात तों पर्यंत इंजिनांत लांकडेंच जाळतील ही गोष्ट निश्चित दिसते. फ्याक्टरींतून दगडी कोळसा उपयोगांत आणण्या विषयीं विशेष सक्ती करण्याचा काळ समीप आला आहे. नित्याच्या गृहकार्यांत दगडी कोळसा इंधनाकडे चांगला चालत नाहीं. दगडी कोळशाची घाण मोठी असते, व या कोळशानें स्वयंपाक चांगलासा होत नाहीं. जंगलखात्याकडील अधिकारीही फ्याक्टरींत जाणाऱ्या लांकडावर कर अधिक बसवितील तर बरें होईल. सारांश, दगडी कोळसा इंजिनाकडे वापरण्यांत येईल अशी तजवीज झाली पाहिजे.

---

## सुभाषितें

सुभाषितें चांगलीं मुखोद्गत येणें हा एक उत्तम गुण होय. या गुणाला अलीकडच्या अभ्यासक्रमांत योग्य स्थान दिलें जात नाहीं अशी आमची समजूत आहे. विद्या फार झाल्या आहेत या मुळें या विद्यार्थीहि होतां होईल तितक्या पुस्तकांतच संग्रहित ठेवितात. आलीकडे घोकंपट्टीकडे जितका जोर दिला जातो तितका पाठांतराकडे दिला जात नाहीं. घोकंपट्टीहून पाठांतर निराळें आहे. घोकंपट्टी ह्मणजे परीक्षेच्या कार्यापुरती केलेली तयारी होय. अर्थात् ही तयारी कार्याच्या समाप्ती बरोबरच समाप्त होते. पाठांतराची क्रिया अगदीं उलट आहे. तिनें स्मरणशक्ति उल्लसित होते. घोकंपट्टी प्रमाणें ती बुद्धीला झालेंलें सुंदर काव्य, किंवा उदात्त सुभाषितें यांच्यांत अशी कांहीं अजब शक्ती असते कीं, त्या मुळें बुद्धि व स्मरण शक्ती या स्फुरण पावतात. आणि पुनः पुनः पठणानें सुभाषितांचा संस्कार मोठा उत्कृष्ट होत असतो सुभाषितांची उजळणी व्हावी ह्मणून मंडी करीत असतात. या मंडीचा वर्तमानकाळीं लोपच झाला आहे. सुभाषित ह्मणजे कवीच्या कल्पनेचा उत्कृष्ठ फोटो होय. शुद्ध सृष्टीचे प्रतिबिंब कवी जे कवी त्याच्या अनुभवाचें जें सार तें सुभाषितांतून ओतलेलें असतें. संस्कृत, मराठी व इंग्रजी या तिन्ही भाषांत सुभाषितांचा संग्रह फार मोठा आहे. या भांडारांतील रत्नमाला आपण वेंचून घेऊं तितक्या थोड्याच. सुभाषितें हीं एकांत स्थळीं तर आपले जिवलग मित्र होतात. सुभाषितांचा जितका अभ्यास करावा तितका त्यांचा आमोद अधिकच मिळतो. प्रस्तुतच्या अभ्यास क्रमामध्यें तोंडपाठ करण्याचा कांहीं भाग असतो तो फारच थोडा असतो. आणि सालोसाल पाठ होणाऱ्या सुभाषितांची पुनरावृत्ती कधींच होत नाहीं.

हा दोष दूर करण्या विषयीं आमचे डायरेक्टर साहेब प्रयत्न करतील आणि सर्वच विद्या पुस्तकांत राहूं देण्यापेक्षां सुभाषितांच्या द्वारें विद्यार्थ्यांची बुद्धि व स्मरण हीं विशेष प्रचलित करितील अशी आह्मांस उमेद आहे. आलीकडील विद्यार्थ्यांमध्यें हा दोष विशेष दिसतो कीं आदल्या दिवशींच्या तात्कालिक उजळणी शिवाय त्यास कोणत्याच प्रश्नाचें नीटपणें उत्तर देववत नाहीं. पोपटी विद्येचा बीमोड होण्याला सुभाषितांचें पाठांतर एक उत्कृष्ट साधन होईल असा आमच्या कांहीं विद्वान् मित्रांचा अभिप्राय आहे.

---

The Berar Samachar

MONDAY JUNE 2 1902

The Boer War is a great political blunder, whereas some statesmen argue otherwise. They hold that the war is the inevitable result of the thirst for empire. Cecil Rhodes was called the empire-builder in South Africa. The issues of the war are now of the greatest importance. In case of victory, there is no great renown for the successes in the war: but in view of the reverses and defeats, the whole prestige of the British Nation is at stake and the British Government are prepared to see the bitter end of the battle. The Boers might as well refuse the terms of peace and the English Nation has gone so far in the matter that it cannot, with decency and honor, retrace its steps. The policy of giving a final and decisive battle is the only alternative left for the British people. Lord Salisbury has very eloquently described in the following para the present situation in which both fighting parties have thrown themselves. His lordship observes to the following effect:—

"They had had a great and serious war. It was frightful to reflect upon the human misery, sorrow & privation which had been involved; but allowing for that most just and necessary as had been their sacrifices, the power, the prestige, the influence, and the magic effect of their great empire was now more potent, more efficient more admirable than it was before. We had suffered, but we had greatly won. But it was impossible not to feel that the efforts of the people of this country had not been worthily recognised by those for whom they had sacrificed so much. He had hoped that this matter of the South African war might have been kept largely out of the bounds of party conflict, and that, with the highest interest of their nation in issue, men would have forborne to use the passing events of the day for the somewhat squalid purpose of injuring their opponents. He frankly recognised that among many of their opponents a feeling of that kind had shown itself and they had to thank them for recognising that there was a duty superior to party in such crisis as that through which we had passed; yet it was impossible not to feel that the Government had not entirely enjoyed a judicial treatment in reference to the war or in reference to the duties that had been imposed upon us. Men would not recognise what they would have recognised in any other conflict that in defence of the interest of the empire it was necessary for the Government to overlook and override all minor considerations.

In the rights we claim, in the policy we intend to carry out, we are exactly where we were. We cannot afford, after such terrible sacrifices, not only of treasure but of men, after exertions unexampled in our history, to allow things to slide back into a position where it will be in the power of the enemy again, when the opportunity suits him, and the chance is favourable to him, to renew again the issue that we have fought for these last three years.

Matters have changed, were changing. There was slowly rising out of the sea an empire connected by no territorial contiguity, relying solely upon its naval defence, and having behind it the feelings and the affections of some of the most vehement races in the world. There were forces in the world much more powerful than used to work; the future destinies of our empire depended political society, and it was with them that the power would rest of evil or for good. If they acted up to the call of their high destiny their mission would be remembered as the greatest blessing which the empire had been able to obtain."

The proposal of peace will be finally accepted or refused in the course of this day. Let us await, with anxiety, the result of the peace negotiations.

The war leaves a sound lesson to the Indian people as well as to the Sovereign rulers of the land. Let us learn that a war between unequals results in a victory for the giant but it is as well to remember for the other side that there is no goodness to effect a victory when it will bring up a memory of vast blood—shed. No battle is a safe measure against a race of warriors when it attempts to take their independence to turn them into a band of serfs.

---

## वऱ्हाड

आकाशांत ढगांची छाया

वारंवार गर्द होत. रोहिणीचा मंडप अतो सुंदर बनत असतो. वारा मोठ्या सोसाट्याचा सुटतो. मृग नक्षत्राच्या प्रथम चरणींच पर्जन्याला प्रारंभ होईल असा रंग दिसतो. सार्वजनिक आरोग्य चांगलें समाधानकारक आहे. प्लेगाचा रोग या प्रांतीं नाहीं म्हटलें तरी चालेल.

रा. रा. गोपाळ वामन वापट बी. ए. एल. एल. बी. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर आकोला यांची बदली तेल्हाऱ्याच्या कोर्टावर करण्यांत आली. हे गृहस्थ फार सुशील व गोड स्वभावाचे आहेत. न्यायाधिशीची कार्यमाला उत्कृष्टपणें पुरी करून हे अल्पशा परिचयांनेंच बहुत लोकप्रिय झाले आहेत.

रा० रा० विष्णु रंगनाथ शेवकर आफि. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे सुटीच्या अखेरीला रजे वरून परत येऊन आकोल्याच्या कोर्टावर दाखल होतील.

आकोटचे काजी मि० नुरुद्दीन हे दोषिक ज्वराच्या विकृतीनें गेल्या २९ साचे तारखेस निवर्तले हें कळविण्यास फार दुःख वाटतें. यांचें वय ४० वर्षाच्या अदांजांत असावें. हे गृहस्थ सार्वजनिक कार्यांत पुढारी असून त्यांच्या मनमिळाऊ स्वभावा वरून त्यांस सर्वजण फार चहात असत. यांच्या मरणानें त्यांच्या आप्तमित्रास मोठें दुःख होईल.

कुमार श्रीहरभामजी रसवानी डेपुटी कमिशनर आकोला यांनीं आपली रजा जुलईच्या ९ तारखे पर्यंत वाढविल्यामुळें त्या तारखे पर्यंत मि० करी हेच डेपुटी कमिशनरचें काम पाहतील व त्यांच्या तालुका ऑफिसरीचें काम रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे हे पाहतील.

---

NOTICE

Applications are hereby invited for the post of an overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 31—5—02 } V. M. Mahajani Vice-Chairman M. Committee Akola.

---

## वर्तमानसार

खोडसाळ पणा—श्रीमन्महाराज निजाम सरकार यांच्या चिरंजिवांच्या मागें राजपुत्र अशी संज्ञा लावूं नये, अशा अर्थाचा आक्षेप रेसिडेन्सीमध्यें घेण्यांत आला होता. असा अल्पापारेषु व्यापार करण्यानें मनाच्या कुत्सितपणाचें मात्र प्रदर्शन चांगलें होतें. निजाम सरकार सारख्यांचीं मुलें राजपुत्र नाहींत तर मग ह्या नांवास योग्य असे या पृथ्वीवरहि कोणी मिळणार नाहीं. थोर लोकांचा अशा तऱ्हेनें पाणउतारा करणाऱ्यांना चांगली समज खरोखरीच मिळाली पाहिजे.

आठरावी राष्ट्रीय सभा.—गेल्या सालीं कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेंत ठरल्याप्रमाणें आमदावाद येथें कांग्रेसची व तिजबरोबर भरणाऱ्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेची व औद्योगिक प्रदर्शनाची तयारी जारीनें आणि आस्थापूर्वक सुरू आहे. निरनिराळ्या पोट कमेट्या नेमून यातील कामें वांटून दिलीं आहेत. सामान पुरविण्याचे मक्ते कंत्राटांनें ठरले आहेत. आणि सर्व जिल्ह्यातून वर्गणी गोळा करण्याचें काम जारीनें चालूं आहे. आज पर्यंत १२००० रु० वर्गणी जमली असून आणखी बरीच जमेल असा अंदाज आहे.

भविष्य:—यंदा पुणें प्रांतीं पावसास सुमारें जून महिन्याच्या सहाव्या तारखेस सुरवात होऊन आगष्ट पावेतों. सारखा चांगला पाऊस पडेल असें त्रिंबकेकरांनीं भाकित केलें आहे.

हत्ती चालले.—दिल्ली येथील समारंभाचे वेळीं सुंदर हत्तींचा छबिना काढावयाचा आहे, म्हणून ब्रह्मदेशातील व बंगाल्यातील चांगले हत्ती तिकडे नेण्याची व्यवस्था आतां पासून करण्यांत येत आहे.

निद्रा रोग:—युगंडा 'आफ्रिका' प्रांतांत उद्भवलेल्या 'निद्रा रोगा' नें मनुष्याची झोंप वाढत जाऊन शेवटीं शेवटीं तो बेशुद्ध होऊन मरण पावतो! या रोगाची चिकित्सा करण्यासाठीं तिकडे कमिशन आणार आहे.

कलमी आंबे—सालीना गोव्याहून सरासरी पाऊण कोटि उत्तम कलमी आंबे बाहेर जातात आणि त्यांची किंमत एकंदर एक लक्ष चाळीस हजार साहाशें पंचवीस रुपये येऊन त्यांपैकीं निम्मे रकम गोव्याचे बागवानांना आणखी निम्मे त्याच्या मालाचा व्यापार करणारे दलालाला मिळतें असें नुकतेंच गोव्याच्या सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

साठ वर्षांच्या वयाच्या निर्धन स्त्रीपुरुषांचें उत्तम रीतीनें संरक्षण व्हावें, या करितां लाहोर येथील के. राय कन्हैयालाल यांच्या स्त्रीनें वीस हजार रुपयांची देणगी देऊन, 'संदरी आश्रम' नावाची संस्था स्थापन केली आहे. या आश्रमातून हल्लीं तीस स्त्रीपुरुषांना आश्रय मिळत असतो. त्यांचे खाण्यापिण्याची, कपडेलत्त्याची व औषधपाण्याची, पुराण व कथाकीर्तन श्रवणाची वगैरे सोय या आश्रमातून होत असते. वार्धक्यावस्थेनें पीडित झालेल्या निर्धन लोकांकरितां ही संस्था काढली आहे.

स्त्रियांनी बायका कामासाठीं बाहेर जाऊं लागल्या म्हणजे आपलीं मुलें हत्तींच्या स्वाधीन करून जातात व तेही त्यांस उत्तम प्रकारें जपतात.

गव्हर्नरांचें सूचना—पहिली बायको जिवंत असतां दुसरें लग्न करणाऱ्या ग्रजुएटांच्या पदव्या कलकत्ता युनिव्हर्सिटीनें काढून घ्याव्या, अशी सूचना कलकत्त्याच्या एका सुधारकी पत्रानें केली आहे!

भीमरूपी—एडवर्ड बोप्रे या नांवाचा एक फ्रेंच-कानेडियन मनुष्य या युगांतला प्रतिभीमसेनच आहे म्हटलें तरी चालेल. त्यानें वय ३४ वर्षांचें असून वजन ३८७ पौंड आहे! व त्याची उंची दहा फूट अकरा इंच आहे! त्याच्या पाटलुणीच्या एकेका पायांत दोन दोन मनुष्यें सहज मावतात! त्याचा एक मरपोशाख तयार करण्यास दहा मनुष्यांच्या पोषाखांचें कापड लागतें. पांच सहा फूट उंचीचे तीन तालीमबाज पुरुष तो आपल्या एका दंडावर सहज उभे करूं शकतो.

विलक्षण चाल— राहूकेतू दैत्यांनीं सूर्यचंद्रास सोडून द्यावें म्हणून त्यांना मित्र मिळविण्यासाठीं ग्रहणाचे वेळीं जमिनीवर नारळी च्या फांद्या जोरानें आपटीत राहाण्याची चाल त्रावणकोरमधील कित्येक जातींत आहे.

आमचे सध्याचे व्हाइसराय हे हुषार, चाणाक्ष, बुद्धिवान, विद्वान्, राजकार्यनिपुण अतएव सर्व गुणसंपन्न असतील, परंतु वास्तविक पहातां त्यांच्या त्या सर्वगुणसंपन्नतेचा आमच्या हिंदुस्थानास कांहींच फायदा झाला नाहीं. विलायतेंत असतां साम्राज्य पक्षाच्या मतांनीं मणमणून गेलेले लार्ड साहेबांचें डोकें जसेंचें तसेंच कायम राहून राजकीय दृष्ट्या यांची कारकीर्द हिंदुस्थानी प्रजेस मुळींच फायदेशीर झालेली नाहीं असेंच म्हणणें सयुक्तिक दिसेल. कलकत्ता म्युनिसिपल ॲक्ट, मुंबई म्युनिसिपल ॲक्ट, पंजाब लॅन्ड अलिनेशन ॲक्ट व मुंबई लॅन्ड रेव्हिन्यू ॲक्ट इत्यादि लोकमताविरुद्ध पास झालेल्या अनेक कायद्यास लॉर्ड कर्झन साहेबांची मिळालेली संमति व लोकमताचा झालेला उपहास लॉर्ड साहेबांच्या कारकीर्दीला चांगलें कसें म्हणूं देईल?

सिलोनमध्यें बरसात सुरू झाली असून अरबीसमुद्र व हिमालय यांजवर हवेची पाहिजे तशी स्थिति असल्यामुळें यंदाचा पावसाळा चांगल्या तऱ्हेचा होईल असें दिसतें. हिंदीमहासागरावरही पावसाळ्यास अनुकूल असेंच वादळ होत आहे.

भावनगरचा उन्हाळा— भावनगर येथें गेल्या आठवड्यांत इतका उन्हाळा झाला कीं, कबुतरासारखीं पाखरें फार तापामुळें पटापट मरून जमिनींवर पडलीं!

पाणी सांगणारा मुलगा— अमेरिकेंत गाय फेनले नावाचा एक मुलगा आहे. त्याचे डोळे अशा प्रकारचे आहेत कीं, त्याला जमिनीखालीं खोल असलेलें पाणी स्पष्ट दिसतें. यामुळें त्या मुलास "दी बाय वुइथ दि एक्स रे आयज" असें म्हणतात. यानें पुष्कळ जणांस जमिनीखालीं असलेलें पाणी दाखवून दिलें आहे. नुकतेंच हेन्री तेलवन नावाच्या तेलाच्या व्यापाऱ्यानें या मुलाची परीक्षा घेतली. मुलाच्या सांगण्या प्रमाणें एक हजार दोनशें फूट खणतां तेथून पुष्कळ तेलाचे झरे निघाले.

केसांची पेरणी— मिनोर नार्डे नांवाचे एक इटालियन डाक्टर आहेत. त्यांनीं आपल्या शरीरांवर अनुभव पाहून असें ठरविलें आहे कीं, शरीराच्या वाटेल त्या भागावर पाहिजे त्या केसांची पेरणी करितां येते आणि ते केस इतर केसांप्रमाणें वाढतात, परंतु असें पेरलेले केस फार वर्षें टिकत नाहींत. दोन तीन वर्षांत ते पिकूं लागून पडून जातात.

वैकी मौजे राममगांव शहर येथें एक बैरागी बुवा राहतात. त्यांज पाशीं एक गाय आहे. ती अद्याप पर्यंत व्याली नाहीं परंतु दररोज बैरागीबुवा सांठीं पावशेर दीडपाव दूध देते. ईश्वरी चमत्कार! याच तालुक्यापैकीं मौजे सेवगळ येथें रूमाजी पाटील यांचे येथें एक गाय होती, तिजला निरण नव्हतें ती गाय स्तनावाटे लघवी करीत असे.

न पचणारे पदार्थ खाण्याचा परिणाम.— नेहमीं वहिवाट झाला पाहिजे हें जरी खरें आहे, तथापि, क्वचित् त्यापासून फायदाच होतो. कोंबड्या वगैरे पाणी केव्हां केव्हां वाळूचे अथवा गारेचे बारीक खडे गिळतांना आपण पाहतों. त्यापासून त्यांच्या भुकेस कांहीं उपयोग होत नाहीं, तथापि, पोटांत त्यापासून इजा न होतां त्यांच्या पचनास त्यापासून मदतच होते. म्हणजे अशा कठीण पदार्थांचा स्पर्श कोठ्याच्या व आंतड्याच्या श्लेष्मल त्वचेस होतांच त्यांचें चलन वाढून पाचकरस अधिक उत्पन्न होतात. अर्थात, त्यामुळें पचनक्रिया चांगली वाढते. त्याच प्रमाणें अग्निमांद्याचे रोग्यानें चिमुटभर हिरवे तांदूळ ऊन अथवा थंड पाण्या बरोबर गिळले असतां त्याच्या स्पर्शानें कोठ्यांतील अन्न घुसळण्याची क्रिया वाढून पाचकरसही अधिक उत्पन्न होतो. असा, परोक्ष रीतीनें, अग्निमांद्य जाण्यास त्यांचा उपयोग होतो. म्हणूनच देवानें कांहीं प्राण्यांस, जरूर तेव्हां, वाळूचे खडे गिळण्याची उपजत बुद्धि दिली आहे असें दिसतें.

ट्रान्सवाल—बोअर लोकांची लढाई बहुतेक बंद पडल्या सारखीच आहे. तरी मधून मधून संधी साधून ते इंग्रज लोकांस त्रास देऊन त्याचा नाश करितातच. असो. आता दोन्ही पक्ष तह घडवून आणण्यासाठीं प्रयत्न करित आहेत. दोघेहि आपला निकराचा हट्ट वाद जरा बाजूला टेवून सामचारीनें मिलाफ करितील असा रंग दिसतो. बोअर लोक पुन्हां असें डोकें वर करणार नाहींत अशी पुरी तजवीज करण्यास इंग्रज लोक विसरणार नाहींतच. बोअर लोकास परिपूर्ण स्वातंत्र्य नाहीं. तरी अंतस्थ राज्यकारभाराचें स्वातंत्र्य मिळेल असें वाटतें. ईश्वर करो व एकदांची ही लढाई मिटो म्हणजे झालें.

---

## नोटीस

बेहामी सय्यद अमीर वल्लद सय्यद मीर भिकारी मुसलमान राहणार पिंपळगावराजा ता. मलकापूर यास:—

आम्ही खालीं सही करणार या जाहीर लेखानें कळवितों, कीं तुह्मास आम्ही दीड दोन वर्षांपूर्वीं कुलमुखत्यारपत्र दिलें होतें, पण तुमचें कामकाज आतां आमच्या मनास येत नाहीं, सबब आज तारखेपासून आपलें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे. या पुढें आपण आमचे संबंधानें कोणच्याहि तऱ्हेचा कोणाशी व्यवहार करूं नये. केल्यास त्याची जबाबदारी आह्मांवर नसून तुमच्याच

पासून आठ दिवसाचे आंत आमची पिंपळगांवच्या इनाम जमिनीची सनद, पुरावे, कर्जरोखे व मुखत्यारपत्र वगैरे जे कागदपत्र असतील ते सर्व आमचे आह्मांस द्यावे तसेच सर्व शेतीवाडीचा वगैरे हिशोब देऊन आमची पावती घ्यावी. असें मुदतींत न कराल तर आमची जी नुकसानी होईल ती भरून घेऊ. व कोर्ट मार्फत सर्व कागदपत्र ताब्यांत घेण्याची व्यवस्था करूं. आणि या कामीं अखेर निकालापर्यंत जो खर्च लागेल तोहि तुह्मांपासून घेतला जाईल म्हणून मुद्दाम कळविलें आहे. कळावें तारीख २१ माहे मे सन १९०२ इसवी.

सही

१ हफिजउल्ला वल्लद शरीफउल्ला,

२ महिबूब बी वल्लद इनायतउल्ला

उभयतां अज्ञान पालन करणार

राहिमान बी मर्द शरीफउल्ला.

राहणार माना ता. मोर्तिजापूर.

दस्तुर— शेख इब्राहीम वल्लद जमाशे हीन वस्ती दर्यापूर.

---


## जाहिरात.

खालील जिन्नस उत्तम प्रकारचे असून ते योग्य किंमतीला आमच्या दुकानीं विकत मिळतील सर्व माल खात्री लायक आहे.

### पेयें

| | दर डझनास. |
|---|---|
| सोडा वाटर मोठी बाटली | १ आणे |
| „ लहान बाटली | १ आणे |
| लेमोनेड मोठी बाटली | २ आणे |
| लेमोनेड लहान बाटली | १ आणे |

### जीन

जिना संबंधी लागणारे सामान जीन, बोल्ट, नट इत्यादि सर्व विक्रीस तयार आहे.

### तेलें.

१ मिनींग आईल. १ सिलींडर आईल
१ खोबरेल तेल. १ केरोसीन तेल.

### पट्टे

चामड्याचे पट्टे ३ इंची, १ ½ इंची, चामड्याची बारीक वादी.

### चीनी काम.

प्याला रकाबी वगैरे.
एल्युमीनमचा वासण.
गाडीची वगैरे चरबी,

### रंग

व्हाईट लेड
व्हाईट झींक
ग्रीन सीस मीनरल
ब्राऊन पेन्ट
टरपेन टाईन वगैरे.

धनजीशा मोटाभाई दारुखानवाला
आणि कंपनी आकोला


---

☞ हे पत्र आकोला येथें केल... छापून... खंडेराव बाळाजी फडके यांचे ... समाचार" छापखान्यांत नारा... ...काळ.]

सहामाही „ २ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ....................................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ६० १
दर ओळीस..........८१ ०१
दुसरे खेपेस .... .........८१

REGISTERED J. No. 9

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ................ 8 as
Single copy .................................... 4 as

Advertisement
Below 10 lines ....... 2 Rs
Per line over 10 ....... 4 as
Repetition Per line... 8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 9 JUNE 1902 NO 22

वर्ष ३६ आकोला सोमवार तारिख ९ माहे जून सन १९०२ इ० अंक २२


## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरीं पेटंट वाचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१९०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह...........१०
१९ „ मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ...............१२
१९ „ हाफ् हंटिंगचें..............१०
१९ „ हंटिंगचें ......................१०
१४ „ रिस्ट वॉच ..................१०

### इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस...........२०
१९ „ हंटिंग......................१०
१४ „ रिस्टवॉच....................१०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग........................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ...............३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ....................... ४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हॅनीगर आणि कंपनी,**
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
९ हार्नबी रोड, मुंबई.

---

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव ठेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक } A. G. Watson
आकोला १९ जुलै } Agent.

## मोरोपंत

### निवडक वेंचे.

( मागील अंकावरून पुढें चालूं )

धृतराष्ट्राचा कर्णाविषयीं शोक
( कर्ण पर्व. ) अ. ६

मेले पुत्र अमात्य,
सूतें हें दुःख पावलों मं ठें
कोठें कवणा आलें,
यश! करितां कर्म आग्रहें खोटें ४२
दावुनि लोभ खगांतें,
धरिति जसे बाळ पक्ष कातरती
ताडिति नुडवे जरि बहु,
विपदा योग्या सरावया तरि ती ४३
फुटतील पक्ष, केव्हां—
तरि दैवबळें तुटेल ही बंध
त्या छिन्न पक्ष विहगा—
परिस बहु व्यसन पावलों अंध ४४
\+ \+ \+ \+

( कर्ण आणि नकुळ यांचें युद्ध )
कर्ण म्हणे राजसुता!
बहु न वदें बाहुवीर्य प्रकटीं
विक्रमरहितें वचनें,
शोभति न जनीं जसीं मुखें नकटीं ४१
करुनिहि अतुल पराक्रम,
न वदति कांहींच शूर, तूं आधीं
किति वदसी वाचाळा,
मग बोलें जय पराक्रमें साधीं ४३
नकुळाचे शर वेष्टिति,
कर्णातें जेंवि सर्प नकुळातें
कर्णाचे शर वेष्टिति,
नकुळातें जेंवि मधुप बकुळातें ५९
सुर-नर-वर म्हणति अहो!
सकळां युद्धांत युद्ध हें कळस
बळ सत्वसिंधु न धरिति,
अळस, दिसति जेंवि विकसले पळस ६०
\+ \+ \+ \+

( दुर्योधना विषयीं शोक )
शल्य पर्व अ. १

संजय पुरासि आला,
साश्रु कुरुक्षेत्र–भूमि सोडून
दुर्योधन मेला हें,
सांगे अंधासि हात जोडून २
तिकडिल पांडव केशव,
सात्यकि इतुकेचि राहिले सात
कृप कृतवर्मा गुरुसुत,
इकडिल; झाला असा महा घात ३
घेतांचि परम दुःसह,
विष-रससा उग्र शब्द तो कानें
मूर्छित पडला मृतसा,
राजा धृतराष्ट्र पुत्र-शोकानें ४
\+ \+ \+ \+

सांगुनि विदुरासि नृपें,
खोजन तेथुनि सर्व काढविला
मग तेथें बहु तेणें,
त्यां न ग्रंथीं विस्तार वाढविला ९
राजा विदुरासि म्हणे,
हतभाग्यें त्यांचि घात हा केला
बा! हाणिली सुरभि१ ,
जेंवि, तुझ्या तेंवि लात हाकेला १०
पांच न मेले, मेले,
त्याहुनि बहु सुकर बाळ वीसपट
या चिंतेस महात्मा,
सांपडला सुकर३ बाळवीस पटें ॥१६॥
जे अल्प, अल्पें बळ रिपु,
झाले जयपात्र तेचि उरफाटे
शत-सुत-शोकें न तसें,
पांडव कुशलेंचि जेंवि उर फाटे १७
दैव महाबळ जेणें,
केली वंध्याचि नीति कणिकाची
सुत-घातक-भीम नुति न,
सोसेल मला शिवीहि अणिकाची १८
अंधपण बरें, अरिच्या,
केव्हां तरि पाहतोंचि तोंडास
घेतोचि कालिमाचा,
हत-शत-सुत-शोक-सर्प तों डास १९
मज अर्जिन जीर्ण वल्कल,
बहुमत या शत्रुनें नव न वासें
वनवास बहु बरा या,
दुष्टाचा पळ नको भवनवासें २०

( दुर्योधनाची प्रतिज्ञा आठवून म्हणतो )

" आहों समर्थ समरीं,
एका एकास वीस घेराया
कर्णाद्यखिल वधाया
प्रबळ म्हणुनि वासवीस घेरा या २१
कोठें सात तशीं या,
कोठें अक्षौहिणी अशीं अकरा
न करा चिंता, दुर्जय,
मी शत्रुजना; जसा सकेर अकरा " २२
असकृत प्रयाण समयीं,
मत्सुत ऐसी करूनि संधी तें
सर्व विसरला गेला,
सोडुनि कैसा वनात अंधातें २४
हुर हुर बहु खांटी रे !
उंरे उंरे न क्षणहि काळना तडकं
असुं हो ! निवाचि न चुका,
पुत्र मस्थानें काळ जा तडक २५

---

१ पक्षी. २ तरी ती त्या पक्षाची विरक्ति संपण्या सारखी असते. ३ बाहु पराक्रम' ४ राजपुत्र नकूळ. ५ मुंगुस.

१ कामधेनू. २ सुलभ. ३ एक कीटक. ४ वस्त्र. ५ सैन्य. ६ कणिक नामें प्रधान. ७ स्तुति, ८ चर्म. ९ वस्त्र. १० मंदिरांत राहणें. ११ अर्जुन. १२ असमर्थ. १३ समर्थ, पराक्रमी. १४ ज्याला हात आहेत तो. १५ हात नाहींत तो. १६ अनेकवार. १७ प्रतिज्ञा. १८ हें वक्षःस्थळ. १९ राहूं नको, टिकूं नको. २० फुटून जा. २१ प्राणहो ! २२ पुत्र गेला तो काळ.

(साम करण्या विषयीं कृष्णाचार्यांनीं दुर्योधनास सुचविलें असतां दुर्योधनानें जें उत्तर दिलें त्यांतील कांहीं भाग)

इंद्रें कसा परांचा,
करवुनि गुरु, बंधु, सुत, सखे, दास
यां हा अपकर्ष करिल,
शोकें जळनात हुत सखेदांस ४८
तपलों बहु प्रतापें,
सर्वांत जसा रवि ग्रहां माझी
परतेनें काय दहूं !
मानी मति सैर विग्रहीं माझी ४९
धर्म घातकांसि वनसा,
धन होता देत याचकाला जो
तो हा करं असहा-
द्रविणें-वितरणें न याचकां लाभो ५०
भोग तैंगाहि घडले,
झालों देऊनि अरि-शिरीं पाय
ऋण सर्व फेडिलें हा,
भंचावा या रणीं बरी कांय ५१
श्रेष्ठें सुख नसेचि कैसा,
जय ! कैचें राज्य ! कीर्ति जोडावी
ती तों युद्धेंचि मिळे,
म्हणुनि तनु रणीं, गृहीं न, सोडावी ५२
तो बहु निंद्य क्षत्रिय,
देऊनि जो पाठ अजनम रणातें
पाव सदा गदार्दित,
सोडुनि रक्तांत रडत, मरणातें ५३
बांधेन भोगळोभें,
तरि जन निंदील मन न वंदील
बंदी लज्जित होतील,
सात्विक न कटक पदक मंदोळ ५६
बहु गेले शोभवुनि,
स्वर्गाचा मार्ग गगन तळ मळला
प्रियजन-समागम जया,
घडला; तो पांथ मग न तळमळला ५७
समर करूनि मरावें,
जावें स्वर्गासि हेंचि परम हित
आम्हीं सुरांत होऊं,
मागें होउत नरांत पर महित ५८

१ दास कसा होईल ! २ शत्रूचा. ३ मला दुर्योधनाला. ४ शोकाग्नींत. ५ खेदयुक्तास. ६ श्रेष्ठ. ७ युद्ध. ८ मेघ. ९ उदक. १० हस्त. ११ अल्पद्रव्यदानानें. १२ दान. १३ रणयज्ञ. १४ देह. १५ रुधीर. १६ मरणातें पावे असा अन्वय. १७ रोग पीडित. १८ सेवक. १९ हस्तभूषण. २० शत्रु. २१ पूज्य.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ शुद्ध २ शके १८२४

## युद्धाची शांति

अखेरीस ट्रान्सव्हालची लढाई संपली ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. ट्रान्सव्हालच्या लढाईशीं आमचा समक्ष कांहीं [illegible] वें विव्हळ होत होतीं कीं जणु काय ही लढाई हिंदुस्थानातच चालूं आहे. एका मुंगी सारख्या क्षुद्र बोअर राष्ट्राला हत्ती सारख्या प्रचंड ब्रिटिश राष्ट्रानें जीवदान दिलें यांत कांहीं मोठेंसें नवल घडलें असें नाहीं, पण ब्रिटिश सरकारानें या झालेल्या तहांत मोठी उदार बुद्धि प्रकट केली आणि स्वातंत्र्य खेरीज करून बोअर लोकांना पुष्कळशा देणग्या दिल्या हें ब्रिटिश राष्ट्राला भूषणास्पद आहे. नवीन तहाच्या मुख्य अटी येणें प्रमाणें आहेतः-

(१) बोअर लोकांनीं आपलीं शस्त्रास्त्रें शरणागत होऊन खालीं ठेवावीत.

(२) सर्व बोअर कैद्यांना बंधमुक्त करून त्यास पूर्ववत त्यांची स्वतंत्रता व जिनगी देण्यांत येईल.

(३) ज्यांनीं युद्धाच्या नीतीचा भंग केला असेल त्यांसच फक्त शासन करण्यांत येईल. आणि बाकींच्या कैद्याविरुद्ध कोणतीच गोष्ट करण्यांत येणार नाहीं.

(४) ट्रान्सव्हालच्या सरकार दरबारांत, व विद्यालयांत बोअर लोकांची स्वदेशी ह्मणजे डच भाषाच चालूं राहील.

(५) आत्मसंरक्षणासाठीं व जिनगीचे संरक्षणासाठीं सर्व शस्त्रास्त्रें वागविण्याची बोअर लोकांस मुभा आहे.

(६) लढाईच्या खर्चा निमित्त ट्रान्सव्हालच्या लोकांवर कोणचाच बोजा बसविला जाणार नाहीं.

(७) बोअर शेतकऱ्यांस पूर्ववत त्यांच्या कामधंद्याला लावण्यासाठीं साडे चार कोट रुपयांचा ब्रिटिश सरकार दानधर्म करणार आहे.

(८) बोअर लोकांस मदत करण्यासाठीं ज्या कॉलनीवाल्यांनीं बंड केलें त्यांची चौकशी कायद्या प्रमाणें होईल, तथापि कोणासहि देहांत शिक्षा देण्यांत येणार नाहीं. तरी त्या बंडखोरांस स्वातंत्र्याचे हक्क आमरण मिळणार नाहींत.

असा हा अष्टाध्यायी तह पुरा झाला आणि लढाई संपली या बद्दल उभय पक्षाचे लोक आनंदोत्सव करीत आहेत. आपलें स्वातंत्र्य राखण्यासाठींच प्रथम बोअर लोक युद्धाला उभे राहिले आणि अखेरीला स्वातंत्र्यच त्यांनीं गमावलें ही या युद्धाची इतिश्री होय. ट्रान्सव्हालांत चक्रवर्ती एडवर्ड महाराजाचें साम्राज्य सुरूं होऊन या बरोबर शांततेचें साम्राज्यहि सुरूं झालें. स्वातंत्र्या साठीं बोअर लोकांनीं सर्वस्व अर्पण केलें आणि शेवटीं नष्ट प्राय होण्याची स्थिती आली तेव्हां स्वतंत्रतेच्याच जवळ जवळच नेणारा तह कबूल केल्या बद्दल आम्ही यांस कांहीं दोष देऊं इच्छित नाहीं. १८९९ च्या आक्टोबर पासून तों १९०२ च्या जून पर्यंत सरासरी तीन वर्षे जें युद्ध झालें तें खरोखर वर्णनीय होय. बोअर लोक आमच्या राज्यकर्त्यांचे शत्रू खरे, पण यांची वीरश्री पाहून आह्मांस यांची धन्यता वाटते. त्यांचा स्वाभिमान त्यांचा स्वार्थ त्याग, व यांचें युद्ध कौशल्य हीं कांहीं अपूर्व आहेत. गुणांचा आमोद सर्वत्र आपलेपणा विस्तृत करतो आणि या आमोदानेंच आमच्या मनांत बोअर लोकांविषयीं प्रेमभाव उत्पन्न होत आहे. जगांतीलांत जेरीला आणणारी ही बोअर पिपीलिका सामान्य प्रतापी नाहीं. लढाईचे विद्युत् संदेश वाचतांना चित्तवृत्ती फार चमत्कारिक होत असत. कोणी आह्मांस अराजनिष्ठ ह्मणतील तर ह्मणोत पण इंग्लिश सैन्यावर मिळवलेली जयसंपदा पाहून आह्मी त्यांचे धन्यवाद करीत होतो, व हा धन्यवाद आमच्या प्रमाणेंच आमचे राज्यकर्ते मनांत खरोखरच करीत असतील. सद्गुणाला कोण वश होणार नाहीं बरें !

सेसिल रोडस हे इंग्रजी महा मुत्सद्दी होऊन गेले. त्यांची कल्पना ट्रान्सव्हालमध्यें इंग्रजी साम्राज्य स्थापण्याची होती व ती अखेरीला सिद्धीस गेली हा ब्रिटिश राज्याला मोठा लाभ होय. संपत्तीनें संपत्ती वाढते तद्वत हें सूक्ष्म साम्राज्य मह्मांडा प्रमाणें महा विस्तृत पसरेल असें मागील इतिहासावरून अनुमान निघतें. लढाईचे प्रसंगीं सर्व राष्ट्रें तटस्थ होतीं आणि तीं ब्रिटिश राष्ट्रानें आरंभलेलें युद्ध मोठ्या आतुरतेनें पहात होतीं. आपली वाणी कायम राखून ब्रिटिश लोकांनीं शत्रूंना मित्रत्वांत घेतलें ही त्यांची थोरवी होय. लोभानें लोभ वाढतो हें खरें तथापि लोभाच्या गोष्टी मिळवितांना मनाचा मोठेपणा ठेवावा लागतो, पुष्कळशा स्वार्थाच्या गोष्टी बाजूला ठेवाव्या लागतात व कांहीं बाबतींत लघुपणाहि पतकरावा लागतो. हे सर्व गुण ब्रिटिश राष्ट्रानें या तहाचे वेळीं व्यक्त केले आणि बोअर युद्धाची शांती केली हें त्यांस मोठें भूषण आहे. ब्रिटिश राष्ट्रानें बोअर लोकांना पादाक्रान्त केलेल्या लोकांप्रमाणें वागविलें नाहीं हें बोअर लोकांच्या उत्तम गुणांचें बक्षीस होय. शत्रूंचे मित्र केले आणि आपल्या साम्राज्याला ही नवीन शक्ती जोडली हा ब्रिटिश मुत्सद्दीपणा प्रशंसनीय आहे. बोअर लोकांस सशस्त्र ठेविलें, त्यांस ब्रिटिश प्रजेचे सर्व हक्क दिले व त्यांच्यावर लढाईचा खर्च बसविला नाहीं, इतकेंच नाहीं तर त्यांच्या प्रीत्यर्थ कोट्यावधी रुपयांचा दानधर्म करण्याचा संकल्प केला यहून ब्रिटिश राष्ट्राची अन्य ती थोरवी कोणती ! वज्रापेक्षांही कठोर वृत्ती आमच्या ब्रिटिश सैन्यानें लढाईचे वेळीं प्रकट केली पण कुसुमाहूनही मृदू असा मनाचा कोमळपणा या तहाच्या वेळीं व्यक्त केला हें पाहून आमच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांविषयीं सर्वत्र पूज्य भाव उत्पन्न होईल.

## युद्धाचें सार

बोअर युद्धाचें सार कांहीं निराळेंच निघतें. बोअर लोकांनीं लढाई देऊन स्वतंत्रता हरविली आणि आह्मी इंडियन लोकांनीं आपली स्वतंत्रता लढाई न करितां ब्रिटिश तोफे पुढें अर्पण केली. बोअर लोकांच्या नैसर्गिक गुणाचा लढाईत जो विकास झाला त्याच्या योगानें स्वतंत्रता नाहीं तरी जवळ जवळ तितकेच हक्क त्यांस मिळाले आणि त्यांचे विषयीं राज्यकर्त्यांच्या मनांत आदरभाव उत्पन्न झाला. उलट पक्षीं याच्या उलट स्थिती आह्मां लोकांविषयीं दिसून येईल. आह्मी जों जों राज्यकर्त्यांना जवळ जवळ करितो तों तों आमचा नम्रपणा आह्मांला दूरदूरच फेंकून देतो. हा विपरीत परिणाम होण्याला गुण नाहींत हें होय. आह्मांमध्यें त्यांची वीरश्री नाहीं, त्यांचा अभिमान नाहीं किंवा त्यांच्या अंगचा चिवटपणाहि नाहीं. मनुष्याची व राष्ट्राची गोष्ट जवळ जवळ सारखीच आहे. राष्ट्राची किंमत त्यांतील माणसांच्या किंमतीवरून होत असते. बोअर लोक शत्रूंचे मित्र झाले एवढ्यानें त्यांच्या वरील प्रभुसत्ता बदलली. आह्मी पराजित ह्मणून चरणीं लीन झालों; आमच्या वरील प्रभुसत्ता बदलली इतकेंच नाहीं तर आह्मी प्रजेच्या सामान्य हक्कांसहि आंचवलों आह्मी निःशस्त्र राहिलों, आमच्याविषयीं राज्यकर्ते नेहमीं साशंक असतात व आमची हलगर्जीपणा इतकी घातुक होत चालली आहे कीं, आमच्या इंडियन राष्ट्रांत जीव आहे कां नाहीं याचाच पुष्कळदां संशय येतो. आमच्या नम्रपणानें आणि इंग्रजांच्या अव्याहत व्यापारानें आह्मी अगदीं परावलंबी बनलों आहों. या परावलंबनानें आह्मी इतके पराधीन झालों आहों कीं, आमचा उद्योग, आमचा व्यापार व आमची सुखसंपदा या सर्वांतच आह्मी नवखे बनलों आहों. स्वावलंबनाचा धडा आह्मी फारच उशिरां उमजलों आणि हा उमजहि सध्यांच्या विपन्न स्थितींत कितीसा आधार देईल याची मोठीच शंका आहे. सरकारी कृपे शिवाय आमचें पाऊलही पुढें सरकूं शकत नाहीं आणि या कृपेची सावली तर आह्मा पासून दूरदूर पडत आहे. ब्रिटिश राष्ट्रानें आह्मास आपल्या बरोबरीनें उभें करण्याविषयीं प्रारंभीं कांहींसा प्रयत्न केला आणि त्या प्रयत्नांचेंच अमृतफळ आह्मी चाखीत आहों. आह्मांमध्यें एक राष्ट्रवाले ह्मणून जो कांहीं जीव आहे तो या फळाचाच अमृतपणा होय. आमची राज्यकर्त्यां पाशीं इतकीच प्रार्थना आहे कीं, त्यांनीं बोअर लोकांविषयीं जी न्यायदृष्टी व उदार बुद्धी प्रदर्शित केली तीच आह्माविषयीं प्रकट करावी मग आमची कृतज्ञता व इंग्रजी राज्य हीं चिरकाळचीं कायम राहतील.

## इतिहास शिक्षण पद्धती

हल्लींची इतिहास शिकविण्याची पद्धती आह्मांस मान्य नाहीं. पण शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांस ती अमान्य आहे असें आह्मास वाटत नाहीं. सालोसाल एकाच चालूं पद्धतीचें दृढीकरण होत असतें. वर्षांवर्षे इतिहास एकाच मार्गानें विद्यार्थी शिकतात व त्या मार्गाला अनुसरूनच त्यांच्या वार्षिक परीक्षा होत असतात. परीक्षण आणि शिक्षण हीं दोन्ही एकमेकांच्या अनुरोधानें चालतात. परीक्षेची जी घाटणी तिला समपर्क होईल अशा रीतीनेंच अभ्यास होत असतो. या दोन्ही गोष्टी इतिहास संबंधानें अत्यंत दोषमूलक आहेत असें आह्मांस वाटतें. इतिहासाचें पठण अशा रीतीनें होत असतें कीं, तो विषय विद्यार्थ्याला अगदीं नीरस व कंटाळवाणा वाटून स्मरण शक्तीलाही भारभूतच होतो. इतिहासांतील सन, तारखा, लढाया, त्यांचीं स्थळें आणि तसेंच त्यांतील प्रधान पुरुषांचीं त्रोटक चरित्रें यांच्या पाठांतरानें डोकें अगदीं भणभणून जातें. मोठमोठे इतिहास वाचल्या नंतर

नी करून ठेवितात या संक्षिप्त टाचणांच्या आटातटावर सर्व इतिहासाच्या अभ्यासाचा मुख्य भार असतो. मूळचा रसाळ कथानकाचा भाग फेंकून दिला जातो आणि त्याच्या पद्धतीनें नुसत्या त्रोटक माहिती वरच विद्यार्थ्यांची निभावणी होते. लहानपणापासून प्रौढावस्थेत विद्यार्थी पोहोंचे पर्यंत अशा संक्षिप्त इतिहासावरच विद्यार्थी परीक्षेंत पास होत असतात. प्रथमचीं कांहीं वर्षें असले त्रोटक इतिहास देशी भाषांतून शिकावे लागतात व नंतर तेच इंग्रजींत पुन्हा शिकावे लागतात. सारांश विद्यार्थ्यांच्या मनःप्रवृत्तीला जी गोष्ट नको तीच त्यांच्या कपाळीं येते. लहानपणीं गोष्टी ऐकण्याची मोठी उत्सुकता असते आणि या गोष्टी देखील रसभरित युद्धाच्या व समाजांतील भानगडींच्या असतील तितक्या या स्वाभाविकच मनास फार आवडतात. पूर्वींच्या बखरी वाचण्यापासून विद्यार्थ्यांना जो आल्हाद वाटत असे तसा शाळांतून चालू असलेल्या इतिहासांच्या वाचना पासून होत नाहीं. मूळचा विस्तारपूर्वक लिहिलेला इतिहास प्रथम वाचण्यांत आला पाहिजे. आणि तो देखील होतां होईल तों काव्या प्रमाणें प्रासादिक असेल तर फार बरा. प्रथमारंभीच सनावर, शकावर फारसा जोर नको आहे. आणि इतिहासांतील निरनिराळ्या भागामधील परस्पर संबंधावर विशेष दृष्टी नसेल तरी हरकत नाहीं. इतिहास अगदीं गोष्टींच्या रूपानें पाहिजे. आणि त्यांतील गोष्टी जस जशा मनावर ठसतील तसतसा इतिहास वाचनाचा खरा लाभ होत असतो. इतिहासाचा उपयोग मोठ्या दीपस्तंभा प्रमाणें आहे. भावी गोष्टी विषयीं आपण अंधारांत असतो. त्याचें अनुमान बांधण्याला व भावी गोष्टीवर आपली दृष्टी पोहोंचण्याला इतिहासरूपी दिव्याचा मोठा उपयोग होतो. ज्या इतिहासाच्या पठणा पासून विद्यार्थ्यांच्या मनांत भावी व वर्तमान गोष्टीं विषयीं कांहींच प्रकाश पडत नाहीं तें इतिहास पठण अगदीं व्यर्थ होय. इतिहास मार्ग दर्शक होण्याला त्यांतील गोष्टींचें विद्यमान गोष्टींशीं साम्य किंवा वैषम्य दिसून आलें पाहिजे. अर्थात वर्तमान काळाच्या गोष्टी आपल्या डोळ्या देखत घडतात व त्या जशा आपल्या बुद्धीला कळतात तद्वतच इतिहासांतील गोष्टी डोळ्या समोर प्रत्यक्ष उभ्या राहिल्या पाहिजेत. तिसरा रिचर्ड राजा याचा इतिहास वाचा आणि तो कसा तरी एकदां पुरा वाचल्या वर आपणास हा बिचारा एकदाचा वारला असें वाटेल. पण तेंच शेकसपीयरचें रिचर्ड दि थर्डचें नाटक पहा म्हणजे नाना वृत्ती मनांत कशा उठतात व निरनिराळ्या विचारांचा कसा कल्लोळ होतो याची थोडी बहुत कल्पना येईल. ग्रोटचा ग्रीसचा इतिहास वाचा म्हणजे ते बारा ग्रंथ ग्रीस देश व त्याचे लोक हे अगदीं डोळ्यापुढें आणून उभे करतात. नाहीं तर स्मिथ साहेबाचा एकच ग्रंथ ग्रीस देशाचा इतिहास सांगतो, पण तो वाचून पुरा होई पर्यंत मन अगदीं त्रस्त होऊन जातें. इंडियाच्या इतिहासाची हीच गोष्ट आहे. चारी खंडाचा इतिहास तीन चार वर्षांत पुरा होण्यापेक्षां एकाच देशाच्या व मुख्यतः स्वदेशाच्या इतिहासांतील एखा द्या उत्कृष्ट शतकाचा सर्व भाग चांगला कळेल तर आमच्या विद्यार्थ्यांना आनंद वाटून कांहीं तरी खचित लाभ होईल. विद्यार्थ्यांच्या मनाला जे संक्षिप्त इतिहास नकोत तेच आरंभा पासून त्यांच्या कपाळीं मारले जातात. आणि त्याच छोटेखानी इतिहासाच्या मराठी, व इंग्रजी पुनरावृत्तीनें विद्यार्थ्यांस तो इतिहास म्हणजे एक नागुळ-बोजा वाटत असतो. इतिहासा संबंधी हा दोष खरोखर विद्याखात्याचा आहे आणि तो गेल्या पन्नास वर्षांच्या अनुभवानेंहि दूर होत नाहीं हें पाहून आमच्या मताविषयींच आम्हांस कातरता वाटते. कांहींहि असो, प्रस्तुतचा शाळा खात्यांतील इतिहासविषय हा एक मोठा नागर बोजा बनला आहे, आणि तो विद्यार्थीदशा संपल्या नंतरहि कोणाचा इतिहासाशीं परिचय होऊं देत नाहीं. इतिहासाच्या अभ्यासाचा जो दोष वर दर्शविला आहे त्याचें आलोचन विद्याखात्यांचे अधिकारी करतील तर त्यांचे आम्हावर मोठे उपकार होतील. मोठमोठ्या इतिहासांतील विस्तार पूर्वक गोष्टी वाचल्या वर त्या गोष्टींच्या स्मरणाला अनुवाचक अशा संक्षिप्त पद्धती हल्लीं प्रचलित आहेत; इतिहासातील कथानकाच्या सांखळीचे मुख्य मुख्य दुवे दाखविण्याचे इतिहास हल्लीं पुष्कळस उपलब्ध आहेत. मोठ्या इतिहासांतील आडव्या तिडव्या वाटा आणि त्यांचे दूरदूरचे फांटे हे दाखविण्याला विद्यमान संक्षिप्त इतिहास मैलाच्या दगडा प्रमाणें किंवा वाट दाखविणाऱ्या खांबा प्रमाणें आहेत. पण जर कोणी मैलांचे सर्व दगड एके ठिकाणीं आणून मांडील आणि मार्ग दर्शक खांब एकाला एक लावून उभे करील तर जसा त्या दगडापासून किंवा खांबा पासून वस्तुतः कांहींएक फायदा नाहीं आणि जागेला मात्र वृथा अडचण होणार आहे तद्वत हल्लींच्या इतिहासाच्या पुस्तकांत एकत्र संग्रहित केलेल्या गोष्टी पासून इतिहासज्ञानामध्यें भर न पडता उलट त्या स्मरण शक्तीला मात्र भारभूत आहेत. जर मूळचा च विस्तृत इतिहास आपण शिकलों नाहीं तर या स्मरणवही सारखे असलेले शाळांतील संक्षिप्त इतिहास स्मरण तरी कोणाच्या इतिहासाचें देणार !

---

The Berar Samachar

MONDAY JUNE 9 1902

---

We hail with delight the welcome news of peace that brought at last the Transval War to a close. It is an event in which the whole nation was interested and in which the whole of the empire must now rejoice. The event is most joyful especially in view of the coming Coronation. It is indeed a lucky incident that the peace proposals came up just in time. A little postponement of the peace & the consequent continuance of the hostilities would have greatly marred the cheerful rejoicings of the people. But the blissful spell of the approaching Coronation has driven away all fears of troubles and evil omens. The Coronation of His Majesty the king Emperor promises to be a splendid success. Its celebration in England would be a magnificient incident in the English history. All nations are going to join in the chorus of this universal jubilation, and its unique feature lies in the fact that the Boers—so long the fell foes of the British power—are to uphold like the sworn loyal subjects the King Edward as their soverign Lord.

The Coronation in England will have its sequel in the Darbar at Delhi. The Coronation as well as the Darbar at Delhi will be an event of momentary interest if no permanent act of beneficience does not immortalize the occasion. The greatness of an occasion does not so much lie in the festivities of the day. It is a permanent good that makes an occasion great. The Coronation of a king over whose wide dominions the sun never sets, must be accompanied by royal deeds of benevolence in which all the subject nations will find their due share. This eventful Coronation will not fail to have for India some gift of royal munificence. It is equally our privilege to beg of our sovereign Lord some great favour on an occasion like this. What we want the King Emperor to do for India is that he should keep up his promise given at the time when he ascended the throne. We request His Majesty to follow in the wake of his august mother. We wish that the Queen's Proclamation of 1857 be renewed to the Indian people in the living spirit of the noble language in which it is cloaked. The Proclamation is our Indian Magna Charta. Our request is that it should be put to actual practice. We pray for our admission to the proud privileges of a Britirh subject. The Proclamation is excellent in theory but is honoured more in its breach than its observance. We request the rulers to put a stop to such a dereliction of duties. In addition to the old differences of creed and religion the British rule has established the difference of a white man as distinguished from a black one. These differences have been a cause of the peculiar estrangement of feelings between the rulers and the ruled. The disabilities of our people are a black spot in the history of the British nation. The Indian Arm's act is a legislative monument of the narrow heart of the British people. We are not one at the end of the bayonet, and no Indian Arm's act will be justified on any ground but that of a narrow statesmanship. We are not similarly admitted to a proper share in the administration of the country. India is not governed for India's sake, and when English interest conflicts with that of the Indian people, it is the former which predominates over the latter. India is said to be a rich diadem in the British empire. And we are afraid that her possession is solely utilized for the advancement of the British nation. These and many similar ones are our present disabilities. We wish for their abolition as an act of the Royal Grace. We pray to the British Government for the elevation of India on the same lines on which the British nation has been built on a sound material prosperity. We hope that the reign of Edward VII will bring to India the ever lasting blessing of prosperity and will keep green in the hearts of our people the sacred memory of Victoria the good.

---

## वऱ्हाड.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल एल. बी. एक्स्ट्रा असि० कमिशनर हे आज रोजीं तेल्हारे येथील कोर्टाचा चार्ज घेतील.

रा. रा. सी. शामराव अभ्यंकर, उमरावती यांस चालू ५ चे तारखेपासून पंधरा दिवसांची रजा देण्यांत आली.

गेल्या मार्च महिन्यांत झालेल्या लोअर व हायर परीक्षांचा निकाल प्रसिद्ध झाला आहे त्या वरून व मागील परीक्षांची एकंदर गोळा बेरीज घेऊन पाहतां

राव बहादुर नव गोपाळ सरकार.

रा. रा. रामराव बापूजी पतकी

" " लक्ष्मण गोपाळ देशपांडे

यांची हायर स्टांडर्डची परीक्षा संपूर्णतेनें पुरी झाली; तसेंच

रा. रा. महादेव गणेश

" " बाळकृष्ण भाईजी दुर्गे

हे लोअर स्टांडर्डची परीक्षा पूर्णपणें उतरले.

रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए.

" " विनायक कृष्ण सहस्त्रबुद्धे.

" " नारायण मोरेश्वर रहाळकर बी. ए. हे डेपुटी क्लार्क आफ कोर्टच्या दर्जाची परीक्षा पास झाले.

उमरावतीचे डेपुटी कमिशनर मेजर रार्बट व्हरनान ग्यारेट यांस लेफटेनंट कर्नल ची बढती मिळाली.

---

## नोटीस

भेशमी यम्या वल्लद कृष्ण्या महार, कचन्या वल्लद कृष्णच्या महार व लक्ष्या वल्लद कृष्णच्या महार राहणार चांदणी पोस्ट–पातूर शेखबाबू. तालुका बाळापूर यास.——

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हां पैकीं वडील दोघा बंधूंनीं स्वतां करितां व तिसऱ्या भावा करितां मिळून दोनशे रुपये कर्जसाठीं १।२।९८ रोजीं चांदणी येथील शेतें सर्व्हे नं. ६६ चा $\frac{1}{2}$ हिस्सा व सर्व्हे नं. ६८ मधील $\frac{1}{2}$ व सर्व्हे नं. ६९ मधील $\frac{1}{2}$ हिस्सा व राहतें घर हीं जिनगी गहाण दिली. पुढें गहाणखत, दुसरें कर्जरोखे दोन व तुमच्या सावकारांकडून सोडून आणिलेले कर्जरोखे दोन शिवाय जवारीची किंमत मिळून तुम्हा-कडे अदमास ७५० रुपये रक्कम निघाली. त्या पैकीं तुमच्या घेतलेल्या बैलाची किंमत वजा जाता बाकी राहिलेल्या ७०० रुपया मध्यें तुम्ही आपली गहाण ठेविलेली शेती मला विकत दिली आणि घर मात्र तुम्ही आपल्या कडे ठेऊन घेतलें. हा खरेदीचा व्यवहार पक्का होण्याला आज वर्ष भराचा काळ निघून गेला तथापि तुम्ही खरेदीखत करून नोंदून दिलें नाहीं म्हणून ही नोटीस देणें भाग पडलें. शेती माझ्या ताब्यांत खरेदीच्या पूर्वी पासूनच आहे आणि ती मी खरेदीच्या नंतर मालक या नात्यानें वहात आहे तथापि शेतीवाडीच्या संबंधानें खरेदीपत्र झालें पाहिजे. ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत खरेदीखत करून नोंदून द्यावें व आपले जुने दस्तैवज परत घेऊन जावें. असें करण्यास चुकाल तर कोर्ट मार्फत सर्व तजवीज होईल. आणि सर्व खर्च तुम्हावर पडेल कळावें

तारीख ८।६।०२ सही

बापू सूर्यभान पाटील राहणार

चांदनी दस्तुर खुद्द.

ग्रॅज्युएट शिपाई—पालघाट ( त्रावणकोर ) येथील एका सरकारी कचेरींत एका ब्राह्मण ग्राजुएटानें शिपायाची नोकरी धरली आहे. काय करील बिचारा!

दगडांतून सिंहनाद—इंग्लंडच्या राजाच्या सिंहासनाच्या खुर्चीखालीं एक फार जुना दगड आहे. ह्याविषयीं लोकांत अशी समजूत आहे कीं, राजा हा अगदीं कायदेशीर असला ह्मणजे त्याच्या राज्याभिषेकाच्या वेळीं ह्या दगडांतून सिंहनाद होतो.

चमत्कार— राजापुरास गंगा आलेली पाहून एकानें न कळत तिजमध्यें आस्थि टाकल्या. असें होतांच गंगा गेली. रात्रीं पुनः त्यास दृष्टांत झाला. दुसरे दिवशीं शांतवन केल्यावर पुन्हां गंगा आली. हा दैवी चमत्कार नव्हे काय?

बहुमानाची पदवी व निमंत्रण—श्री० महाराज सरकार करवीर व दुसरे कांहीं राजे यांना केंब्रिज युनिव्हर्सिटीकडून एल. एल. डी. ही बहुमानाची पदवी देण्यांत येणार आहे व दिल्ली दरबारास अष्टप्रधान, मानकरी वगैरे वैभव व राजचिन्हें यासह येण्याबद्दल करवीर महाराजांस निमंत्रण झालें आहे.

कुत्रे घोड्याचा गळ्यांत बांधण्याबद्दल शिक्षा— मद्रासच्या एका साहेबाचे झिंगलेल्या मोतद्दारानें ह्याचे तीन कुत्रे नुकतेच त्याच्या घोड्याचे गळ्यांत बधून त्याला जाहीर रस्त्यावरून फिरविलें ह्मणून सदरहू मोतद्दारावर खटला होऊन त्याला झिंगल्या बद्दल दोन रुपये, आणखी कुत्र्याला निर्दयतेनें वागविल्या वरून पांच रुपये दंड झाला.

म्युनिसिपालिटीस नोटीस— अमदाबाद शहरांत मुनसिपालिटीची व्यवस्था चांगली नाहीं, शहरांत जिकडे तिकडे घाण आहे अशा अर्थाचें एक पत्र उत्तरभाग कमिशनरनीं ह्या कमिटीस पाठविलें आहे. व एक महिन्याचे आंत तुह्मी आपली व्यवस्था केली नाहीं, तर सरकार स्वतःअधिकार चालवील अशी ह्या नोटिशींत खरमरीत ताकीद दिल्याचें समजतें.

सरकारी ठराव— हुशार व प्रामाणिक सरकारी नोकर मरण पावल्यावर त्याचें कुटुंब फारच कंगाल स्थितीस आलें असेल तर अशाबद्दल स्थानिक सरकारनीं हिंदुस्थान सरकाराकडे रिपोर्ट करावा ह्मणजे योग्य चौकशी करून त्या कुटुंबास सरकार कांहीं देणगी देईल. या कामीं दरवर्षीं बजेटांत २९००० रुपयांची रकम मंजूर व्हावयाची असून एका वर्षांत या देणग्यासाठीं सर्व हिंदुस्थानात ४५००० हून जास्त रकम खर्च करूं नये असा हिंदुस्थान सरकारनें नुकताच एक ठराव केला आहे.

स्वातंत्र्याची जोड— बयूबा बेटांतील लोक स्पेनच्या अमलाखालीं अगदीं जेरीस आले होते. त्यांचा कैवार घेऊन अमेरिकेनें मोठ्या उदार बुद्धीनें आपण होऊन त्यास स्वातंत्र्य दिलें. त्या वेळीं गव्हरनर साहेब साहेब ह्मणाले कीं, आपल्या स्वातंत्र्याला विघातक असें कोणाबरोबर तह करूं नका, फेडतां न येईल असें कर्ज काढूं नका. या गोष्टी त्यास बजावून सांगितल्या आणि अमेरिकेनें येथील मुख्य तर्फेक शिपाण आप- त्या हातानें काढून घेऊन तेथील गव्हरनर साहेब आपल्या अधिकारी मंडळीस घेऊन जहाजांत बसून अमेरिकेस निघून गेले. इतकें महात्में दुसरें राष्ट्र सांपडेल काय?

विचित्र हौस— पारिसच्या स्त्रियांची सर्वच कामांत कमाल आहे. या स्त्रियांस कुतरी, मांजरें वगैरे बाळगण्याचा मोठा शोक आहे हें जगजाहीर आहे. या बाळगण्याबद्दलचा त्यांचा शोक आणि त्यांचे लाड बेसुमार हौसेनें चालले आहेत. हल्लीं बाळगलेल्या कुतऱ्यांची मिजास इतकी वाढली आहे कीं, त्यास सर्व प्रकारचे कपडे घालून सजवितात आणि त्यांचे पायांत बूट घालतात. फयाशनेबल लोक ज्याप्रमाणें एक रुमाल खिशांत ठेवितात त्याप्रमाणें त्या कुतऱ्यांच्या कालरमध्येंही एक रुमाल झोकांत खोंऊन देतात! इतकेंच नव्हें तर त्यास नानाप्रकारचे जवाहिराचे दागिने ही घालतात. ! दुनियेची मौज आहे दुसरें काय?

देशी आगपेट्याचा कारखाना— कोटा येथें एका उद्योगी मनुष्यानें आगकाड्याच्या पेट्या तयार करण्याचा कारखाना काढिला असून त्याच्या आगकाड्यांच्या पेट्या जपानी पेट्यांसारख्या उत्तम असतात. आणि सदरहू काड्याच्या पेट्या आण्यास डझनप्रमाणें विकल्या जातात.

जन्माचें मातेरें— धुळें येथील एक प्रसिद्ध पुराणिक वरून संभावितपणाचें पांघरूण घेणाऱ्या परंतु अत्यंत नीच वृत्तीच्या अशा ६० वर्षांच्या जरठानें एका १० वर्षांच्या कोमल बालिकेशीं विवाह लावून तिच्या जन्माची राखरांगोळी केली.

पाणी पचनक्रियेस फार जरूर आहे. तें कितीहि प्यालें तरी बाधत नाहीं असें शोधांतीं ठरविण्यांत आलें आहे.

दुष्ट संवय— चहाची संवय दारूसारखी मनुष्यास आपल्या स्वाधीन करते. आणि तें एक व्यसनच होतें, या साठीं चहाचे ऐवजीं दुधाची योजना होईल तर सर्व प्रकारें फायदा होणार आहे. असें युरोपियन विद्वानांनींहि ठरविलें आहे.

खोटा म्याजिस्ट्रेट व त्याचें खोटें कोर्ट— कलकत्ता हायकोर्टापुढें एक मजेदार खटला हल्लीं चालूं आहे. हरिदास ओझा नांवाच्या इसमानें कलकत्त्याजवळ एका गांवीं म्याजिस्ट्रेट स्थापून, तेथें लोकांच्या फिर्यादी घेऊन निकाल करण्याचें काम चालविलें. शिपाई, कारकून वगैरे मंडळीसह हा देखावा त्यानें दिला होता. त्यानें बरेंच दिवस काम केल्यावर एका सोनाराचा खटला त्या कोर्टापुढें आला. त्या कामाचा निकाल ह्या म्याजिस्ट्रेटनें लावलेला त्यास पसंत पडला नाहीं व त्यानें वरच्या कोर्टाकडे अपील केलें. त्या अपिलाच्या कामांत हे बनावटी म्याजिस्ट्रेट आहेत असा संशय येऊन, हे म्याजिस्ट्रेट, त्यांचे कारकून व शिपाई यांना एकदम कैद केलें व काम चालवून त्या म्याजिस्ट्रेटास तीनशें रुपये दंड व तीन वर्षांची शिक्षा दिली. याजवर कलकत्ता हायकोर्टापुढें अपिल झालें आहे. आरोपीच्या पक्षाचें असें ह्मणणें आहे कीं लोकांवर सक्ती करून मी हें काम बिलकुल केलें नाहीं. कोणत्याहि तंट्याभांडणाचा निकाल सरकाराशिवाय इतरांनीं करूं नये, अशी कायद्यानें मनाई केली नाहीं.

निव्वळ स्वदेशी मानपत्र— हें मानपत्र बनारसच्या महाराजांनीं संस्कृत भाषेंत लिहिलें असून पूर्वीं ज्या माळवी कागदावर पोथ्या लिहिल्या जात असत त्याच कागदावर देशी शाईनें हातानें लिहिलें आहे. या मानपत्रावर देशी चित्रकारांकडून देशी रंगांनीं व देशीच नमुन्याचीं सुबक चित्रें काढलीं आहेत. हें मानपत्र आपल्याच हत्तीच्या शुभ्र हस्तीदंताच्या तयार केलेल्या करंड्यांत किनखापी पिशवींत ठेवलें आहे. या हस्तीदंती करंड्यावर रामनगरचा किल्ला, काशींतील गंगा कांठचे मुख्य मुख्य घाट, श्रीक्षेत्र काशीचें आदिदैवत श्रीविश्वेश्वराचें सुवर्ण मंदीर वगैरे चित्रें फारच नामीं रीतीनें कोरलीं आहेत. येवढ्या सर्व कृत्यामध्यें एकही परदेशी वस्तु उपयोगांत आणली नाहीं हें एक विशेष असून महाराज साहेबांनाच नव्हे तर सर्व देशाला हें मोठें भूषणीय आहे यांत संशय नाहीं.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं ' हिरालाल बलदेव ' नांवाची अडतीची दुकान आकोल्यास आहे या दुकानाचे खालील प्रमाणें पांच भागीनदार होते:—

चंदनगीर गुरु रामगीर.
रतनगीर गुरु चंदनगीर.
काशीराम हिरासिंग.
देरू पाचारिया. आणि
हिरालाल बलदेव

पहिले चार भागीनदारापैकीं चंदनगीर मयत झाला आहे. आणि दुसरे तीन भागीनदार अडतीच्या दुकानाची कामगिरी बरोबर बजावीत नसल्यामुळें त्यांसही दुकानदारींतून पूर्वींच कमी केलें आहे. वरील ' हिरालाल बलदेव ' च्या दुकानांच्या देवघेवीबद्दल लोकांच्याकडे ज्या रकमा येणे आहेत त्या वसूल करण्याचा अधिकार फक्त खालीं सही करणार याजकडे आहे. दुसऱ्या तीन भागीनदारांस पैसा वसूल करण्याचा किंवा स्वतंत्रपणें कोणतीही देवघेव करण्याचा अधिकार नाहीं अशी भागीनदारीची शर्त आहे. या शर्ती प्रमाणें सर्व लोकांनीं खालीं सही करणारा बरोबरच देवघेवीचा सर्व व्यवहार करावा. तसें करण्यास जर कोणी चुकेल तर त्याची जबाबदारी दुकानावर नसून दुकानाच्या इस्टेटीवरही कांहीं बोजा राहणार नाहीं.

वरील तीन जुने भागीनदार ह्मणजे रतनगीर, काशीराम व देरू या तिघेजणांस मी पूर्वींच नोटीस देऊन दुकानदारीचा त्यांचा संबंध तोडून टाकलाच आहे व त्यांस पैशा संबंधानें देवघेव करण्याचीही मनाई लेखी नोटिशीनें करण्यांत आली आहे.

माझ्या नांवानें ह्या तिघांनीं कोणताही व्यवहार करूं नये व सर्वत्र लोकांनीं त्यांच्या बरोबर माझ्या नांवानें कोणत्याही प्रकारची देवघेव किंवा इतर व्यवहार करूं नये. ते तिघे इसम जे व्यवहार करितील त्यांचे ते स्वतंत्र व पृथक् व्यवहार आहेत असें समजून त्यांच्या बरोबर लोकांनीं व्यवहार केल्यास मी कांहींच हरकत आणूं इच्छित नाहीं. कळावें. तारीख ४ जून सन १९०२ इसवी.

सही
हिरालाल बलदेव तिव्हारी
दस्तुर खुद.

---

## जाहिरात.

खालील जिन्नस उत्तम प्रकारचे असून ते योग्य किंमतीला आमच्या दुकानीं विकत मिळतील सर्व माल खात्री लायक आहे,

### पेयें

| | दर डझनास. |
|---|---|
| सोडा वाटर मोठी बाटली | ६ आणे |
| ,, लहान बाटली | ३ आणे |
| लेमोनेड मोठी बाटली | ९ आणे |
| लेमोनेड लहान बाटली | ६ आणे |

### जीन

जिना संबंधी लागणारे सामान जीन, बोल्ट, नट इत्यादि सर्व विक्रीस तयार आहे.

### तेलें.

१ जिनींग आईल. १ सिलींडर आईल
१ खोबरेल तेल. १ केरोसीन तेल.

### पट्टे

चामड्याचे पट्टे ३ इंची, १ १/२ इंची, चामड्याची बारीक वादी.

चीनी काम.

प्याला रकाबी वगैरे.
एल्युमीनमचा बासण.
गचराडचिी घरची बी,

### रंग

व्हाईट लेड
व्हाईट झींक
ग्रीन सीस मीनरल
ब्राऊन पेन्ट
टरपेन टाईन वगैरे.

धनजीशा मोटाभाई दारूखानवाला
आणि कंपनी आकोला

---

## NOTICE

Applications are hereby invited for the post of an overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 31—5—02 } V. M. Mahajani, Vice-Chairman, M. Committee, Akola.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ......................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०९
दुसरे खेपेस .... ........८१

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................ 4 as

Advertisement
Below 10lines ...... 2 Rs
Perline over 10 ...... 4 as
Repetition Per line...3 as

VOL XXXVI — AKOLA MONDAY 16 JUNE 1902 — NO 23

वर्ष ३६ — आकोला सोमवार तारीख १६ माहे जून सन १९०२ इ० — अंक २३

NOTICE

Applications are hereby invited for the post of an overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 31—5—02 { V. M. Mahajani, Vice-Chairman, M. Committee, Akola.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.


एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## खरेदी करा !
## रास्कोपचीं थेट व खरीं पेटंट वाचेस
## नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे, असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्यांना आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखीम हारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ „ हंटिंग......................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ „ हाफ हंटिंगचें.................२०
१९ „ हंटिंगचें ......................२०
१४ „ रिस्ट वॉच ....................२०

इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ „ हंटिंग.......................२०
१४ „ रिस्टवॉच...................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग........................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग .....................४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपयें ६५–२०० पर्यंत.

सी. हॉनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

## जाहिरात.

खालील जिन्नस उत्तम प्रकारचे असून ते योग्य किंमतीला आमच्या दुकानीं विकत मिळतील सर्व माल खात्री लायक आहे.

### पेयें

| | दर डझनास. |
|---|---|
| सोडा वाटर मोठी बाटली | ६ आणे |
| „ लहान बाटली | ३ आणे |
| लेमोनेड मोठी बाटली | ९ आणे |
| लेमोनेड लहान बाटली | ६ आणे |

### जीन

जिना संबंधी लागणारे सामान जीन, बोल्ट, नट इत्यादि सर्व विक्रीस तयार आहे.

### तेल.

१ जिनींग आईल. १ सिलींडर आईल
१ खोबरेल तेल. १ केरोसीन तेल.

### पट्टे

चामड्याचे पट्टे ३ इंची, १ ½ इंची, चामड्याची बारीक वादी.

चीनी काम.
प्याला रकाबी वगैरे.
एल्युमीनमचा बासण.
गाडीची घरची चरबी,

### रंग

व्हाईट लेड
व्हाईट झींक
ग्रीन सीस मीनरल
ब्राऊन पेन्ट
टरपेन टाईन वगैरे.

धनजीशा मोटाभाई दारूखानवाला आणि कंपनी आकोला

## मोरोपंत

निवडक वेंचे.
मागील अंकावरून पुढें चालूं
( शल्याचा पराक्रम )
अ. २

रक्तें न्हाला झाला,
फुलल्या पळसा समान तो लाल
बोलाला धन्य धन्यासि !
शल्य यशें जिष्णूशींच तोलाल ३६

( द्रोणवध संबंधीं. )
द्रो. पर्व ग. २१

आ[1]ल्या निवारणीं करि,
यत्न परि न योग्य राहिलें शस्त्र
त्या समयीं एकहि वा !
कुरु–गुरु[2]–हृदयांत न स्फुरे अस्त्र ३३
चारि दिवस एक निशा,
पंचम दिवस त्रिभाग पर्यंत
पुरले शर, सरले मग.
गुरुला कैसा घडेल अंत[3] ! ३४
द्रुपद सुतें सोडावा,
शर तों गुरु निकट भीम ये राजा
बोले उक्ति, वदवतिल.
न कधींहि तशा समीप येशो ज्या ३५
गुरुजी ! क्षत्रक्षय कां,
होता ? जरि न करितां तुह्मी युद्ध
शुद्ध स्वधर्म सोडुनि,
परधर्मी न प्रवर्तले शुद्ध ३६
धर्म अहिंसा गाचें
मूळ ब्राह्मण तुह्मींच हें कथिलें
रणा[6]ता पुढें कसें जी,
मिरवावें तेज आपुलें कथिलें ३७
परधर्मस्थ तुह्मी कां,
निज धर्मस्थां जनांसि बुडवीतां
जे चरणा शरणागत,
साष्टांग प्रणत त्यांसि तुडवीतां ३९
ज्या एका पुत्रास्तव,
अर्थ, अनय ही करुनि, जोडावा
तो मेला फळ झालें,
आजुनि तरि हा अधर्म सोडावा ४०
एवंविध भीमवचन,
परिसुनि मुनिराश जीवितीं होय
तों यज्ञसेन–सुत–भय,
धनु सोडी जीवितासही तोयें ४४

× × × ×

तों धनु ठेवुनि पार्षित,
धावे वेऊनि असि वधा त्यांच्या
आलें मनासि अरिच्या,
किंवा तें कर्म अशिवें घात्याच्या ४९
कौरव–कटकीं हा हा !
पांडव–कटकींहि होय बहु हा हा !
हा हा ! दश–दिग्भागीं,
ह्मणति वध न योग्य रुक्मवाहें हा ५०

१ द्रोण शत्रु धृष्टद्युम्न, त्याच्या. २ द्रोणाचार्य. ३ अरि–अंत, शत्रुनाश. ४ द्रोणाचार्यां समीप. ५ इतरास. ६ रुवें. ७ कथिलानें. ८ धृष्टद्युम्नाचें भय. ९ पाणी. १० धृष्टद्युम्न ११ तलवार. १२ द्रोणाचार्यांच्या. १३ अशुभ, अमंगळ. १४ सुवर्णरथ द्रोणाचार्य.

पार्थ रथावरुनि उडी,
टाकुनि धांवूनि शीघ्रतर वारी
तरि लाविलीच दुष्टें,
कंठीं, कच धरुनि शीघ्र तरवारी ५५
न वधावें ! न वधावें !
ऐसें म्हणतांहि तो महा पापी
कापी गुरुचें मस्तक,
तच्छोक सुरांसही बहु व्यापी ५६
तें कौरवांकडे शिर,
बहु गर्जुनि पार्षतें उडविलें हो !
यश सर्व बुडविलें हो !
गमलें पंकज पदें तुडविलें हो ! ५७
सुटतां पळ वळें देउनि,
ना ! जो वर्ळे-जलधि आवरायाचा
कुरुपे- गुरुपतन होतां,
प्रथमाचि त्यां जाय आव रायाचा ६२
कौरव बळ सकळ पळे,
त्यांत तुझा पुत्रही असा भिकर
तो ये अश्वत्थामा,
वीर, स्रोतोभिमुख जसा मकर ६३
करुनि शिखंडि-प्रमुख,
प्रबळ भटांसीं महासमर सटला
स्फुट लाजवुनि परांठीं,
आला तो कुरुबळाब्धि हा फुटला ६४
कुरुपतिस पुसे कां हो !
पळतां ! पळें[११]यांचियाचि सांगातें
ऐशा पलायनाचें,
जें काय निमित्त तूर्ण सांगा तें ६५
गुरु-शोकें गहिंवरला,
महिवैरें[१२] लाजे स्वयें कथायास
पाहे कृपाकडे तो,
सांगे गुरुहा[१३]निची कथा यास ६६

१ धृष्टद्युम्नाचें निवारण करी. २ कमल. ३ धीर. ४ सैन्यसागर. ५ द्रोणाचार्य पडतां. ६ दुर्योधनाचा. ७ संधि न करणारा. ८ प्रवाहाकडे मुख करून. ९ स्पष्ट. १० शत्रूंस. ११ पळणाऱ्यांच्या. १२ राजा दुर्योधन. १३ द्रोण पतनाची.

## वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ शुद्ध ११ शके १८२४

## जंगलखातें

वऱ्हाडच्या जंगलखात्याचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत १९००-०१ सालची त्या खात्या संबंधाची हकीकत आहे. वऱ्हाडचें जंगलखातें म्हणजे सव्वा दोन लक्षांपासून अडीच लक्ष रुपये पर्यंतची सरकारची जहागीरच होय. गेल्या चार वर्षांत या जहागिरीचें उत्पन्न पुष्कळसें खालावलें आहे. जंगलखात्याला हा प्रांत फारसा फायदेशीर नाहीं. बहुतेक जमीन लागवडींत आलेली असून चांगली सुपीक आहे. एकंदर प्रांताच्या क्षेत्रफळाच्या मानानें जंगलखात्याचा विस्तार ⅟₆ क्षेत्रफळावर आहे. एकंदर ३९९३ चौरस मैल जमिनीवर जंगलाचा विस्तार आहे. गेल्या चार वर्षांत जंगलखात्याच्या उत्पन्नांत एवढा मोठा फरक पडला आहे कीं, अडीच लक्षा जवळचें उत्पन्न १ लक्ष ३३ हजार रुपयांवर येऊन बसले आहे. ही तफावत दुष्काळामुळें पडली आहे. १८९६।९७ साला पासून पांच वर्षांचे आंकडे घेतले म्हणजे असें आढळून येईल कीं, या खात्याच्या वार्षिक खर्चाचें मान सव्वा दोन लक्षा पासून अडीच लक्षा पर्यंत आहे. या खर्चाच्या बाजूकडील आंकड्यामध्यें फार मोठासा फरक दिसत नाहीं. पण उत्पन्नाची बाजू सालोसाल अतिशय उतरत आली आहे. १८९६-९७ सालीं जंगलाचें एकंदर उत्पन्न ४,९६,७१७ रुपये होतें. तेंच उत्पन्न १८९९-१९०० त ४,२७,४७१ रुपये झालें; आणि रिपोर्टाच्या वर्षी १९००-०१ त हें उत्पन्न अगदीं थोडें म्हणजे ३,७१,१४५ रुपये झालें. दुष्काळाचे परिणाम जंगलखात्याच्या उत्पन्नावर दोन प्रकारचे घडले आहेत. प्रत्यक्ष दुष्काळ होतां तेव्हां गरीब लोकांच्या निर्वाहासाठीं पुष्कळशा सवलती दिल्या होत्या. त्यामुळें साग व इंधन याचें उत्पन्न पुष्कळ कमी झालें. या दोन्ही बाबींचें उत्पन्न दुष्काळ संपतांच पुन्हां वाढत चाललें आहे. दुष्काळाच्या वेळीं वनचराईचें उत्पन्न व गवताचें उत्पन्न पुष्कळच वाढलें होतें. १८९९-०० सालीं या दोन्ही बाबीपासून अनुक्रमें रुपये २,२९,-०३४ व १,२७,०३४ असें उत्पन्न मिळालें. पण दुष्काळांत जनावरें फार मरण पावलीं. जंगलांत चरणाऱ्या जनावरा पैकींच ५,३९,९०३ जनावरें दुष्काळांत मेलीं आणि त्या शिवाय एकंदर जनावरांचा संहार अंगावर कांटे उभे राहण्याइतका भयंकर झाला आहे. या संहारा प्रमाणें वनचराईचें व गवतविक्रीचें उत्पन्न फार कमी म्हणजे अनुक्रमें रुपये १,२०,७५६ व ३२,८४० या प्रमाणें झालें. हे आंकडेच सांगतात कीं गुराढोरांचा जो प्रचंड नाश झाला तो भरून येण्याला पुष्कळ वर्षे लागतील. दुष्काळाचे हे विपरीत परिणाम ध्यानांत धरण्या सारखे आहेत आणि इंडिया सरकारालाही ही गोष्ट कबूल आहे. गुरें ढोरें अधिक निपजावीं व त्यांची निपज चांगली सदृढतेची व उत्तम जातीची व्हावी या साठीं सरकारांतून कांहीं विशेष व्यवस्था होतील तर बरें. हा रिपोर्ट मि. ड्यागशा फारेस्टचे कानसरव्हेटर यांच्या हातचा आहे. यांच्या हातचा हा अखेरचा रिपोर्ट होय. यांनीं पेनशन घेतल्यामुळें जंगलखात्याची मोठी नुकसानी झाली आहे. हे साहेब फार दयाळू असून चांगले अनुभवी अंमलदार होते. त्यांची कारकीर्द रयतेला व त्यांच्या हाता खालील लोकांना मोठी सुखावह झाली. ईश्वरकृपेनें त्यांस पेनशनीचा लाभ दीर्घकाळ मिळून त्यांचें अवशिष्ट आयुष्य चांगल्या सुखासमाधानींत जावो!

## नवी ठरावबंदी

नवी ठरावबंदी या प्रांतांत अगदीं जलदीनें अंमलांत आली, तथापि या ठरावबंदीचें काम मध्यंतरीं दुष्काळामुळें बंद पडलें होतें. त्या तहकूब ठेवलेल्या कामाला पुन्हां लवकरच प्रारंभ होणार आहे. आतां मूर्तिजापूर, उमरावती व इलिचपूर या तीन तालुक्यांस नवीन ठरावबंदी लागूं करण्यांत येणार आहे. साऱ्याचे नवे दर सांगण्यांत येतील आणि या दरा प्रमाणें १३१२ फसली सालचा वायदा वसूलही करण्यांत येईल. नव्या दर ठरोतीची अंमलबजावणी पूर्वींच होणार होती परंतु दुष्काळाचें विक्राळ स्वरूप पाहिल्या बरोबर सरकाराला नवीन साऱ्याची सुनावणी तहकूब ठेवावी लागली. साऱ्याची रकम सर्वत्र वाढविण्यांतच आली आहे पण हा वाढवा रयतेला मोठा त्रासदायक होईल. दुष्काळामुळें लोकांची मोठी नादानी झाली आहे आणि ती नादानी दूर होण्या पूर्वींच नवी ठरावबंदी लागूं करण्यांत येत आहे या बद्दल वाईट वाटतें.

## श्री गोविंदजी

श्री गोविंदजीची मूर्ती हल्लीं विलायतेस गेली आहे. ही देवाची मूर्ती फार जुनी आहे आणि तिचा इतिहासही संस्मरणीय आहे. श्री गोविंदजी ही जयपूरच्या राजघराण्याची आराध्य देवता होय. जयपूरचे महाराज सध्यां राज्याभिषेकाच्या मंगल कार्यासाटीं विलायतेस गेले आहेत. श्रीमंत महाराज हिंदुधर्माचे मोठे अभिमानी आहेत. आणि हिंदुधर्माचे आचार विचार पूर्णपणें पाळतां येतील अशा व्यवस्थेनें ते हा सफर करीत आहेत. अर्थात महाराजांनीं आपलें कुलदैवत जी श्री गोविंदजीची मूर्ती तीही बरोबर नेली आहे. हिंदु देव विलायतेस नेण्याचें हें उदाहरण पहिलेंच होय. इंडियांतल्या प्रमाणें विलायतेसही श्री गोविंदजीची पूजाअर्चा यथासांग होईल असा बंदोबस्त श्रीमंत महाराजांनीं पूर्वींच केला आहे. श्री गोविंदजीची मूर्ती प्रथम वृंदावन येथें होती. वृंदावनास एक मोठें, भव्य, व अप्रतिम असें मंदिर आहे. तें मंदिर अलिकडे मोडकळीस येत चाललें आहे. वृंदावनास मोंगलाईत जेव्हां दंगा माजला आणि देवाच्या मूर्तीचा भंग होईल अशी भिती वाटली तेव्हां ती मूर्ती जयपूरास आणण्यांत आली आणि तेव्हां पासून त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा जयपुरासच झाली आहे. कालवशात् आज असा सुयोग आला कीं, ही मूर्ती इंग्लंडांत नेण्यांत आली आहे. आमच्या चक्रवर्ती एडवर्ड बादशाहांचें पुण्य फार मोठें आहे आणि म्हणूनच श्री गोविंदजी राज्यरोहणाच्या सुसमयाला आशीर्वाद देण्यासाठीं खुद्द लंडन नगरीला गेले आहेत. ईश्वर सर्वत्र आहे आणि मनोभाव चांगला दृढ धरला तर श्री गोविंदजी आमच्या बादशहास चिरकाल सुखसंपत्ती व प्रजासंतुष्टी यांची देणगी देतील आणि तसा सुयोग श्री गोविंदजी आणोत अशी आमची हात जोडून प्रार्थना आहे.

श्री गोविंदजीची मूर्ती विलायतेस नेली ही गोष्ट सामाजिक सुधारणेला मोठी हितकर होईल. समुद्रपर्यटण शास्त्रविरुद्ध नाहीं ही गोष्ट सर्वांस मान्य होत चालली आहे. तशात् या राज्याभिषेकाच्या मंगलकार्यानें तर विलायतचा प्रवास सुमंगल करून सोडला आहे. श्री गोविंदजीच्या सानिध्यानें सर्व पापें दूर होतील आणि समुद्रपर्यटणाला एक प्रकारचें चांगलेंच उत्तेजन येईल. हिंदुधर्माचीं मूल तत्वें फार चांगलीं आहेत आणि यांच्यावर दुष्ट चालीरितींचा जो जंग चढला होता तो दूर होऊन मूळचीं सुसंस्कृत तत्वें पुन्हां अंमलांत येत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. जग सुधरत आहे आणि या सुधारणेच्या ओघाला धरूनच आम्ही आपला मार्ग क्रमला पाहिजे. हिंदु धर्म विद्यमान काला बरोबर लोकांस नीटपणें नेत आहे ही उन्नत विचाराची दिशा आहे आणि आम्हांस पूर्ण भरंवसा आहे कीं श्री गोविंदजीच्या कृपेनें आमच्या पूर्वजांच्या नांवाला व कृतीला शोभेल व वर्तमान काळींही पूर्वींच्या वैभवशिखरापर्यंत आमची गती होईल असा भाग्यकाल आम्हांस लवकर प्राप्त होईल.

वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकाराकडे कसा देण्यांत आला याची थोडीशी हकीकत वाचण्यासारखी आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीला निजाम सरकारापाशीं फौजफांटा चांगला होता पण त्या सैन्यावरील अधिकारी फ्रेंच लोक होते. पुढें टिप्पू सुलतानाबरोबर जी लढाई झाली त्या लढाईमुळें इंग्रज व निजाम यांच्यामध्यें दोस्ती जमली व हळूं हळूं निजाम सरकाराकडून फ्रेंच अधिकारी कमी करवून त्यांच्या जागीं इंग्रजी अधिकारी नेमण्याला सुरुवात झाली. १९ साव्या शतकाच्या आरंभाला निजामच्या सैन्यांत इंग्रजी अधिकाऱ्यांचा शिरकाव पुष्कळ झाला. तथापि १८०८ मध्यें महिपतरामच्या सैन्यापुढें निजामचे घोडेस्वारास पळ काढावा लागला. या वेळीं रसेल साहेब रेसिडेंट होते. त्यांनीं युक्ति काढली कीं, निजामाचें सैन्य इंग्रजांच्या ताब्यांत असावें पण त्याचा पगार मात्र निजामच्या खजिन्यांतून दिला जावा. खजिना रिता असल्यामुळें पगार पोचता जात नसे व त्यामुळें १८१२ त शिपायांनीं बंड केलें. रसेल साहेबांस या बंडाची मोठीच संधी मिळाली. निजामांस त्यांनीं असें दर्शविलें कीं, सैन्य चांगलें राहण्याला पगार वेळच्या वेळीं पोंचला पाहिजे आणि निजामापाशीं तर पैसा नाहीं तेव्हां वुलियम पामर व कंपनी नांवाची धनाढ्य सावकार मंडळी होती तिनें दरमहा २० हजार पौंडा पर्यंत रक्कम त्याजीं द्यावी, व व्याज दरसाल २५ रुपये शेंकडा असावें असा ठराव करण्यांत आला. त्या वेळीं मुख्य सेनापतीलाच सालीना ५ हजार पौंड पगार द्यावा लागे आणि म्हणूनच निजामच्या सैन्यांत नोकरी मिळविण्यासाठीं पुष्कळ गोरे लोक जीव कीं प्राण करीत. अशा कर्जानें निभाव तो कसला लागणार आहे! रसेल साहेबामागून मेटकाफ साहेब रेसिडेंट झाले. हेच पुढें लार्ड मेटकाफ या नांवानें प्रसिद्धीला आले. १८२० च्या सुमाराला हेस्टिंग्ज साहेब गव्हरनर जनरल होते. त्यांच्या मंजुरातीनें कांहीं प्रांताचा वसूल सैन्याच्या खर्चाकडे तोडून देण्याविषयीं

तह करण्याचा घाट घालण्यांत आला. त्या वेळीं राजा चंदूलाल हे निजाम सरकारचे दिवाण होते. कलकत्ता शहरच्या सुधारणे साठीं ह्मणून या राजाच्या हातून मेटकाफ साहेबांनीं १६ लक्ष रुपयांची देणगी कबूल केली. राजा चंदूलाल हो ह्मणणार, इंग्रज सरकार घेणार, व निजामचे सावकार पामर कंपनी पैसा कर्जी देणार अशी व्यवस्था असल्यावर मग काय कमी! पामर कंपनीनें पुन्हां १८२० त ६० लक्ष रुपयांचें नवीन कर्ज दिलें. या ६० लक्षा पैकीं आठ लक्ष रुपये पामर कंपनीला दलाली ह्मणून देण्यात आली; ह्मणजे ६० लक्षा पैकीं रोख ५२ लक्षच रुपये निजामाच्या हातीं पडले. असें होतां होतां पामर कंपनी मोठी जबरदस्त होऊन बसली. ती कोणाचेंच ऐकेना तिच्या पुढें गव्हरनर जनरलचें तेज पडेनासें झालें. मेटकाफ साहेबांनीं वरिष्ट सरकाराला लिहून पामर कंपनीचें कर्ज तोडण्याचा विचार केला. एकंदर ८० लक्ष रुपये कलकत्ता सरकारानें पामर कंपनीला दिले आणि स्वतांच निजाम सरकाराचे सावकार बनले. ब्रिटिश सरकार सावकार बनल्याची गोष्ट कळली ह्मणजे पुढील इतिहास फार सोपा आहे. पामर कंपनी बाईट ह्मणून तिची सावकारी तोडण्यांत आली, पण सरकारच्या सावकारीपुढें कोणाचा इलाज चालणार आहे! ही सावकारी अशी विलक्षण निघाली कीं वऱ्हाड प्रांत स्वतंत्र तोडून घेण्यांत आला. आतां कर्ज शिल्लक नाहीं पण प्रांत निजामाला परत देण्या ऐवजीं कायमच्या कौल पट्ट्यानें वहितीला घेण्याचा विचार सरकारानें केला आहे. ही राजनीति मोठी अगम्य आहे आणि तिला कोणत्या विशेषणानीं संबोधावें हें आह्मांस समजत नाहीं.

## इंग्रजी अभ्यास

इंग्रजी भाषा ही जगाची मुख्य भाषा होऊन बसली आहे. इंग्रजी भाषेच्या प्रचारा इतका दुसऱ्या कोणत्याहि भाषेचा प्रचार नसेल. इंग्रजी राज्य जसें सर्व पृथ्वीभर पसरलें आहे तशी इंग्रजी भाषाही सर्व पृथ्वीभर चालते असें ह्मटलें तरी चालेल. अर्थात इंग्रजी येणें हें फार अगत्याचें आहे. किंबहुना ही भाषा ह्मणजे जगांतील सर्व ज्ञानाचा दरवाजा खुला करिते. अशा रीतीनें ही ज्ञान भांडाराची मुख्य किल्लीच झाली आहे. तशांत ती आमच्या राज्यकर्त्यांची भाषा आहे. आणि आजकालच्या स्थितीला तिचें अज्ञान असणें ह्मणजे एक प्रकारचा मोठा पंगूपणा होय. या गोष्टी चांगल्या लक्ष्यात घेऊनच आमच्या विद्याखात्यानें या भाषेला प्राधान्य दिलें आहे. अभ्यासामध्यें इंग्रजी हाच मुख्य विषय असतो आणि प्राथमिक शिक्षणाची चार वर्षें खेरीज करून बाकीचा शिक्षणाचा काल इंग्रजी भाषेच्या अभ्यासांतच जातो. इंग्रजी भाषेचें असें हें दांडगें अध्ययन फार झपाट्यानें चालूं आहे. पण नवल हें कीं, इंग्रजी भाषा जशी लिहितां वाचतां यावी व समजावी तशी मात्र ती अवगत होत नाहीं. इंग्रजीच्या अभ्यासामध्यें एवढी व्यंगता रहावी हें आह्मांसहि मोठें गूढ आहे. ही भाषा शिकण्यासाठीं णाहि साक्ष देईल. त्यांच्या परिश्रमांत कांहीं खंडेरणा नाहीं. इंग्रजी ग्रंथमालाहि फार सुंदर असतात त्या पायरी पायरीनें शिकाव्यात ह्मणजे इंग्रजीचें ज्ञान उत्कृष्ट होईल अशी त्याची रचना आहे. पूर्वी पेक्षां इंग्रजी शिकविण्याला शिक्षक वर्गहि चांगला असतो. जाडे जाडे विद्वान् ही भाषा शिकवीत असतात. अर्थात् अध्यापक चांगले, व अध्ययनाचा विषयहि मोठा महत्वाचा असून त्या संबंधीं ग्रंथसंग्रहहि चांगला आहे. विद्यार्थ्यांचा सर्व काल व परिश्रम याच विषयाच्या अध्ययनांत खर्च होतात. असें हें उत्कृष्ट संमेलन असून परिणाम विपरीत दृष्टीस पडतो. याचा दोष आमच्या दृष्टीनें प्रस्तुतच्या शिक्षणक्रमांतच आहे. आमच्या मतें इंग्रजी भाषा शिकण्याचा सध्याचा प्रचलित पंथच अगदीं चुकीचा आहे. प्रस्तुत क्रमांत भाषा शिकवितांना भाषेच्या व्याकरणाकडे व वाक्य मीमांसेकडे अतिशयच लक्ष्य दिलें जातें. व्याकरणाच्या पठणाचा इतका अतिरेक होतो कीं त्यामुळें भाषा शिकण्याची जी मूळ गोष्ट तीहि विसरली जाते. व शेवटीं परिणाम असा होतो कीं, लिहितांना व बोलतांना आपली भाषा व्याकरणदृष्ट्या शुद्ध आली कां अशुद्ध आली, हें पाहण्याच्या खटाटोपांतच भाषेचें सौष्टव लयास जातें. आमचा अनुभव असा आहे कीं, मॅट्रिक्युलेशन पर्यंत अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांसहि चार वाक्यें नीटशीं लिहितां किंवा बोलता येत नाहींत. असाच गोंधळ कालेजांत शिकलेल्या विद्यार्थ्यांचाहि होतो असें प्रसंग पडल्यास दिसून येईल. मोठमोठ्या ग्रंथांतील सुंदर वाक्यें त्यास मुखोद्गत येत असतात आणि पुष्कळ विषया संबंधानें त्यांस अंतर्ज्ञानहि झालें असतें, पण या अंतर्ज्ञानाची परिस्फुटता शब्दद्वारा करण्या इतकी त्यांच्या जवळ भाषेची पुंजी नसते असें अनेक प्रसंगीं कळून येईल. वर निर्दिष्ट केलेला दोष जितका लवकर दूर केला जाईल तितके आमच्या विद्यार्थी वर्गावर मोठे उपकार होतील.

## The Berar Samachar

MONDAY JUNE 16 1902

The Boer War leaves a great moral behind. It repeats an old lesson of history. The law of self—respect asserts itself as the real life—pulse of a nation. The small republican of Transvaal fought a great war of independence. It was a war in which the whole humanity did stagger at the loss of blood. It was fought against one of the greatest nations in the world. Independence was lost in the battle but short of it, every point was gained by the Boers in the final peace. The peace is something like a compromise to which both parties agreed with a due sense of their self—respect. In the eloquent words of Lord Rosebury, it was not a peace effected by the conquerors with their crushed foes but it was a peace effected to change brave foes into honorable friends. This is the key—note of the terms of the peace and we congratulate the Boers upon the success with which they consonance with self—respect. The war was fought with wonderful heroism and it would never come to a close unless the British people admitted the enemies to the full measure of privileges of citizenship. The enemies were prepared to fight to the last man. It is this lesson of self—respect which we learn from the history of this short but admirable war. No nation shall thrive well unless its members honor this grand truth of self—respect. The pulse of national life beats well with the proper appreciation of the great law o self—respect. It is this hobby about the dignity of self which has built up the nations in the world. The histories of great countries will point to the self—same truth. The right discharge of all duties depend upon the proper understanding of this truth. It is rather intuitively that we have to see in the pages of history the foot-prints of self—respect We should have it as the greatest legacy of our forefathers and we should not fail to sanctify their memory with the homage that we shall be paying to this grand law of national life. Self—respect is another word for worshipping the god in man. It is the highest ideal of human life which we should worship in the heart of our hearts. We shall not fulfil our duties as members of one nationality if we do not stand the test of self—respect. The liabilities of this test are rather onerous but we shall be able to discharge them if we subordinates the animal man to the dictates of our supreme ideal. The Boer war illustrates how righteous the ambition of the Transvallers was and how bravely they fought for it. We request our people to learn well this law of self—respect. The fall of our nation will be the crucial test of proving to mankind that the loss of self respect brings on degeneration, and nations dwindle away before the violent effects of degeneration. We are in touch with the civilization of the West and we shall be keeping pace with progress if we learn a—new the ways of respecting our own dignity. It is the loss of self—dignity that we have to mourn at present and unless we mould our character on the basal foundation of self—dignity we shall not hope to achieve success in any run of life private or public. Let us hope that the Boer war is not lost upon us.

Mr. Dutt indicates four main lines of remedy for the deplorable conditions that his survey has revealed:—

(1) Retrenchment—such as was effected by Bentinck. Reduce the enormous public debt; reduce the enormous military expenditure; and reduce that Economic Drain which is taking away from the people of India, year by year, the food of twenty millions of poor people without a direct equivalent.

(2) Promotion of Agricultural Wealth. Limit the Land Tax by some rules, such as were proposed by Wellesley, Minto, and Hastings. And Irrigation, not Guaranteed Railways, should be India's future policy.

(3) Revival of the National Industries.

(4) Admission of the people into a real share of the administration—such as was first effected by Munro, Elphinstone and Bentinck "

## वऱ्हाड

हवामान— पाऊस नाहीं. वारा सोसाट्याचा सुटतो, पण ढग जितके एकत्र जमावेत तितके जमत नाहींत. हवेंत एक प्रकारचा थंडपणा वाटूं लागला आहे. मुंबईकडे पावसाळ्याला प्रारंभ चांगला जोरदार झाला आहे त्या वरून पुढील आठवड्यांत या प्रांतींही चांगला पाऊस होईल असा रंग दिसतो. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं. सार्वजनिक आरोग्य चांगलें समाधान कारक आहे.

आनंदाची खबर— इलिचपूरचे डिपुटी कमिशनर मि. सिम्पसन साहेब हे चिखलदऱ्याच्या डोंगरावर वाघाची शिकार करीत असतां एका जखमी झालेल्या वाघानें त्यांस पुष्कळ घायाळ केलें. वाघाच्या शिकारींत साहेबांचीच शिकार होण्याचा कठीण प्रसंग आला होता; इतकेंच नाहीं तर साहेब बहादुरांच्या मरणाचीहि बातमी येथें येऊन पोंचली होती. स्वतांची मरण वार्ता ऐकण्याचें भाग्य विरळा प्राप्त होतें! मि. सिम्पसन यांच्या प्रकृतीला चांगला आराम पडत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. मि. सिम्पसन यांचा अपमृत्यु टळला ही ईश्वराकृपा!

रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर, एक्स्ट्रा असि. कमिशनर हे रजेवरून परत येऊन आज येथील कोर्टावर दाखल होणार आहेत.

सर्कस— येथें वाघ, हत्ती, घोडे इत्यादि जनावरांचें वडगांवकरांचें सर्कस आलें आहे. दररोज खेळ चांगले होत असतात.

नोटीस

बेशमी रा. कस्तु वल्लद तुकाराम पाटील राहणार शाहापूर ता० खामगांव पोस्ट वाडेगांव यास.—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं, सरोंर दोन वर्षांपूर्वीं मी तुमच्या कडून शंभर रुपये कर्जाऊ काढले होते व त्याबद्दल तारण गहाणखत लिहून दिलें होतें. पुढें आज दोन तीन महिने होत आले, मी तुमची हिशोबानें सर्व व्याजासुद्धां रकम चार पांचा समक्ष चुकती केली. त्या वेळीं रुपये पावल्या बद्दलची भरपाई पावती आणि लिहून दिलेलें गहाणखत मागितलें तेव्हां तुह्मी तें मागाहून देऊं ह्मणून सांगितलें. पण अद्याप पर्यंत देत नाहीं. यावरून तुमच्या मनांत कांहीं खोटी बुद्धी आली आहे असें दिसतें. ह्मणून या जाहीर नोटिशीनें कळवितो कीं आठ दिवसांच्या आंत गहाणखत परत द्यावें. तें गहाणखत आतां पोकळ झालें आहे. असें न करितां पुढें मागें या बातल झालेल्या गहाणखता वरून फिर्याद अर्याद कराल व विना कारण आह्मांस खर्चांत व त्रासांत पाडाल तर त्याचीं सर्व नुकसानी तुह्मांपासून भरून घेतली जाईल. कळावें तारीख १४ माहे जून सन १९०२ इ०

(सहीची निशाणी)

खंडू वल्लद बाबूजी गवळी जात माळी राहणार शाहापूर याचे हातची रेघ.

## वर्तमानसार

न्या. चंदावरकर याचा विलायतेंतील सन्मान–ज. फेवेल, ज. लॉरेंस, सर आर्थर केकविच इत्यादि तिकडील न्यायाधिशांच्या कोर्टांत ते गेले असतां त्यांनीं न्यायमूर्तींस बेंचावर आपल्या सन्निध बसवून घेतलें; कित्येकांनीं मेजवानीस बोलाविलें. टूथ पत्राचे एडिटर मि० लाबुशायर यांचेवरील खटला त्यांनीं ऐकला. पार्लमेंटमध्यें दोनदां वादविवाद ऐकिला. रायल सोसायटीनेंही त्यांचा बहुमान केला. लंडनच्या मेयरनें तर त्यांस इंग्रजी न्यायमूर्तींना होणाऱ्या मॅनशन हाऊस मधील मेजवानीस बोलाविलें आहे! तां० ३० रोजीं इंडिया ऑफिसमध्यें झालेल्या 'स्टेट बॅकेट' ला लॉर्ड जॉर्ज हामिल्टन साहेबांनीं त्यांस बोलाविलें, हा तर बहुमानाचा कळसच झाला!

व्यर्थ खर्च–१२ लक्ष रुपये खर्चून सिमला येथें सेक्रेटरिएट साठीं इमारत बांधण्याचें ठरलें आहे आणि इकडे ५ लक्ष लोक रिलीफ कामावर आले आहेत! 'Waste not, want not' ही म्हण उत्तम आहे; पण ती शाळेंतल्या मुलांकरतां आहे, सरकाराकरतां नाहीं!

येत्या डिसेंबर महिन्यांत अमदाबादेस भरणाऱ्या राष्ट्रीय सभेबरोबर जे राष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन भरावयाचें आहे त्याचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल श्री० सयाजीराव महाराज गायकवाड यांस विनंती करण्याकरितां डेप्युटेशन गेलें आहे.

भाग्यवान खरे– प्रिटोरियावर निशाण लाविल्या बद्दल लॉर्ड रॉबर्टस् यांस एक लक्ष पौंडाची देणगी पार्लमेन्टनें दिली. आतां लॉर्ड किचनेर यांस ५० हजार पौंडांची देणगी देण्याबद्दल राजेसाहेबांनीं पार्लमेन्टास शिफारस केली आहे व ती मंजूर होईलच. शिवाय लॉर्ड साहेबांस व्हायकाऊन्ट करण्यांत येणार आहे. लढाईच्या बातम्याकडे पाहिलें तर लॉर्ड किचनेर यांनीं आपलें शौर्य ट्रान्सव्हालमध्यें दाखविल्याचें एकही उदाहरण सांपडत नाहीं. तह घडवून आणिल्याबद्दल त्यांना देणगी दिली पाहिजे म्हणावें तर या कामीं त्यांचे हातून सही शिवाय कांहीं चातुर्य खर्च झालेलें दिसत नाहीं. सारांश, रयतेचे इतके पैसे देण्यासारखी जगप्रसिद्ध कामगिरी लॉर्ड किचनेर यांचे हातून झालेली दिसत नाहीं; पण मद्रासच्या "हिंदु" पत्रानें म्हटल्याप्रमाणें लॉर्ड किचनेर हे "child of fortune" भाग्यवान् असल्यामुळेंच त्यांना सोदनच्या लढाईबद्दल ३०००० पौंड व या लढाईबद्दल ५०००० पौंड मिळालें!

काबूलच्या नवीन अमिरानें माझरी शरीफ येथें मोठी तटबंदीची कॅंप बांधून तेथें आपल्या राज्याचे बचावाकरितां आपलें मोठें काबुली सैन्य कायमचें ठेवून देण्याचें ठरविलें आहे असें पाहून अमीरच्या सदर्हू कृत्याबद्दल पुष्कळ इंग्रजी पत्रांनीं आपली पसंती दर्शविली आहे

हटयोग चमत्कार– हिमालयांतील योगी अद्वैतानंद नांवाचे एक महात्मे हल्लीं मुंबईस आले आहेत. सर भालचंद्र वगैरे वैद्य मंडळीस त्यांनीं हट योगाचे चमत्कार करून दाखविले त्यांनीं ५० मिनिटें समाधि लाविली होती. समाधीच्या स्थितींत नाकावाटें ... आहे किंवा नाहीं हे पाहण्याकरितां त्यांचे नाकापुढें आरसा धरला हाता. परंतु श्वासोश्वासाचें कांहीं एक चिन्ह दिसलें नाहीं. समाधीचे वेळीं सर्व स्तब्ध झालें होतें. त्यांचें शरीर ताठ बनलें होतें आणि डोळ्यांतील बाहुल्याही अगदीं स्तब्ध झाल्या हात्या. समाधि उतरल्या नंतर सर भालचंद्र ह्यांनीं त्याच्या योगाभ्यासाबद्दल स्तुति करून त्यांचे धन्यवाद गायिले.

सोन्याचीं खाण– धारवाड जिल्ह्यांत गदग नांवाच्या गांवाजवळ सोन्याची खाण सांपडण्याचा संभव आहे तेथील मातींत एक मण सोळा शेरांत ४७ तोळे सोनें सांपडेल. यावरून ही खाण किती घवत्तर आहे हें समजेल. ही खाण तरी या देशांतील लोकांच्या हातून चालो अशी आम्ही इच्छा करितों.

आश्चर्यकारक शोध– या शोधाचे सहायानें मोठमोठाल्या पर्वताचे विजेच्या शक्तीनें चूर्ण होऊन त्यांत असणारे लोखंड सोनें वगैरे धातु अशोधित स्थितींत निराळे एका ठिकाणीं होऊं शकतात.

ढेकणांचा पिंजरा– अमेरिकेच्या लोकांनीं ढेकूण पकडण्या करितां एक प्रकारचे पिंजरे तयार केले आहेत. त्याचे योगानें ढेकणांचा त्रास चुकतो असा तिकडे अनुभव आहे. हिंदुस्थानांत हा पिंजरा येईल तर बरें होईल.

कोण परावाधीनपणा हा—श्री०होळकर सरकारची स्वारी हवाफेर करण्याकरितां महाबळेश्वरीं गेली होती, परंतु चोवीस तासांच्या आंतच श्रीमंताची स्वारी आपल्या राजधानीस परत निघून गेली. असें म्हणतात कीं, ६० मनुष्यें बरोबर नेण्याची परवानगी असतां ह्यांनीं आपणाबरोबर ६७ माणसें नेली होती, सबब तेथील अधिकाऱ्यांनीं त्यांस मनाई केली.

चीन जागें होत आहे–– 'बाटलेल्या चिनी लोकाचा इन्साफ चिनी कायद्या प्रमाणेंच होईल; ह्या खटल्यामध्यें युरोपियन मिशनऱ्यांनीं बिलकूल ढवळाढवळ करूं नये. समुद्रकिनाऱ्यावरील खेरीज करून इतर शहरांत जर मिशनऱ्यांनीं घरें विकत घेतलीं तर त्यांचा धर्मावांचून इतर कामीं उपयोग होऊं नये. मिशनरी लोक चर्चमध्यें काय करतात हें तेथें वाटेल तेव्हां जाऊन पाहण्यास चिनी अधिकाऱ्यांस अधिकार आहे;' असा एक कायदा चिनी सरकारानें केला आहे.

उशाशी सर्प— नेमाडचे सेटलमेंट आफिसरचे उशास एक सर्प रात्रभर असून त्यांना चावला नाहीं. सकाळीं वळकटी करते वेळीं तो सर्प निमुटपणें निघून गेला. हें अरिष्ट टळल्यामुळें त्यांनीं दुसरें दिवशीं दानधर्म केला.

चाल— एकमेकास सलाम करावयाचा म्हणजे परस्परांनीं गालास गाल लावणें अशी चाल अरबस्थानांत आहे.

पाण्यावरून चालणारी बायसिकल:— जमिनीवरून चालणाऱ्या बायसिकल प्रमाणें पाण्यावरून चालणारी बायसिकल निघाली आहे. फार मजेची गोष्ट आहे.

सोय— इस्टर्न बंगाल स्टेट रेलवेच्या मॅनेजरनीं नेटिव्ह उतारूंची गैरसोय दूर करण्या करितां मोठमोठे स्टेशनवर रिफ्रेशमेंट रूम्स उघडण्याची व्यवस्था केली आहे. याचें श्रेय लार्ड कर्झन साहेबांस आहे. सर्व रेलवेवर अशीच सोय व्हावी.

अद्भुत केळीचें झाड––डुर्बेगा येथील अजबखान्यात प्रेक्षणीय केळीचें झाड ठेविलें आहे. हें झाड दोन फूट उंचीचें असून त्यास १ इंच लांबीचें केळ आलें आहे. लहानसा कोका वगैरेसह तें झाड पाहण्यासाठीं ठेविलें आहे.

बाबु कनय्यालाल यांचें औदार्य–– जगन्नाथपुरी येथील यात्रेकरू लोकांचे सोई साठीं बाबू कनय्यालाल बोगळे यांनीं तेथें कांहीं जागा बांधण्या करितां १०००० रुपयांची रकम सरकारचे स्वाधीन केली आहे. धार्मिक खरा.

ना० साहेबांचें औदार्य— ना० लार्ड कर्झन साहेब यांनीं दुष्काळ पीडित लोकां करितां एक हजार रुपये धर्मार्थ दिले आहेत. व इतरांनीं अशीच कांहीं मदत करावी अशी त्यांची इच्छा आहे.

लग्नाचा दलाल— इताली देशांत लग्नें जुळवून देणारांची एक संस्था आहे. या संस्थेतील दलाल लोक आपल्याजवळ अविवाहित मुला मुलींचीं रजिस्टरें ठेवतात व त्या संबंधीं इतर माहितीही मिळवितात. लग्न जुळवून दिलें म्हणजे त्यांना कमिशन व बक्षीस मिळतें. आपल्या इकडेहि अशी एजन्सी कोणी तरी काढावी.

नाक कापलें–कलकत्याच्या एका बाबूची न्हाव्यानें हजामत केल्यावर बाबूंनीं त्याला बरोबर पैसे दिले नाहींत म्हणून न्हाव्यानें वस्तरा काढून चटकन बाबूंचें नाक छाटलें व त्यास सहा महिन्यांची शिक्षाही झाली.

एका प्रसिद्ध कैद्याचा मृत्यु– सुंदर उर्फ प्रेमसिंग नांवाचा मनुष्य तेरा वर्षांची कैदेची शिक्षा भोगीत असतां मरण पावला. हा कैदी चार वेळां तुरुंगाच्या खिडक्यांचे गज वाळूं व दोरी किंवा घड्याळाची स्प्रिंग यांच्या साह्यानें कापून पळून गेला होता. घड्याळाची स्प्रिंग तो तोंडांत बाळगीत असे असें म्हणतात बहादर खरा!

हिंदुस्थानांतून गेलेल्या राजांचे प्रदर्शनांत काय दिसेल?—ही सर्व शोभेचीं सजीव बाहुलीं आहेत. यांच्यांत खूप डामडौल आहे पण कर्तृत्व कांहीं नाहीं. यांस पारतंत्र्यांत सौख्यनिधी वाटतो. आणि मनुष्य जातीचा जो मानी स्वभाव त्याचा सर्वस्वी लोप यांच्या ठायीं दिसतो.–अशा तऱ्हेचें प्रदर्शन आपले राजे न करोत इतकेंच.

### अनिष्ट भविष्य

हिंदुस्थान काय शिकेल तर (१) राजे लोकांस पाश्चात्यचैनीचो संवय लागेल, (२) ते हल्लीं पेक्षां जास्त उधळे व ख्याली निपजतील (३) गौरांगनांशीं शरिर संबंध जुळण्याचा योग घडवेल (४) हिंदुस्थानात रहाण्यापेक्षां इंग्लंडांत रहाणें हेंच ह्यांना चांगलें वाटेल, (५) पूर्वेकडील आचार व विचार यांस विरजण पडेल, (६) हिंदुस्थानांतून इंग्लंडास पैसा जाण्याचीं नवीन द्वारें मोकळीं होतील व (७) हिंदुस्थानातील मुक्या व गरीब प्रजेच्या स्थितीकडे ह्यांचें दुर्लक्ष्य होईल. मी आपल्या राज्याला इंग्लंडाप्रमाणें संपतिमान बनवीन, अशी प्रतिज्ञा करून तिकडून एकही राज्यकर्ता इकडे यावयाचा नाहीं व आपल्या त्याच्या हातून ह्या देशाचें कल्याणही व्हावयाचें नाहीं. ईश्वर करो व हें सर्व खोटें ठरो.

### चांगला उपदेश

आपली जीभ, आपली इच्छा आणि आपला क्रोध स्वाधीन ठेवा.

आपली अब्रू, आपलीं माणसें आणि आपला देश या साठीं भांडा.

उत्तम पुस्तकें, उत्तम संगती आणि उत्तम स्वभाव संपादन करा.

आळसांतील दूष, व्यर्थ बडबड व अश्लील थट्टा सोडा.

मान, ज्ञान आणि गायन ह्यावर प्रेम करा.

---

### नोटीस

बेशमी सिवराम वल्लद पुंजाजी हिवराळे राहणार मौजे मांडव बुजरूक तालुके व पेठ बाळापूर जिल्हे आकोले यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तू माझा लग्नाचा नवरा असून लग्नास सारासरी १४ वर्षे झालीं व मजला ऋतु प्राप्त होण्यास ६ वर्षे झालीं इतक्या दिवसात तुम्ही पाच साहा वेळ आपले घरीं नेलें. परंतु चांगल्या प्रकारें मजला न वागवितां विनाकारण मारहाण करून खाण्यापिण्यास न देतां उपाशी ठेवीत होता. व नेणेकरून मी तुमचे घरीं न राहीन अशा तऱ्हेची तकलीफ मला देत होता. ही गोष्ट बहुतेक गांवकरी लोकांस माहीत आहे. इतकाही जाच सोसून मी हरएक तऱ्हेनें वागण्यास तयार असून तुम्ही माझा अंगिकार न करितां १ वर्षा पूर्वीं दुसरी मोहातिराची बायकोही केली. यावरून आतां मला तुम्ही नांदविता अशी आशाही मुळींच राहिली नाहीं. शिवाय माझ्याहि मनांत आपल्या बरोबर यापुढें संसार करावा अशी बिलकुल इच्छा नाहीं. करिता कळवितें कीं मी आई बापाचे घरीं राहिल्यापासून खाण्यास व कपडा वगैरे करिता मी काढलेली सावकारी रकम रुपये ३०० देऊन लेखी फारकती द्यावी. असें करण्यास तुम्हांस आठ दिवसांची मुदत दिली आहे. ह्या मुदतींत वरील प्रमाणें निकाल न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा गंधर्व लावीन यांत अंतर पडणार नाहीं. मग मात्र तुमचा मजवर नवरेपणाचा वगैरे कसलाहि हक्क चालणार नाहीं. शिवाय इतके दिवसांच्या पोटगीच्या रुपयाबद्दल सरकारांत दावा करून अखेर निकालापर्यंतच्या खर्चासह सर्व रक्कम भरून घेईन म्हणून अगाऊ या जाहीर नोटिशीनें कळविलें आहे. कळावें तारीख १२ माहे जून सन १९०२ इ०

सहीची निशाणी
सजन मर्द शिवराम हिवराळें राहणार
वाडेगांव ता. बाळापूर हिचे
हातची बांगडी.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

| | | | |
|---|---|---|---|
| सहामाही | ,, २ | ,, | ८८ |
| साल अखेर | ,, ७ | ,, १ | ८८ |

किरकोळ अंकास ........................६४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........६१ ०६

दुसरे खेपेस ..... ......६१

Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly.........3 ............... 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
Below 10 lines...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line.,. 8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 23 JUNE 1902 NO 24

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २३ माहे जून सन १९०२ इ० अंक २४

### NOTICE

Applications are hereby invited for the post of an overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 31—5—02 } V. M. Mahajani
Vice-Chairman
M. Committee
Akola.

---

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तें दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson
Agent.


---

### खरेदी करा !
### रास्कोपचीं थेट व खरीं पेटंट वाचेस
### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्यास आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची

रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं या-हून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ..................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें..................२०
१९ ,, हंटिंगचें ..........................२०
१४ ,, रिस्ट वॉच ..........................२०

**इनामल मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस ............२०
१९ ,, हंटिंग..........................२०
१४ ,, रिस्टवॉच..........................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग..........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ..................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ....................४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हॉनीगर आणि कंपनी,**
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

### जाहिरात

म्युनिसिपाल निवडणुकीचे नियमातील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं आकोले मुनिसिपल कमिटीतील वार्ड नंबर २ करितां निवडलेले मेंबर मि० सलिमखा दाउतखा हे मयत झाल्यामुळें खाली झालेली जागा भरण्या करितां ग्रेन-मार्केट आफिसांत तारीख ११।७।१९०२ इसवी रोजीं सकाळचे ७ वाज पासून सायंकाळचे ५ वाजे पर्यंत निवडणूक होणार आहे. उमेदवाराचे नांवचे कागद मे० रामचंद्र नारायण देशपांडे ए० अ० कमिशनर आकोला हे ता० ३।७।१९०२ इसवीचे आंत घेतील. ता. १६।६।१९०२

V. A. Kane.
सेक्रेटरी.
म्यु० कमेटी आकोला.

---

### NOTICE

Under rule 12 of the Municipal Election Rules, it is hereby published for general information that an election to fill up the vacancy caused by the death of Mr. Salimkhan Daudkhan an elected member of the Akola Municipal Committee for Ward No. II will take place from 7 A. M to 5 P. M. on the 11th. of July 1902 at the Grain Market Office.

Nomination papers will be received by Mr. R. N. Deshpande Extra Assistant Commissioner Akola before the 3rd. July 1902.

Akola 16th. June 1902 } V. A. Kane
Secretary
Municipal Committee
Akola.

---

### नोटीस

बेशमी रामराव वल्लद मारुती पाटील राहणार दहिहांडा यांसः—

या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी बिगारीच्या कामाला ह्मणून माझा पुतण्या गणपत वल्लद लखमाजी चोखंडे यांची बंडी एक व पांढरा व काळा कबरा अशा दोन रंगाची बैलजोडी नेली आहे. तुह्मी अजून बंडी व बैल जोडी परत दिली नाहीं आणि उलटी बतावणी करीत आहा कीं बंडी व बैल जोडी म झ्या कडून १०५ रुपयाला विकत घेतली आहे. ही गोष्ट अगदीं खोटी व लबाडीची आहे. मी तुह्माला बंडी व बैलजोडी विकली नाहीं. व मी माझ्या पुतण्या पासून निराळा पृथक-ळ वर्षांपासून आहे. मला बंडी व बैलजोडी विकण्याचा अधिकारही नाहीं. तुह्मी बंडी व बैलजोडी ही नोटीस पोचल्या पासून चार दिवसांच्या आंत माझा पुतण्या गणपत याच्या स्वाधीन करावी. तसें करण्यास चुकल्यास मी तुह्मावर दगलबाजी केल्या बद्दल फौजदारींत फिर्याद करीन आणि नोटिशीच्या खर्चा सुद्धां सर्व नुकसानी तुह्मा कडून भरून घेण्यांत येईल. कळावें. तारीख १७ जून सन १९०२ इसवी.

(सही)
महादू वल्लद कान्होजी
चोखंडे राहणार दहिहांडा
निशाणी रेघ

---

### नोटीस

बेशमी आवाजी साबळे कुणबी राहणार अत्री ता० बाळापूर पोस्ट—बाळापूर. यासः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, तुह्मी वर्ष सवा वर्षा पूर्वी सरकारांत अर्ज दिला होता त्या वेळीं तुमची मुलगी ह्मणजे माझी बायको नांवें यशोदा हीस माझ्या घरीं संसार करण्यास धाडून देऊं असें सरकार पुढें तुह्मी कबूल केले होत. असें असतां आपण होऊन तिला तर माझे घरीं आणून घातलें नाहींच, पण उलटें मी स्वतः तीन चार वेळ घेऊन जाण्यास आलों असताही तुह्मी तिला मज बरोबर पाठविली नाहीं. असो आतां आठ दिवसांच्या आंत माझ्या बायकोला माझ्या घरीं आणून घालावें. असें करण्यास चुकाल तर सरकार मार्फत तिला ताब्यांत घेण्याची तजवीज करीन व या कामीं जो खर्च व नुकसानी होईल ती तुमचे पासून भरून घेतली जाईल. ह्मणून अगाऊ या जाहीर नोटिशीनें कळविलें आहे. कळावें तारीख १६ जून सन १९०२

सहीची निशाणी
नरसू वल्लद बहिराजी कुणबी लासूर
कार वस्ती मौजे टाकळी बुद्रुक
ता-आकोट पोस्ट दहिहंडा
यांचे हातची रेघ.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ३ शके १८२४

## पाऊस पाणी

सध्यां पाऊस पाण्यासंबंधानें बातम्या लोकांस विशेष पाहिजे असतात आणि ज्या ज्या भागांत अद्याप पाऊस नाहीं तेथें तर सर्वतोमुखीं पावसा संबंधानेंच गोष्टी चालत असतात. पावसा संबंधानें अनुमानें करण्यांत सर्व लोक निमग्न आहेत. मागील दुष्काळाच्या अनुभवानें ही अनुमानें अगदीं अनिश्चित वाटतात. आणि कशावरही भरंवसा न बसतां एका प्रकारची चिंता किंबहुना हरण काळजी मनास लागते. आपल्या देशी पचांगा प्रमाणें हें साल धान्य समृद्धीचें होईल. पण कांहीं भविष्यें विपरीतहि ऐकूं येतात तथापि सरासरीनें गोळा बेरीज घेतां चालूं संवत्सरांत आबादानी राहील असा तर्क आहे. पाऊस पाण्या संबंधानें सरकारहि आपलें अनुमान काढीत असतें व हें अनुमान शास्त्रीय रीतीचें असतें. हिमालयावर बर्फ किती पडेल, आरबी समुद्रांत व तसेंच बंगालच्या उपसागरांत पाऊस आणणारा कितपत वारा आहे. तो वारा पश्चिमेकडून येणाऱ्या आगबोटींना कसा काय लागतो, समुद्रावर कोठें तुफान होतें इत्यादि गोष्टी सालोसाल नमूद करून ठेविलेल्या आहेत. आणि पश्चिमेकडून येणारा वारा व हिमालयावर पडणारें बर्फ यांच्या मुळें हिंदुस्थानच्या वातावरणांत जे फेरफार होतात ते पाहून पाऊसपाण्या संबंधानें सरकार आपलें अनुमान बांधीत असतें. अंधारांत जशी उडी टाकावी त्या प्रमाणेंच हें अनुमान असतें हें खरें, तथापि सरकारी अनुमान जितके वेळां खोटें होतें तितके वेळां ते खरेंहि असतें. ह्मणून सरकारी अनुमान काय आहे हें समजून घेण्याकडे आमची धांव विशेष असते. दरसाल हें अनुमान प्रसिद्ध करण्यांत येत असें पण तें तसें प्रसिद्ध करणें पुष्कळदां अपाय कारक होतें असा गेल्या दुष्काळांत अनुभव आल्या वरून तें सरकारातून प्रसिद्ध करण्याचें काम बंद झालें आहे. पण वर्तमानपत्रें हजारों तऱ्हेनें अशा बातम्या बाहेर काढण्याला उद्युक्त असतात. आणि आंग्लो इंडियन पत्रकारांना तर सरकारी बातमी कोणचीच गुप्त नसते. किंबहुना कांहीं पत्रें सरकारचीं आश्रितच असतात. ह्मणून अलेरीला पाऊस पाण्या संबंधीं सरकारी अनुमान इंग्रजी पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे पण तें असावें तितकें विस्तृत नाहीं. हें अनुमान असें सांगतें कीं आजपर्यंत कोलंबो, मुंबई, पुणें, कराची, पंजाब, वायव्य प्रांत, व बंगाल इलाखा इत्यादि भागामध्यें जो थोडा बहुत पाऊस झाला तो अगदी आकस्मिक झाला आहे. तो खरा पावसाळा नमून समुद्रावर जें एक मोठें वादळ झालें त्याचा तो परिणाम होय. बरसात सुरूं होण्याला पश्चिमे कडून येणारा अनुकूल वारा असावा लागतो त्याला अद्याप प्रारंभ झालेला नाहीं. हा वारा आरबी समुद्रांतील आपल्या मूळच्या रेषेपासून बराच चलित झाला आहे. यंदाचे सालीं मध्य हिंदुस्थानांत पाऊस बराच कमती होईल असा तर्क आहे. अर्थात या कमी होणाऱ्या पावसाच्या भागांतच आपल्या वऱ्हाडचा समावेश होतो. साधारण अनुमान असें आहे कीं, पाऊस बराच उशिरां येईल, तरी तो पीकपाण्याला पुरेसा होईल. सध्यां इंडियाचा मध्य भाग खेरीज करून सार्वत्रिक पाऊस झाला आहे; तेव्हा विशेषशी चिंता सध्यांच न करीत बसणें बरें!

देशी उद्योग बहुतेक ऱ्हासाला पोचले आहेत. बाबू पुरणेंदु नारायणसिंग वकील बंकीपूर हे बिहार प्रांतासंबंधानें लिहितात कीं, पाटणा येथील प्राचीन काळापासून चालत आलेला कांचेचा कारखाना अगदींच बुडाला आहे. तद्वत्च गया येथील दगडी चिजा बनविण्याचा कारखाना नामशेष होण्याच्या रंगांत आहे. ही अत्यंत शोचनीय स्थिती दर्शवितांना सदर्हू बाबू गृहस्थांस जसें पराकाष्ठेचें दुःख वाटलें तशाच तऱ्हेचें वर्तमान मद्रास बाजूनेंहि ऐकण्यांत येतें. कोकोनाडा येथें नानातऱ्हेचें रंगीबेरंगी चीट तयार होत असें आणि त्या चिटाचे नमुने कलकत्याच्या प्रदर्शन गृहांत ठेविलेले आहेत. तशा प्रकारचें चीट दिल्ली येथें होणाऱ्या प्रदर्शनांत पाठविण्यासाठीं डाक्टर वॅट व कोकोनाड्याचे कलेक्टर यांनीं पुष्कळ प्रयत्न केले पण त्यांस तें चीट कोठेंच मिळालें नाहीं. हा दुःखकारक प्रकार इंडियांतील सर्व ठिकाणीं सारखाच दृष्टीस पडेल. किंबहुना असा एकहि जिल्हा सांपडणार नाहीं कीं ज्या ठिकाणीं देशी जुना धंदा इंग्रजी अंमलाखालीं कसाबसा तरी चालला आहे. सर्वच देशी धंदे बुडाले आहेत. राज्यकर्त्यांनीं आमचे देशी धंदे मुद्दाम बुडविले असें आह्मी ह्मणत नाहीं. तथापि ही गोष्ट खरी कीं. इंग्रजी आल्यामुळें जें अप्रतिबंध व्यापाराचें तत्व सर्वत्र बोकाळलें आणि विलायतच्या कारखानदारांना ज्या सवलती मिळाल्या व विलायतच्या भांडवलवाल्यांना या देशांत आपलें भांडवल व्यापारांत घालण्याला जी विशेष अनुकूलता मिळाली त्यांचा संकलित परिणाम आमच्या देशी उद्योगावर फार अनर्थ कारक घडला. इंग्रजीच्या प्रारंभीं प्रारंभीं एक विलक्षण इंग्रजी वारें आह्मां लोकांना लागलें आणि इंग्रजी वस्तूंनीं आमचे डोळे अगदीं मारून टाकले. जें सर्व कांहीं चांगलें तें विलायतचेंच आणि जें कांहीं वाईट तें सर्व आपल्याच देशचें असा ग्रह इंग्रजींत पुढें पुढें आलेल्या लोकांनीं दुसऱ्यांचा करून दिला. त्या वेळची ती अंध राजनिष्ठा आणि विलायतची ही मोहनी या दोघांनीं आमच्या इंडियाचा उद्योग धंदा ठार बुडविला.

पण अलीकडे जसजशी लक्ष्मी पाठमोरी झाली आणि इंग्रजी विद्येनें खरी स्थिती कळून येऊं लागली तसतसें या दारिद्र्याचे अंजनानें आमचे डोळे चांगले लख्ख उघडले आहेत. आणि हल्लीं एका प्रकारची आपल्या देशी गोष्टी विषयीं चळवळ सुरूं झाली आहे, हीच या काळाची आनंद कला होय. थोडे दिवसांपूर्वीं आयवैद्यका संबंधानें लिहितांना आह्मी असें ह्मटलें होतें कीं विलायतचीं औषधें आणून डाक्टरांनीं आह्मांस जिवंत ठेवावें त्यापेक्षां इंग्रजी औषधींवर जगणारीं माणसें मृत झाल्यानेंच त्यांचा देशावर मोठा उपकार होईल. या आमच्या उक्तीचा पुष्कळशा मंडळीना राग आला. पण वास्तविक पाहातां हेंच मुख्य तत्व आहे. किंबहुना आह्मी तर असें आश्वासन देऊं इच्छितों कीं देशी वैद्यक फार उत्कृष्ट आहे आणि त्यांतील औषधींही आपल्या देशांतल्यांच आहेत. आणि देशी औषधांच्या प्रयोगापासूनही हल्लीं प्रमाणेंच लोक आरोग्य संपदा भोगून चिरकाल जगतील. एक प्रकारची निष्ठा असल्या शिवाय कोणचीच राष्ट्रीय गोष्ट उभारली जात नाहीं. आर्य वैद्यकाची व देशी इतर उद्योगाची स्थिती सारखीच आहे.

देशी धंद्यांचें पुनरुज्जीवन होण्याचा संभव असेल तर तो आतां एकाच मार्गानें होण्याचा संभव आहे. आह्मांमध्यें आपलेपणा नाहीं. आपल्यामधील आपलेपणाच्या खाणाखुणा अगदीं बुजल्या प्रमाणें झाल्या आहेत या आपलेपणाला आह्मी अगदीं नवखे बनलों आहों पण आपलेपणा हीच खरी स्वोन्नतीची गुरुकिल्ली आहे. हा आपलेपणा माणसाला वीर्यवान् करतो. याच्यामुळें अभिमानाचें तेज चढतें आणि एक निराळाच जीव आपणामध्यें असा उत्पन्न होतो कीं, आमळें आपण अगदीं एक एक बनून जातो. या एक बनण्यालाच आपण राष्ट्रीयत्व ह्मणतो. खरें राष्ट्रीयत्व आपले अंगांत खेळूं लागलें किंवा आपलेपणाचें साम्राज्य आह्मांमध्यें झालें ह्मणजे फाटाफूट व दुही हीं नष्ट होतात व परकीय गोष्टी दूर दूर जाऊन पडतात. भव्य व रमणीय असा दुसऱ्याचा राजवाडाहि आपल्या स्वतांच्या गरिबी चंद्रमोळी झोंपडीपुढें तुच्छ वाटतो. आपलेपणा अंगात वास करूं लागेल तर इंग्रजी औषध नकोसें वाटेल, विलायतचा कपडा आवडेनासा होईल आणि विलायती मोलवान वस्तूहि कःपदार्थ होतील. देशी ढामणधारी जाड कपडा सुखानें व हौसेनें वापरतील, झाडांची जडीबुटी हीच औषधी बरी वाटेल व देशी वस्तूंच मोहक दिसतील. आपलीं सुखें पदार्थसंग्रहावर अवलंबून असतात हें खरें तथापि तीं पुष्कळशी काल्पनिक आहेत आणि प्रस्तुतच्या कल्पनांना आपलेपणाचा आळा घालण्यांत येईल तर देशी वस्तू शिवाय आपणांस कोणतीच वस्तू गोड वाटणार नाहीं.

वरील विचारा सारखेच विचार नुकतेच मद्रासचे सुब्रह्मण्य अय्यर यांनीं प्रदर्शित केले. तेहि वरील विषयाच्या ओघानें मनन करण्या सारखे आहेत. ते ह्मणतात कीं, सध्यांची इंडियाची स्थिती अशी आहे कीं, देशांतल्या देशांत अप्रतिबंध व्यापाराचें तत्व अगदी जाज्वल्य ठेवावें; परंतु इतर देशांशीं व्यापार संबंध पडतांच हें तत्व अगदीं घातुक असतें. इतर देशासंबंधी असलेलें अप्रतिबंध व्यापाराचें तत्व इंडियाला नको. आणि या देशांत भरभराटींत असलेल्या बाह्य राष्ट्रांतील व्यापारांस नवा नवा जकातीचा कायदा लागू केला पाहिजे.

इंडिया ह्मणजे एक निराळें जगच आहे. इंडियाचा फार अवाढव्य असा विस्तार, त्यांतील ३० कोटी लोकवस्ती, त्यांतील भिन्न भिन्न हवापाणी, नानाविध पदार्थांची उत्पत्ती, खनिज संपत्ति आणि प्राणिसंपदा हीं सर्व लक्षांत घेता असें दिसेल कीं, इंडियाच्या जगाला परराष्ट्राची एक सुद्धां वस्तू लागणार नाहीं. आणि आवश्यक व सुखाच्या वस्तू इंडियांतल्या इंडियांतच उपलब्ध होतील. जर इंडियातल्या इंडियात सर्व माल इकडचा तिकडे फिरता राहिला तर कोणत्याच पदार्थांची कोणत्याच ठिकाणीं उणीव पडणार नाहीं. आणि देशांतल्या देशांत व्यापार चालविण्यासंबंधानें इंग्रजी राज्यांत सर्व सोयी उत्कृष्ट आहेत. बंगाल्यांत जें धान्य विपुल झालें आहे तें कर्नाटकांत बिनधोक नेतां येतें, काश्मीरच्या शाली म्हैसूरच्या पेठेंत विकत मिळतात, राणीगंज येथील कोळसा मद्रास रेल्वे उपयोगांत आणतें, तसेंच विजगापट्टणच्या हस्तीदंती विलक्षण चिजा पंजाबच्या राजमहालाच्या मांडण्यांत येतात. ब्रिटिश राज्य होण्यापूर्वीं उद्योगधंद्याच्या सर्व वस्तू इंडियातच तयार होत असत. आणि इंडियाला परराष्ट्रावर बिलकूल अवलंबून राहावें लागत नसे. आणि आह्मी ह्मणतों कीं, उद्यां जरी बाह्य राष्ट्रांतून येणाऱ्या सर्व वस्तू बंद केल्या तरी हा देश उपाशी मरणार नाहीं. पण इंग्लंडांत बाहेर देशचा माल येऊं दिला नाहीं तर इंग्लंडला उपाशी मरावें लागेल हें खास. मात्र ज्या कांहीं चैनीच्या व ऐषआरामच्या वस्तु विलायतेहून येतात त्या आल्या नाहींत तर प्रारंभीं तशाच देशी वस्तू मिळविण्यास पैसे अधिक पडतील हें खरें, तथापि ह्या अधिक पैसे पडण्याचा परिणाम गरीब जनसमूहावर कांहीं होणार नाहीं. आणि कांहीं कालानें त्याच देशी वस्तू पुष्कळ स्वस्त होतील. सध्यां इंडियाची स्थिती अशी झाली आहे कीं, हा देश ह्मणजे केवळ इंग्लंडच्या सुखासाठींच अवशिष्ट आहे. इंडिया देश इंग्लंडच्या लोकांना खाण्यास धान्य पुरवितो, व त्यांचे कारखाने चालविण्याकरितां कच्चा माल पुरवितो. अशा रीतीनें हा देश इंग्लंडच्या वैभवाला मुख्य कारणीभूत असून स्वकीय लोकांच्या कल्याणाविषयीं परकी बनला आहे. साराश आह्मांमध्यें आपलेपणा आला पाहिजे आणि तो खरोखर येईल तरच आपल्या देशाची धडगत आहे.

१९०१ सालचा आरोग्य खात्याचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा रिपोर्ट अगदीं संक्षिप्त आहे. जेथें पूर्वीं वीस वीस पानें लागत होतीं त्या ठिकाणीं आतां सर्व माहिती चारच पानांत संक्षेपानें दिली आहे. जननमरणाची नोंद योग्य रीतीनें व्हावी या साठीं सरकारी तजवीज विशेष

कडकपणाची दिवसानुदिवस होत आहे. जनन मरणाचे रजिस्टरांत चूक होऊं नये अशा विषयीं गांवगांवच्या कामगार अमलदारांनीं विशेष दक्षता ठेवावी अशी सरकारची इच्छा आहे. या बाबतींत जर चुका झाल्या तर या विशेष दंडास पात्र होतील. हीं जनन मरणाचीं रजिस्टरें नीट बरोबर ठेवलीं आहेत कीं नाहीं हें पाहण्याची एक नवी पद्धती अमलांत आणण्याचा प्रांतिक सरकारचा विचार आहे. गेल्या दहा वर्षांच्या अनुभवा वरून असें दिसतें कीं, जनन मरणाची नोंद वेळचेवेळीं व बिनचूक होत असावी. १८९१ सालामध्यें लोक संख्या २८९१८९९ होती. त्या नंतर गेल्या दहा वर्षांत एकंदर जननाची संख्या १०९३१५७ झाली आणि मरणाची संख्या १२४३९६० झाली ह्मणजे गेल्या दहा वर्षांत लोकसंख्या १५०८०३ इतक्यांनीं कमी झाली. या बनावकेले एकंदर लोकसंख्या २७०२०२२ निघते. हा आकडा गेल्या लोकगणतीचे वेळीं मोजलेल्या लोकसंख्येच्या आकड्या जवळ जवळच आहे. गेल्या लोकगणतीचा आकडा २७१७३४६ इतका भरला. गेल्या दहा वर्षांच्या जनन मरणाच्या नोंदीवरून निघालेला आकडा व गेल्या सालचा आकडा या मधें अवघें अंतर १५३२४ चें आहे. हें अंतर फारसें मोठें नाहीं. शिवाय जनन मरणाचे नोंदीमध्यें बाहेरून येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या लोकांची संख्या या दोहोंचाही समावेश होत नाहीं. ह्या गोष्टी लक्ष्यांत घेतल्या ह्मणजे जनन मरणाचे तक्ते चांगले ठेवण्यांत येतात असें कबूल करणें भाग येतें.

# The Berar Samachar

MONDAY JUNE
23 1902

The proceedings of Madras Provincial Conference held at Coconada have again brought to light the week points in the economic condition of India. The conference emphatically protests against the principle of free—trade that has got a strong footing in India. Our main work now narrows itself to undo the mistakes of the past. India has again to build her fortunes upon the complete overthrow of the self—same principle of free—trade which has killed the ancient and time-honoured industries of India. We put it as a problem to our readers and ask them to attempt a solution as to how a country which was prosperous and self—dependent upon her own industries should become a country of poverty-stricken people under the benign British rule. We need not repeat how the British administration has brought on a period of peace and safety. But the real difficulty begins when we perceive the vast internal development of the country and miss very much the corresponding sequal of material prosperity. It is a puzzle to many that a country so progressive in Railway and Telegraphic communications, so rich and productive in its agricultural and mineral wealth, and so completely integral and united under one British sceptre should lose all material prosperity and should present a picture of a miserable economic condition. Internal development is a sure concomitant of material prosperity; but India seems to be an exception to this The poverty of India is an undeniable fact. No statesman can safely ignore it and it is further useless and dangerous to belittle the alarming growth to which the poverty is rapidly extending. The poverty of India is phenomenal and an attempt to trace its causes seems to gain no ground before the wilful optimism of the Government who in the height of their argument go to the length of proving the very poverty of the people to be a good and prosperous state by relying too much upon statistical figures of the abundent products of India and on the large figures of exports and imports. The condition of India presents a knotty problem. All internal conditions speak to a story of progress. There are all the forces that tend to work out a line of progress which only disappears on account of an unknown latent cause. That cause is rather lurking in the effects of the British free-trade in India. The effects of this free—trade principle are just the opposite in India of what they are in England. The growth and prosperity of the English industry runs concurrently with the downfall and extinction of the Indian Industry. The work of building up British industry, begins just where a similar industry begins to disappear in India. So the free—trade principle has produced contrary effects. Whatever England has gained in her commerce India has lost in the long and circuitous results of imports and exports. The imports of India is another term for the exports of England. Thus wealth of India is drained away to England. We maintain that the English people have entered into peculiar partnership with India. The income of this partnership is divided on the principle of free—trade. This principle involves all gain to England and the corresponding vast loss to India. The real solution of India's poverty lies in the subversion of this free—trade principle. It is this proposition which is eloquently put forth at the Madras provincial conference. It is in fact a demand of protection to Indian industries. If the legislation of the state has sanctified the principle of free—trade, we demand now a counter legislation of sanctifying the protection principle. India need not depend for her preservation upon foreign products. The Arts Exhibition that is to be held at Delhi in January next will also illustrate that India had a proud past of industrial and commercial greatness but that greatness has now disappeared before the absorbing free—trade of the British nation. The revival of India does in fact rests upon a collapse of the over-due growth of the British Industries and an Indian statesman like Lord Curzon will alone raise India to the level of the British empire by giving her a sort of protection which will arrest the increase of the British manufacture and will give a sound footing for the dying industries of India. The different conditions of England and India require different sorts of treatment. The levelling tendency of free—trade will have to be counter—acted before we see India occupy an important position in the markets of the world at large. The material for such an up-heaval is present in India. There is no country in the world which promises so well to keep at a distance the thriving industries of the West. A living internal force is the necessity of the day. It is the force of being over—zealous for our country's goods. We need not mind if we cultivate a dislike for foreign articles. Our government will not come to our help unless they admire in us a new dignifying spirit of over—valuing the goods of our own country.

---

## वऱ्हाड

हवामान— पाऊस बिलकुल नाहीं ही मोठी चिंतेची गोष्ट होय. मृग नक्षत्र अगदीं कोरडें गेलें. वाऱ्याचा प्रवाह अतिशय जोराचा असून तो नैऋत्य किंवा वायव्य दिशेकडून येतो हें एक सुलक्षण होय. सार्वजनिक आरोग्याला थंड हवा, निरभ्र चांदणें, व मनमुराद वारा हीं फार अनुकूल आहेत. बाजारभाव फार तेजीवर आहेत.

रा० रा० बळवंत यादव खेलकुटे, तहशिलदार व माजिस्ट्रेट वर्ग २ यास गुन्हेगारांना फटक्याचीहि शिक्षा देण्याचा अधिकार आला आहे.

उमरावती शहर म्युनसिपालिटीच्या अध्यक्षस्थानीं लेफ्टनेंट कर्नल आर. व्ही. ग्यारेट, डिपुटी कमिशनर यांची निवडणूक होऊन ती आलिशान रेसिडेंट साहेबानीं मंजूर केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ही गोष्ट सांगण्याचा हेतु इतकाच कीं, आकोला व उमरावती येथील म्युनसिपालिट्यांचें काम अधिकार बळा शिवाय चालत नाहीं आणि ह्मणूनच अध्यक्षाच्या निवडणुकीचे वेळीं डिपुटी कमिशनरच्या गळ्यांतच, माळ घालण्यांत येते. आमच्या मतें हा सांप्रदाय आकोला उमरावती सारख्या ठिकाणीं निदान टाकण्यांत यावा, आणि योग्य अशा बिन सरकारी सभासदालाच अध्यक्ष निवडण्यांत यावें.

उमरावतीकर मित्रसमाज मंडळींनीं परवां रात्रीं वीरतनय नाटकाचा प्रयोग करून दाखविला. या मंडळींत पांढरपेशी मंडळी असून ह्यांनीं हा उद्योग करमणुकी साठीं ह्मणून केला आहे. वीरतनय हें नाटक चांगलें असून त्याचे कर्ते आमच्या वऱ्हाडचे वकील रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे असल्यामुळें पुष्कळशी प्रेक्षक मंडळी मोठ्या भक्तिभावानें गेली होती; पण एकंदरीनें प्रयोग अगदीं साधारण झाला. बाहेर गांवीं फिरण्यापूर्वीं यांच्या पुष्कळशा व चांगल्या तालमी घरीं झाल्या पाहिजेत. टिकीट लावून नाटक करण्याला प्रवृत्त झाल्यानंतर प्रेक्षकांस हि दोष दर्शविण्याचा अधिकार अधिक पोचतो आणि मंडळींच्या साहजिक वैगुण्यावर कोणी पांघरूण घालूं इच्छित नाहीं. आह्मी उमरावतीकर मित्रमंडळींना सुचवितो कीं त्यांनीं आपले प्रयोग इतके सार्वजनिक न करितां प्रारंभीं मित्र मंडळींच्या करमणुकीच्या बेतानेंच करावेत.

वडगांवकर सर्कसवाल्यांचे खेळ चांगले प्रेक्षणीय होतात व त्यांची कसरत वगैरेचो कामेंहि प्रेक्षणीय आहेत.

रा. रा. गोपाळराव हरी सावरकर, ओव्हरसिअर, मुनसिपालिटी खामगांव यांची बदली इलिचपूर जिल्हा बोर्डाच्या ओव्हरसिअरच्या जागीं बढतीवर झाली आहे हें कळविण्यात आनंद वाटतो. या गृहस्थांनीं खामगांव मुनसिपालिटीचें काम प्लेगच्या वेळीं व दुष्काळाच्या वेळीं फार उत्कृष्ठ केलें होतें.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००। |
| सोनें | २४। |
| चांदी | ६६ |
| कापस | १४६ |
| जवारी | ६४ |
| गहूं | १००-१२० |
| चणे | ८० |
| मीठ | ३॥- रु. मण |
| बाजरी | ३४= रु. मण |
| तूप | ७॥ रु. मण |
| तेल | ६॥ रु. मण |

---

### नोटीस

रा. रा. सिताराम मारवाडी राहणार वाघोली ता० आकोला यास.--

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे शेत सर्वे नंबर २० एकर २१ गुंठे २७ याचा चवथा हिस्सा १०० रुपयास विकत घेण्याचें कबूल केले होते. त्या बद्दल तुह्मी मला ४ रुपये इसार ही दिला. रुपये देण्याचा करार इसार दिल्या पासून दोन महिन्यांनीं ह्मणजे नागदिपवाळीस १०० रुपये व्याजा सुद्धां ह्मणजे शेकडा २ रुपये प्रमाणें दोन महिन्यानीं १०४ रुपये देण्याचा करार केला होता. त्या पैकीं इसाराचे रुपये ४ व नागदिपवाळीच्या सुमारास दिलेले रुपये २८ एकूण रुपये ३२ तुह्मा पासून मला मिळाले. बाकीचे ७२ रुपये ८ दिवसानीं देतो ह्मणून ह्मटले परंतु ते न देतां उलट वायद्या नंतर १० रुपये मला व्याजानें आणून भरावे लागले. तर ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत १०४ रु. पैकीं बाकीचे राहिलेले ७२ रुपये व वायद्याचे १० रुपये एकूण रुपये ८२ याचे व्याज दोन रुपये शेकडा प्रमाणें आज पावेतो सहा महिन्याचे व्याज, कमीत कमी सुमार ९ रुपये, एकूण रुपये ९१ आणून द्यावे व तुमचा घरवर असलेला माल कडबा व जवारी मण अकरा; पैकीं कडबा तुह्मी २८ रुपये देतानाच नेला; बाकी अकरा मण जवारी घेऊन जावी असे मुदतशीर न झाल्यास तुह्मी दिलेले ३२ रुपये वापस न देतां शेतही तुह्माला मिळणार नाहीं. व या नोटीशीचा खर्च तुमचे वर पडेल. कळावें ता. २१।७।०२

सही

सिताराम वा जयसिंग कुणबी राहणार वाघोली निशाणी खुद

---

## वर्तमानसार

जपानांतील नीति शिक्षण—१ पहिली दोन वर्षे— स्वतःचें आरोग्य, विद्याभ्यासाची माहिती व हेतु, घरांतील वागणूक, रोजगार व समाजांत वर्तन, नागरिकांची जबाबदारी २ यापुढें, स्वाभिमान, धैर्य व उत्साह यांवर शिक्षण मिळावयाचें. ३ शेवटचे वर्गांत कर्तव्यकर्म हा एकच विषय ठेवला आहे व त्यांत १ आपलें, आपणाविषयीं २ कुटुंबाविषयीं ३ बांधवांविषयीं ४ राष्ट्राविषयीं ५ मानवजातीविषयीं व ६ ईश्वरनिर्मित वस्तुमात्राविषयीं कर्तव्य काय आहे तें सांगितलें जाणार आहे! असेंच शिक्षण आम्हांस पाहिजे.

उड्डाणाकरितां बक्षीस— पंखाचें साहाय्यानें उडू शकणारे मि. डयूमंट या गृहस्थांचे उड्डाण प्रयोग राज्यारोहणाचे मोसमांत विलायतेंत होणार आहेत. 'एक्स्प्रेस' पत्राचे चालकांनीं आपल्या कचेरीतून—ह्मणजे लंडन मधून —"इव्हिनिंग डिस्पॅच" पत्राचे कचेरींत—ह्मणजे बर्मिंग हॅम येथें उडून गेल्यास ४ हजार पौंड देण्याचें जाहीर केलें आहे! वर्तमानपत्रकाराचें हें बक्षीस आहे हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे!

अंतर्ज्ञानी पाखरू— सांथळ परगण्याचे जंगलांत एका जातीचें फुलपाखरूं आहे. त्याची मादी धरून दुसऱ्या गांवीं नेऊन खोलींत ठेविली असता दुसरे दिवशीं सकाळीं त्या ठिकाणीं तिचा नर आलेला दृष्टीस पडतो. तिला पेटींत घालून ठेवलें तरी तो नेमका तेथें येऊन आंत शिरण्याचा प्रयत्न करीत असतो! या वरून मार्कोनीनें आतां शोधून काढलेली बिनतारेनें बातम्या पाठविण्याची युक्ति या फुलपांखरास माहीत असावी, असें दिसतें!

फारच नाजूक—करीमगंज येथील मि. थॉमस नांवाच्या युरोपियन अधिकाऱ्याचे कान इतके नाजूक आहेत कीं, त्यांच्या कचेरीचे आसपास कोणी खोकलेलेंही त्यांस खपत नाहीं! कोर्टाचे आसपास कोणताही कसलाही अवाज अथवा शद्ध करणारास शिक्षा होईल अशी त्यांनीं इंग्रजी, बंगाली व हिंदी भाषेंत आपल्या कोर्टावर पाटी लाविली आहे! अधिकारामुळें प्रकृती नाजूक होते असा सर्वत्र अनुभव आहे खरा.

फार योग्य सूचना— इंग्लंडमध्यें उच्च जातीचे हिंदु अलिकडे बरेच गेले आहेत. तेव्हां ही संधी साधून लंडन येथें एक हिंदु भोजनगृह व एक हिंदु देऊळ बांधावें व तेथील देवाची आपल्या धर्मांप्रमाणें पूजाअर्चा करण्यास कांहीं ब्राह्मण ठेवावे; मग इकडून जे कोणी हिंदु तिकडे जाऊन या भोजनगृहांत राहून आपले धर्म व आचार पाळतील त्यांस इकडे परत आल्यावर जातींत घेण्यास हरकत नाहीं, अशा अर्थाची सूचना बंगाल्यातील एका जमिनदारानें केली आहे.

खरा योद्धा कशानें होतो?— स्वदेशाभिमान, स्वातंत्र्य प्रेम, सहनशीलता, दृढनिश्चय, धैर्य, तीव्रबुद्धि, चपलतादि गुण अंगीं असले तरच मनुष्य खरा योद्धा वीर पुरुष होतो. नुसत्या तलवारीनें, बंदुकीनें, भाल्यानें, तोफानें वा अगणित युद्धसामुग्रीनें शौर्य अंगीं बाणत नसतें. वीरश्रीच्या जीवंत पाण्याचा झरा अंगांतच संचारत असला पाहिजे.

संधीवातावर लिंबाचा उपयोग— अतिशय जुनाट संधीवात दररोज चढत्या प्रमाणावर लिंबें खाल्ल्यानें राहता असा एका फ्रेंच डाक्टरचा अनुभव आहे.

तीन तीन तोंडांचीं तीन मुलें:— गाणगापूर येथें एका मुसलमानिणीस तीन तीन तोंडांचीं तीन मुलें एकदम झालीं. या पैकीं दोन मेलीं व एक अद्याप जिवंत आहे ह्मणतात.

कोरोनेशन विहिरी— दि. रघुनाथराव यांनीं तंजावराकडील आपल्या जमिनींत राज्यारोहणाचे स्मारकार्थ ६१ नव्या विहिरी ६११ फळझाडें व ६१११ इतर झाडें नवीन लावण्याचें ठरविलें असून त्यांस Coronation wells असें नांव देण्याचे ठरविलें आहे. फार स्तुत्य होय.

ब्रह्मदेशांतील लुच्चीं पोरें— एका लांब कांठीला काटेरी झुडप बांधून आगगाडीच्या रस्त्यावर उभे राहून गाडी आली कीं रात्रीं तीं मोठ्यानें ओरडा करतात. उतारू खिडक्यांतून बाहेर पाहूं लागले कीं, त्या काटेरी झुडपास त्यांच्या डोकीचे रेशमी रुमाल अडकून खालीं पडतात !

निपाणी गवत— ह्मणजे पाऊस पाण्यावांचून वढणारें गवत आपल्याकडे येईल तर गुरांचे हाल नाहींसे होतील. ( Pustalun dilatatum ) अथवा राणी गवत नांवानें एक गवत सर फर्डिनन मिलर यांनीं दक्षिण अमेरिकेंतून आस्ट्रेलिया देशांत नेलें व त्या ठिकाणीं तें वाळूच्या मैदानांत हल्लीं सपाटून वाढतें. व त्या पासून गुराढोरांना विपुल चारा मिळतो.

वट्टा राजद्रोह— आयरिश लोकांनीं असा ठराव केला आहे कीं, आयरिश मुलांना इंग्लंडचा राजा गादीवर बसणार ह्मणून जर कोणी पदकें किंवा बक्षिसें देईल तर तीं त्यांनीं कधींही घेऊं नयेत, व त्या प्रसंगाच्या जेवणालाही त्यांनीं कोठें जाऊं नये किंवा तत्संबंधीच्या उत्सवाच्या दुसऱ्याही कोणत्या कामांत आपलें कांहीं अंग ठेवूं नये. कारण असें करणें हें आयर्लंडच्या मुलांना उचित नाहीं. व ह्या ठरावाप्रमाणें वागण्याविषयीं आईबापांनीं आणि पालकांनीं आपल्या मुलांना उत्तेजन द्यावें.

एका मुलाची विलक्षण गोष्ट— एक मुलगा शाळेंतून सुटून घरीं जात असतां रस्त्यात त्याचें पुस्तक हरवलें. तो फार गरीब असल्यामुळें व पुन्हां दुसरें पुस्तक घेण्यास त्यास ऐपत नसल्यामुळें त्यानें तें सांपडण्यासाठीं जिवापाड श्रम केले व त्यास वाईटही वाटलें. शेवटीं निरुपाय होऊन तो ज्योतिष्याकडे गेला. परंतु तोही प्रयत्न व्यर्थ झाला. शेवटीं एके दिवशीं त्यानें एका वर्तमानपत्रांत बुइल्यम्स पिंक पिल्सची जाहिरात वाचिली. व त्या आपण घेऊन पहाव्या असा मनाचा संकल्प करून त्यानें बुइल्यम्स पिंक पिल्स घेतल्या. तेव्हां लागलेच दुसरे दिवशीं त्याचें पुस्तक सांपडलें. हीच एक औषधीं स्वर्गींची दिसते आहे!

जंगी नवी तोफ— खिश्चियानिया येथल्या एका विद्वान् प्रोफेसरानें विजेनें बनविलेल्या लोहचुंबकोष धातूची एक ३२८ फूट लांबीची तोफ बनविण्याची युक्ति काढिली असून सदर्हू तोफेनें आपल्याला २ टन वजनाचा गोळा ९३२ मैलांवर नेमानें फेंकतां येईल असेंही सदर्हू प्रोफेसरांचें ह्मणणें आहे.

नवा शोध— लोखंडी तिजोरीवर 'थरमाईट' नांवाची पूड पसरून ती पेटविली ह्मणजे तिजोरी कितीही जाड असली तरी कांहीं वेळानें तिला भोंक पडते. आतां 'कार्बन पॉइंट' ची जी नवी युक्ति ज्यूलियस हश्चेक यानें काढली आहे तिनें लोखंडाच्या भक्कम जाड पत्र्यांसही तेव्हांच भोंक पाडतां येतें. 'कार्बन पॉइंट' ला विजेचा प्रवाह लावून दिला व तें टोंक लोखंडी पत्र्यास लाविलें कीं, पांच मिनिटांत एक फूट या प्रमाणें भोंक पडत जातें. हुषार चोराची चैन झाली.

रक्तपितीवर रामबाण औषध— कलकत्ता येथें बडा बाजार या ठिकाणीं पंजाबाकडील कोणी पंडित कृपाराम नांवाचे वैद्य आहेत. त्यांनीं रक्तपितीच्या रोगावर एक रामबाण औषध शोधून काढलें असून त्या औषधानें त्यांनीं बरेच असाध्य झालेले रोगी दुरुस्त केले आहेत. वैद्य मजकूर हे रोग्याचे दोन्ही अवस्थेचे फोटो काढून घेतात व तसे फोटो त्यांजपाशीं बरेच आहेत. ते रोग्यास काळजीपूर्वक औषध देतात, आणि त्यांचा स्वभाव फारसा लोभीहि नाहीं असें ह्मणतात.

१९०३ सालचें प्रदर्शन— सेंट लूई येथें पुढच्या सालीं मोठें प्रदर्शन भरावयाचें आहे. त्यांत २५० फूट व्यासाचा एक गोळा तयार करणार आहेत. हा गोळा ३५ फूट उंचीच्या अष्टपैलू चौकीवर बसविणार आहेत. ह्या गोळयावर पन्नास फूट उंचीचा एक मनोरा बांधणार आहेत. या मनोऱ्याच्या पहिल्या मजल्यावर ह्मणजे जमिनीपासून १४० फुटावर नाटकशाळा, खेळखाने वगैरे ठेवणार आहेत. त्यांत ८।१० हजार माणसांचा समावेश होईल अशी योजना करण्यांत येणार आहे. दुसऱ्या मजल्यावरही इतक्याच मनुष्यांची सोय होणार आहे. तिसऱ्या मजल्यावर निरनिराळीं वाद्यें ठेवण्यांत येणार आहेत. या कामास ६०,००,००० मार्क खर्च होणार आहेत.

बंगाल्यातील भयंकर वादळांत एक मुलगा जो उडाला तो एका झाडावर जाऊन आदळला व त्याच्या बेंबींत एक फांदी शिरून तो मेला.

नखें खाणें— मुलांस नखें खाण्याची संवयी लागते याचें कारण त्या मुलांचे ज्ञान तंतू रोगिष्ट असतात. नखें खाणाऱ्यांची संख्या गरीब मुलांत फार आढळते. ही खोड १२ पासून १४ वर्षांचे मुलांत अधिक प्रमाणांत दिसून येते.

विलक्षण देखावा—एक अमेरिकन लेडी लंडन शहरीं एक नवीन नाच करून दाखविणार आहे ह्मणतात. जवळ कारंजें उडत आहे. पाठमोरा सूर्य प्रकाशत आहे. लाल किरणें चहूंकडे पसरलीं आहेत इतक्यांत एकाएकीं मेघ येऊन पावसाचा व गारांचा वर्षाव, मेघांचा गडगडाट व विजांचा चकचकाट होईल व अशांतच एकाएकी ती स्त्री ज्वालांत बुडून जाईल व मागें लोकांस तिची राख झालेली दृष्टीस पडेल.

आख्यायिका— आपले चक्रवर्ती एडवर्ड साहेब एकदां एका शाळेंत गेले होते. तेथें मुलांना त्यांनीं प्रश्न विचारला कीं, इंग्लंडच्या राजांमध्यें सर्वांत मोठा कोण? कोणी कांहीं कोणी कांहीं उत्तरें देतां देतां एकानें 'एडवर्ड बादशाहा' असें उत्तर दिलें तेव्हां राजानें पुन्हां विचारलें कीं, त्यानें कोणचें थोर कृत्य केलें? त्यावर तो मुलगा ह्मणाला— त्यानें काय मोठें काम केलें हें माहीत नाहीं. हें ऐकून राजा ह्मणाला—त्यानें काय काय केलें आहे हें मला सुद्धां सांगतां येत नाहीं कारण मीं कांहींच केलें नाहीं. हीच गोष्ट मनांत धरून राजे साहेब कांहीं महत्कृत्य करतील तर त्यांची थोरवी सर्वत्र होईल.

---

कि० दिवाणी दावा नंबर १ क्लास २०
१९२०

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नंबर ८ सन १८९० यांतील कलम ११ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हिल जडज्य आकोले यांचे कोर्टांत.

संपत वा। गणु वस्ती सोनबर्डे ता. आकोट— अज्ञान.

अर्ज— अज्ञानाचें पालन करण्या बद्दल अगर त्याचें मालमत्तेचें संरक्षण करण्या बद्दल.

भागाई मर्द गणु व परसराम वा। हंबीरजी वस्ती सोनबर्डे तालुके आकोट— अर्जदार यानें असा अर्ज दिला आहे कीं, मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचे ह्मणजे:—

१ खेर्डी तालुके आकोट येथील सर्वे नंबर १२ आणि ३,

१ गुंडगांव येथील घर व उत्तारी खंडी ६.

१ डागनें व कपडे व सावकरी कर्ज रुपये १०० याचें संरक्षण करण्या करितां दाखला मिळावा ह्मणोन अर्ज केल्यावरून त्या अर्जाचे चौकशीची तारीख ९ माहे जुलई सन १९०२ इसवी रोजीं आकोलें ठिकाणीं नेमली आहे. तर या नोटिशीनें सर्वांस असें कळविण्यात येतें कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग, मित्र, आप्त अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं व सदरी अज्ञानाचें पालन अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितां दाखला आपणास मिळावा असें इच्छीत असतील त्यांनीं आमचे समोर सदरी तारिखेस येऊन हजर व्हावें. आणि आपणास कां नेमावें असें बद्दल जें कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्या करितां हजर करावा.

आज तारीख १६ माहे जून सन १९०२ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी नोटीस दिली आहे.

V. N. Dandekar
सिव्हिल जड्ज
आकोला.

---

☞ हें पत्र आकोला येथे कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ... „ १ ८८
किरकोळ अंकास ......................८१
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस .... .....८१

REGISTERED N. No.

Single copy .............................4 as

Advertisement
Below 10 lines......2 Rs
Per line over 10......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI    AKOLA MONDAY 30 JUNE 1902    NO 25

वर्ष ३६    आकोला सोमवार तारीख ३० माहे जून सन १९०२ इ०    अंक २५

NOTICE

Applications are hereby invited for the post of an overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 31—5—02 } V. M. Mahajani Vice-Chairman M. Committee Akola.

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांच मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.


एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## खरेदी करा !
## रास्कोपचीं थेट व खरीं पेटंट वाचेस
## नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेलेंवच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ „ हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ...........२५०

### मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............१०
१९ „ मध्यमागी सेकंद कांटा असलेलें ..............१२
१९ „ हाफ् हंटिंगचें...............१०
१९ „ हंटिंगचें ...................१०
१४ „ रिस्ट वॉच ..................१०

### इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस...........२०
१९ „ हंटिंग.....................२०
१४ „ रिस्टवॉच...................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग.......................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें .............३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ........................४५
लेडीज वॉचीस १४, १८, क्यारंटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हॉनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

## नोटीस

बेशमी- रा० रा० रामचंद्र जानकीराम साहू दुकान जळगांव तालुके जळगाव जिल्हे आकोला यांसः--

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं, माझे खातें पुष्कळ वर्षांपासून तुमच्या दुकानीं आहे. सुमारें आठ वर्षांपूर्वीं मी आपल्या सहीचा एक गहाण खतचा ५०० रुपयांचा दस्तैवज करून दिला आहे. आतां माझ्या मनांत हिशोबानें तुमची बाकी देऊन टाकून व गहाणखत सोडवून घेऊन आज मित्ती पावेतों खातें शून्य करण्याचा विचार आहे. या कामासाठीं मी स्वतां रा० रा० खेमराज मारवाडी आणि ऐदान मारमाडी यांस घेऊन दोन चार वेळ आलों होतों. पण मला फुरसत नाहीं, सावकास हिशेब करूं वगैरे उडवाउडवीच्या गोष्टी सांगून तुह्मी आह्मांस परत लावतां, यावरून तुमच्या मनांत कांहीं खोटी बुद्धि उभी राहिली असावी असा संशय येतो. ह्मणून ही जाहीर नोटीस देणें भाग पडलें. आतां ही नोटीस पोंचल्यापासून चार दिवसाचे आंत आपला योग्य हिशोब मला दाखवून, आपली खाते बाकी चुकती घेऊन पावती द्यावी व गहाणखत परत द्यावें. असें वरील मुदतींत न कराल तर मी कांहीं एक व्याज देणार नाहीं. इतकेच नाहीं तर तुमची खाते बाकी पुरी चुकती झाली व गहाणखत पोकळ राहिलें आहे असें समजून आह्मी स्वस्थ बसूं. व पुढें मागें तुह्मी फिर्याद केल्यास अगर कांहीं बाकी काढल्यास आह्मी जबाबदार नाहीं. व अशा तुमच्या करण्यामुळें जो कोर्ट खर्च व इतर नुकसानी होईल ती मात्र तुह्मांपासून भरून घेतली जाईल. कळावें. तारीख २३-६-०२ इ.

सही
माधव वलद यादव पाटील राहणार बोराळ बुद्रुक ता. व पोस्ट- जळगांव दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी (१) खेराती वल्लद महमद हाशम
(२) गनी महमद अशरफ
(३) कादर महमद हाशम
(४) हैदरखां नामदारखां.
(५) कालेखा अनवरखां.
(६) शेखलाल शेखसरदार

सर्व राहणार चांदूर ता० मलकापूर या सर्वांसः—

खालीं सही करणार याजकडून या लेखानें कळविण्यांत येतें कीं, माझा वडील मुलगा शेख अबदुला, वय अदमास १५।१६ हा शाळेला जात असतो. शाळेच्या व विद्याभ्यासाच्या संबंधानें मी विशेष सक्ती करूं लागलों ह्मणून तो कांहीं उनाड मुलांच्या संगतीनें वहकला. आणि तो चारून छपून कोठें तरी लपून राहत असतो. मला अशी बातमी लागली आहे कीं, तुह्मी पांच सहा जणांनीं कोऱ्या कागदावर या मुलाकडून टिकिटें लावून घेतलीं आहेत. हीं टिकिटें पावतीची असावी असें कळतें. टिकिटें व तीं टिकिटें लाविलेले कागद यांचा अद्याप सरकारी रीतीनेंहि तपास लागलेला नाहीं. अर्थात् ते कागद सर्व रद्द आहेत. आणि जर कोणी या कागदाच्या साह्यानें एखादा लटपटीचा व्यवहार करूं इच्छील तर तो स्वतां फसेल व सरकारचा गुन्हेगार होईल.

वरील साही जणांस या नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी माझा मुलगा माझे घरीं आणून पोंचता करावा आणि त्याचे जवळून घेतलेले कागदपत्र आणून माझ्या स्वाधीन करावे. त्याच्याशीं जर कोणी व्यवहार करील तर तो व्यवहार मला किंवा माझ्या इस्टेटीला बांधूं शकणार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मांवर पडेल व तुमच्यामुळें माझी जी इतर नुकसानी होईल ती तुह्मांकडून वसूल केली जाईल. कळावें ता. २३ माहे जून सन १९०२ इ०

सहीची निशाणी
महमद अशरफ वल्लद जान महमद साहू दुकान चांदूर ता० मलकापूर याचे हातची कल्यार.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहीर लेखानें कळविण्यात येतें कीं, माझा वडील मुलगा नामें शेख अबदुला वल्लद महमद अशरफ वय अदमासे १५।१६ हा वाइट लोकांच्या नादानें बिघडलला आहे. तो माझ्या कहेंत नसतो. व मीहि त्याला तो शुद्धीवर येऊन चांगल्या मार्गाला लागेपर्यंत घरीं येण्याची मनाई केली आहे. माझ्या इस्टेटी संबंधानें, जमीन जुमल्या संबंधानें, तसेंच देव घेवी संबंधानें कोणीहि त्याच्याशी व्यवहार करूं नये. त्यानें करून दिलेला कागद किंवा सही मला मंजूर नाहीं. जर कोणी याच्याशीं कोणचाहि व्यवहार करील तर याची जबाबदारी मजवर किंवा माझे इस्टेटीवर नाहीं. कळावें तारीख २३ माहे जून सन १९०२ इसवी.

सहीची निशाणी
महमद अशरफ वल्लद जान महमद साहू दुकान चांदूर ता. मलकापूर याचे हातची कल्यार.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ९ शके १८२४

## मनाचा विरस

गेला गुरुवारचा दिवस ह्मणजे राज्याभिषेकाच्या महोत्सवाचा दिवस होणार होता. पण ईश्वरी नेमानेम कांहीं निराळाच. एडवर्ड बादशहाची प्रकृती फारच अस्वस्थ झाली आणि यामुळें राज्याभिषेकाचा बेत लांबणीवर टाकावा लागला. मनुष्याची योजना किती दुर्बळ असते बरें! इंग्लिश राज्यांतील कोट्यावधी प्रजाच काय पण जगांतील सर्व राष्ट्रें या राज्याभिषेकाच्या महोत्सवाविषयीं आपापल्या परीनें तल्लीन होतीं. राज्याभिषेकाची गोष्ट सहा महिन्यापासून एक सारखी गाजत होती आणि त्याप्रीत्यर्थ जगांतील अत्युत्कृष्ट अशी सर्व सिद्धता विलायतेंत झाली होती. हा राज्याभिषेकाचा प्रसंग अपूर्व व अप्रतिम असा होणार होता व तो ईश्वर कृपेनें दिनावधीनें तरी सिद्धीस जाईलच. मनुष्यानें निश्चित केलेला मुहूर्त कांहीं कामाचा नाहीं. ईश्वरी इच्छेचा जो सुमुहूर्त निघेल तोच खरा सुमुहूर्त होय. राज्याभिषेकाच्या आदले दिवशींच दोन प्रहरा नंतर एकदम तार आली कीं, चक्रवर्ती एडवर्ड यांची प्रकृती फार अस्वस्थ आहे. आणि ह्मणून दुसरे दिवशींच्या राज्याभिषेकाचा मुहूर्त पुढें ढकलण्यांत येईल. ही बातमी क्षणमात्रांत सर्वत्र पसरली आणि जेथें सर्वत्र आनंदोत्सवाच्या गोष्टी दुमदुमत होत्या तेथें एकदम सर्वच विरस झाला. आनंदाच्या कल्पना एकीकडे राहून चिंता व आतुरता यांनीं मनें अगदीं व्यग्र झालीं. एका प्रकारची उदासिनता सर्वत्र पसरली आणि ज्याची त्याची दृष्टी विलायतेच्या ताराकडे लागली. घटकोघटकीं आणि प्रहरोप्रहरीं विलायतेची तार काय सांगते हें ऐकण्याकडे जो तो अगदीं सोत्कंठ आहे. एडवर्ड बादशहास आराम पडावा ह्मणून सर्वत्र घरोघर व देवालयांतून आराधना, व उपासना चालूं झाल्या; तशांत जेव्हां जेव्हां मधून बातमी कळे कीं, बादशहाच्या प्रकृतीस थोडा आराम आहे, यांना थोडीशी झोंप लागली व यांनीं दोन घास खाल्लेही, तेव्हां पासून मनाला मोठा उल्हास वाटूं लागला आहे. बादशहांना प्रथम उसण भरली हें प्रकृती बिघडण्याला विशेष कारण झालें. शेवटीं त्यांच्या जवळच्या इंग्रजी भिषक वर्गानें असें ठरविलें कीं, त्यांच्यावर शस्त्रक्रिया केल्या शिवाय ही व्यथा दूर होणार नाहीं. आणि त्या प्रमाणें शस्त्रक्रिया करण्यांतहि आली. राज्याभिषेकाच्या प्रसंगासाठीं आलेल्या निरनिराळ्या लोकांस भेटण्यास राजे साहेब आपलें दुःख विसरले होते. उसणीमुळें फार दुःख होत होतें तरी त्यांची आपली नित्याची हास्य मुद्रा कायमच होती. आपलें दुःख विसरून जाऊन आपल्यासाठीं ह्मणून मुद्दाम जमलेल्या पाहुण्यांच्या त्यांनीं भेटीहि घेतल्या. राज्याभिषेकाचा समारंभ पार पाडावा अशी सर्वांची इच्छा, पण त्यांच्या प्रकृतीची अस्वस्थता फार वाढली. शस्त्रक्रियेच्या योगानें तर ते अगदी बिछान्याला खिळले. या शस्त्रक्रियेमुळें यांचा शक्तिपात फार झाला. घडोघडीं त्यांच्या जीविता विषयींहि शंका वाटे. बादशहांचें वय साठीच्या वर असल्यामुळें ही शंका फारच दुणावली. अजूनहि चार दिवस होईंपर्यंत त्यांचे जिवावरील संकट टळलें असें ह्मणतां येत नाहीं. उत्तरोत्तर चांगला आराम पडत आहे हें दुःखांत सुख होय. आणि ईश्वर कृपेनें राज्याभिषेकाचा समारंभ लवकरच चार सहा महिन्यांत पाहण्यांत येईल.

—⟶∞∘⟵—

## अभिनंदन

राज्याभिषेकाचा संकल्प सध्यां जसा लांबणीवर पडला तसें त्या निमित्त होणारें पदवींचें दानहि लांबणीवर पडेल असें आह्मांस वाटलें होतें. पण आमच्या चक्रवर्ती बादशहांची दानत फार मोठी आहे. होतकरू पदवीवाल्यांची निराशी करावी असें त्यांना वाटलें नाहीं. सत्पुरुषांचा अनुग्रह असाच अपूर्व असतो. त्यांचें प्रत्यक्ष दर्शन होण्यापूर्वींच सर्व संपदा लाभतात तद्वत् सिंहासनावर अभिषिक्त होण्यापूर्वींच त्या मंगलकार्याचीं हीं पूर्व फळें होत. राज्याभिषेकानिमित्त दिलेल्या पदवींची यादी फार मोठी आहे. कांहींना थेट विलायतेहून पदव्या धाडण्यांत आल्या आहेत व कांहींजणांस गव्हरनर जनरल साहेबांकडून देण्यांत आल्या आहेत. या पदवीदानामध्यें आमच्या प्रांता संबंधानें आह्मी दोन गृहस्थांचें अभिनंदन करतों. पहिले गृहस्थ आमच्या प्रांताचे खुद्द अलिशान रेसिडेंट साहेब हे होत. नामदार कर्नल बार यांस के. सी. आय. ई. हा बहुमान सूचक किताबत देण्यांत आला आहे. दुसरे गृहस्थ रा. रा. खुषालराव गणपतराव देशमुख अंदुरेकर हे होत. राजश्री खुषालराव यांस 'राव साहेब' ही पदवी देण्यांत आली आहे. हे गृहस्थ फार उदार आहेत व ते या जिल्ह्यांत चांगले प्रसिद्ध आहेत. लेडी डफरीन फंडाला, व व्हिक्टोरिया फंडाला यांनीं मोठी वर्गणी दिल्याविषयीं आह्मी पूर्वीं लिहिलेंच आहे. या शिवाय यांनीं पुष्कळ सार्वजनिक कार्यांना चांगली मदत दिली आहे. आह्मी रावसाहेब खुषालराव यांचें एकट्याचेंच अभिनंदन करितों असें नाहीं तर त्यांच्या द्वारा वऱ्हाडच्या जमीदार मंडळीचेंहि अभिनंदन करितों. उत्तरोत्तर ते विशेष लोकोपकारी होवोत व त्यांस उच्चतर पदव्या लाभोत असें आह्मी इच्छितों.

—∞—

## मातीचें तेल

ह्या तेलालाच घासलेट, राकेल, चिमणीचें तेल इत्यादि नांवें आहेत. हें तेल सर्वत्र महशूर आहे. या तेलाचा उपयोग ज्या घरीं होत नाहीं असें घर सर्व हिंदुस्थानामध्यें विरळाच आढळेल. हें तेल इतके प्रचारांत आलें आहे व तें इतकें जरूरीचें होऊन बसलें आहे कीं, हें तेल वापरूं नका असें सांगण्याचीहि आह्मांस भीति वाटते. हें तेल सर्व तेलामध्यें स्वस्त मिळतें. ह्याच्या इतक्या उग्र वासाचें दुसरें तेल आमचे आढळांत नाहीं. या तेलाच्या दिव्याचा प्रकाश फार प्रखर व लखलखीत असतो. या तेलाच्या उपयोगासाठीं कांचेचे दिवेहि नाना प्रकारचे निघाले आहेत. धुराचे व विजेचे दिवे यांच्या खालोखाल याच दिव्यांचा चकचकाट आहे. हें तेल जितकें उपयुक्त आहे त्यापेक्षां तें जास्त ज्वालाग्राही असल्यामुळें मोठें धोक्याचेंहि आहे. ह्या मातीच्या तेलाचा उपयोग होऊं लागल्यापासून गेल्या पंचवीस वर्षांत जितके अपघात घडले व ज्या आगी लागल्या तितके अपघात व अग्निप्रलय मागील शतकांतहि घडले नसतील.

गेल्या वीस वर्षांच्या अनुभवावरून आह्मांला हें तेल अगदीं त्याज्य आहे असें वाटतें. या तेलाचा उपयोग करण्यासारखीं स्थळें आमच्या दृष्टीनें फार थोडीं आहेत. रस्त्यावरील कंदील राकेलच्या तेलाचे असले तर विशेष बरें. तसेंच मोठमोठ्या कारखान्यांतून जेथें दिवाबत्ती संबंधानें विशेष काळजी घेण्यांत येते तेथें याचा उपयोग केला असतां वावगें नाहीं. या तेलाचा उपयोग करतांना फार दक्षता व काळजी ठेवावी लागते व ही दक्षता आणि काळजी माणूस ठेवील तितकी थोडीच. जेथें दूरवर प्रकाश पडावयास पाहिजे तेथें या तेलाचा उपयोग विशेष सोयीचा होय. या तेलाच्या उपयोगा संबंधानें ही गोष्ट मुख्य लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, मोकळ्या हवेंत किंवा अती उंच व खुली हवा खेळत असलेल्या इमारतींतून या तेलाचा उपयोग फारसा अपाय कारक होत नाहीं. पण जन समुहा संबंधानें बोलतांना हें तेल अगदींच उपयोगांत आणूं नये असाच साधारण सिद्धांत सांगावा लागेल. हें तेल स्वस्त असल्यामुळें हेंच उपयोगांत विशेष आणिलें जातें. हा प्रत्यक्ष व तात्कालिक फायदा लोकांच्या डोळ्या समोर फार खेळतो. पण या तेलाच्या उपयोगा पासून होणारे अनर्थ व अप्रत्यक्ष वाईट परिणाम हे कोणी लक्ष्यांत घेत नाहींत ही मोठी चूक होय. ह्या तेलाचा धूर फार अनिष्ट कारक आहे. याच्या काजळानें घरें अती काळीं होतात. स्वच्छ पांढऱ्या चुन्याचा रंग देखील दोन तीन महिन्यांचे आंत निस्तेज व काळसर पडून त्याच्यावर धुरकटपणा चढतो. आणि पुष्कळ ठिकाणीं या धुरानें व काजळानें जाळीं बनतात. गोर गरीब लोक ज्या तऱ्हेनें या तेलाचा उपयोग करतात ती रीत फारच घातुक होय. जस्ताच्या किंवा पितळेच्या दिव्यांत हें तेल घालून लोक बरोबर दिवे लावतात. यांचीं बरोंहि साधारण ठेंगणीं असून अगदींच ल्हान असतात. अशा प्रत्येक घरांत जेव्हां बिन चिमणीचा दिवा जळतांना दृष्टीस पडतो, तेव्हां आगगाडीच्या इंजिनांतून निघणाऱ्या धुराची आठवण होते. इंजिनाच्या मानानें जसा धुराचा लोट असतो त्या प्रमाणेंच या दिव्यांचाही असतो. कांचेची चिमणी ज्या दिव्यांना आहे अशा दिव्यांतूनही धूर निघतो पण तो डोळ्यांस फारसा त्रासदायक होतो असें दिसून पडत नाहीं. अलीकडे असा अनुभव आला आहे कीं, राकेल तेलाचा दिवा ज्या घरांत जळत असेल त्या घरांत बाहेरची हवा फारशी येऊं दिली नाहीं तर एक प्रकारची विकृती त्या घरांतील माणसांना जडते. राकेलच्या दिव्या जवळ बसणारा मनुष्य चार पांच वर्षांच्या कालांत निस्तेज व फिका पडतो, त्याची दृष्टी मंदावते आणि एकंदरीनें त्याचें आयुष्यही कमी होतें. राकेल मध्यें असे कांहीं वाईट गुण आहेत कीं ते मनुष्याच्या शक्तीला व प्राणाला परिपोषक नसून उलट अपायकारक आहेत.

या तेलाचे मुख्य दोनच गुण दिसतात. याचा प्रकाश फार लखलखीत असतो व तो थोडक्या पैशांत मिळवतां येतो. पण हा प्रकाश फार अपाय कारक आहे असा सर्वांचा अनुभव आहे; मग अशा घातकी प्रकाशाचा काय उपयोग! या तेलाजवळ बसून मनाची वृत्तिहि विशेषशी सुप्रसन्न राहत नाहीं. खोबरें तेलाचा, वा गेणबत्तीचा, किंवा खोबरेल तेलाचा दिवा जेथें जळत असतो तेथें मन शांत व सुप्रसन्न राहतें. राकेलच्या अवगुणांविषयीं माहिती असूनही लोक त्याचाच उपयोग करतात याचें कारण या तेलाची स्वस्तता होय. आणि यामुळें श्रीमंत लोकांसहि हे भिकारी चाळे फार आवडतात. हें तेल बाह्य देशांतून येत असल्यामुळें त्याची दिखाऊ स्वस्ताई परिणामीं फार अपाय कारकच आहे. हें तेल आमचे लक्षावधी रुपये दूर देशीं घेऊन जात आहे. ही स्वस्ताईची मोहनी इतकी पडली आहे कीं, तिच्यामुळें आपल्या देशांतून जाणाऱ्या पैशांची आपणांस कधीं कल्पना सुद्धां होत नाहीं. परिणामीं ही स्वस्ताईच आह्मांस फार भोंवणार आहे. ज्या लोकांस गरिबीमुळें इतर दिवे लावतां येणार नाहींत, ते एकपक्षीं सर्व रात्रभर अंधारांत बसले तरी पुरवलें. पण यांनीं या घातकी तेलाच्या उजेडांत बसणें ह्मणजे स्वतांच्या जिवालाच काय पण राष्ट्राच्याही जिवाला अपाय करणें होय.

—∽∾∽—

ट्रान्सव्हाल प्रांत इंग्रजी साम्राज्या खालीं आला आणि तेथें ब्रिटिश राज्याच्या कॉलनी प्रमाणें राज्यकारभार चालावा असा संकेत ठरला आहे. पण इंग्लिश लोकांचें युनायटेड स्टेटसमध्यें जसें राज्य स्थापन झालें किंवा कानडा देशांत जशी इंग्रजी सुरू झाली तशीच ट्रान्सव्हालांतहि इंग्रजी सुरू होईल असा रंग दिसत नाहीं. ट्रान्सव्हालचे बोअर लोक शेतकरी आहेत आणि त्यांचा शेतीचाच धंदा अव्याहतपणें कायम चालेल. जसें व्यापारानें व कलाकौशल्यानें अमेरिकन राष्ट्र पुढें सरसावलें तद्वत् दक्षिण आफ्रिकेंत ट्रान्सव्हाल हें व्यापाराचें व कलाकौशल्याचें राष्ट्र बनेल असा संभव दिसत नाहीं. बोअर लोक जसेच्या तसेच शेतकरी राहतील. ते इंग्लिश माल वापरणार नाहींत. इंग्रजी जिनसांचा बोअर बाजारांत खप होणार नाहीं. ब्रिटिश मालाला इंडिया मध्यें जसा संपूर्णाश्रय मिळाला व मिळत आहे तसा दुसऱ्या

राष्ट्रांत क्वचितच मिळेल. इंडियातील कच्चा माल विलायतेला जाऊं लागल्यापासून विलायतच्या व्यापारधंद्यास भरभराटी आली आणि त्या बरोबरच इंडियाचा व्यापार धंदा ठार बुडत चालला, पण असा प्रकार बोअर लोक आपल्या ट्रान्सव्हालांत होऊं देणार नाहींत अशी आमची खात्री आहे. प्रथमतः इंग्रजी माल इंडियांत येऊं लागला त्या वेळची अशी गोष्ट सांगतात कीं, इंडियामध्यें विलायती मालाचा चांगला पुष्कळ खप व्हावा म्हणून त्या मालावर सरकारनें कोणत्याच प्रकारची जकात बसूं दिली नाहीं. पण इंडियांतून जो माल विलायतेला जाईल त्यावर मात्र शेंकडा ५० पासून ७५ जकात घेत असत. हेतु इतकाच कीं, इंडियाच्या मालाला विलायतेंत थाराच मिळूं नये. पण ही राजनीति बोअर राष्ट्रांत विजयी होईल असें निदान इतकें दिवसांच्या त्यांच्या मर्दुमकीवरून व शहाणपणावरून वाटत नाहीं. बोअर लोकांचे अंगीं वीरश्री आहे आणि ते स्वतां खंबीर आहेत तेव्हां त्यांचा स्वदेशाभिमान ट्रान्सव्हालची छोटीशी इंडियाच होऊं न देतां आपलेपणा कायम राखील असा तर्क आहे. या उप्पर ट्रान्सव्हालच्या नशिबीं इंडियाची स्थिती असेल तर ब्रिटिश राष्ट्राला ही रत्नांची खाणी मिळाली इतकेंच नाहीं, तर त्यांच्या व्यापाराला व कारखान्याला निराळा जोर मिळाला असें होईल. या भावी इतिहासाच्या अंधारांत उडी घालण्याचा हेतु इतकाच कीं, इंडियाच्या न्हासाचें खरें कारण समजावें व लोकांनीं आपल्या जुन्या धंद्यांचा व व्यापाराचा उर्जितकाल जवळ आणावा.

## The Berar Samachar

MONDAY JUNE 30 1902

The present Imperialism hungers and thirsts after new triumphs. It tends to subdue the spirit and aspirations of the Indian people. The triumphs of Imperialism are so many defeats of our people in the political world. The proud rights and privileges of a British subject are no longer extended to us. The new policy gives a death—blow to all elective institutions. Conservatism of a bad type has set in and has estranged the relations between the official and the popular sides. Municipal institutions conducted on elective principles are no longer favoured and patronized by the government. There seems to be an inward attempt to condemn them as a rule. These very municipal bodies have worked excellently well for about twelve years and now when greater wisdom and knowledge is thrown into the work and people of great dignity and wide experience are available as Municipal Counsellors it is publicly alleged that the work suffers. Municipal institutions are infact the stepping stones to a freer and higher national life. They are the schools where in we have to learn to build up a larger nationality out side. Imperialism of the day does not add new strength or lend new lustre to these bodies. It has lowered the dignifying character of our Municipalities. It makes men of rank and ability to shrink from taking any part in the administration of these local bodies. Municipalities are found fault with because they cannot meet the new burdens the government have thrown upon them. The government wish to throw new responsibilities to the shoulders of these Municipal bodies where as they do not move an inch to supply them with adequate funds from their increasing sources of revenue. As imperial tax is increasing from year to year from different sources of direct and indirect taxation, it is proposed that the local bodies like the Municipalities and District Boards should follow in the wake of the Government and should travel on new lines of taxation. Herein lies the pit-fall of our municipalities and whenever these local bodies fail to respond to the call for new taxation they are condemned as being badly managed. Our first victories count for nothing in the face of the present Imperialism and a day will come, sooner or later, when we shall be declared totally unfit and incapable of holding a charge of our municipalities local boards. Our disabilities though of recent origin will, however, frustrate our future hopes and aspirations; and it can be clearly seen from our Congress literature that we have fallen on bad days and it is a great battle we shall have to fight before we survive the shock of official hierarchy. The new tone of policy is most illiberal and crushing to the growth of people's institutions. Good men do not now—a—days enter upon these local bodies because they are hopeless of making any significant advance in the cause of liberty. There is no prospect of making any new progress in the field of political rights or of gaining any perceiptible share in the administration of our country. Municipal and Local Boards will henceforth cease to attract good people to work therein. We have no faith in these *sham* institutions wherein there is no living principle of representation and no real foundation for advancement of popular institutions. Retirement from service in these public bodies is the only wise thing that we can do under the present circumstances. We think that our good people will better utilize their energies in other departments of life wherein they can leave a mark of their own integrity and self-respect, and thus do a great service to their country.

---

It is moral courage that our *patriots* want in the inmost of their hearts. In this very connection Dr. Mallick has, at the Shiwaji festivals held the other day at Calcutta, observed to the following effect:—

"Speech, they say, is silven, but silence is golden! Yes, gentlemen, that is so sometimes. But on all occasions and under all conceivable circumstances to forego the utterance of our inmost mind is but the poor lot of the lick-spittle Charlatan. This gathering would have been decidedly larger had it not been for this insensate fear, the extraordinary love for self-interest which guides some of our so—called patriots. Patriots? Why they [pollute that noble word which gains lustre from a Garibalde, a Cromwell, and a Sivaji. I have been told that such is the inordinate cowardice of our people that many who have subscribed towards the expenses of these celebration have not dared to put anything more than X. Y. Z. as their siguature. Others have [expressed but lip—deep sympathy and there are others yet again so sunk in servile feelings that the mere mention of such celebrations was tantamount to an electric shock of a painful nature. (Laughter) Let us have done with cant and chicanery. Let us understand that the times are no longer saddled with the bitter insolence of prostituted power. We breathe a pure atmosphere, not so pure as we would all wish, but nevertheless signs there are of changing conditions, and it depends on us whether from this blessed year of our King—Emperor's Coronation the Indian people are to be progressively entrusted with the powers that bring out the manhood of a race in the race of national life leading to the elevation of her ancient people."

---

## वऱ्हाड

हवामान—पावसाचा रंग अद्याप ठीकसा नाहीं. वातावरणांत जी चलबिचल होत आहे ती मात्र अनुकूल दिसते. उष्मा विशेष होतो, ढग वारंवार जमतात. मधून मधून एक दोन पाण्याच्या सरीहि पडल्या. कधीं कधीं तुफान वारा सुटतो. इत्यादि गोष्टी वरून पाऊस लवकर होईल असें वाटतें. आसपासच्या कांहीं गांवीं पाऊस बरा होऊन पेरे सुरूं झाले व थेट भुसावळे पर्यंत पाऊस होत आहे अशी बातमी आली आहे सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

प्रमोदसिंधू कर्ते लिहितात कीं, वऱ्हाडांत एका रिकाम्या असलेल्या ए. अ. कमिशनरीच्या जागीं मि. प्रेअरो यांस नेमण्यांत आलें आहे.

उमरावतीच्या डेपुटी कमिशनरच्या क्लार्क ऑफ कोर्टच्या जागीं रा. रा. बाळाजी रामचंद्र देशपांडे देऊळघाटकर यांस बढतीवर नेमण्यांत आलें असून त्याच्या येथील स्मालकाज कोर्टाच्या क्लार्क आफ् कोर्टाच्या जागीं पुरुषोत्तम व्यंकटेश देशमुख यांस नेमण्यांत आलें.

वाशीमहून एक पुरोहित कळवितात कीं, तेथें एक सोमयज्ञ फार चांगला करण्यांत आला. या यज्ञानिमित्त नाशीक व काशी या क्षेत्र हूनहि कांहीं ब्राह्मण मंडळी आली होती.

रा० रा० बळवंत त्रिंबक नायब तहशिलदार पुसद यास दर्यापुरास बदलण्यांत आले असून त्यांचे पुसदचे जागीं रा० रा० लक्ष्मण श्रीनिवास यांस नेमिलें आहे.

हल्लीं येथें असलेली वडतांवकर सर्कस मंडळी आपले खेळ दररोज करित असतात. हें सर्कस फार चांगलें आहे. आणि इंग्रजी पद्धतीवर त्यांची टापटीप अधिक राहील तर त्यांचा नंबर फार वर येईल. मुलांची कसरत, वाघाशीं कुस्ती, अस्वलाचें सतार वाजाविणें, माकडांच्या चेष्टा, हत्तीची करामत इत्यादि गोष्टी फार प्रेक्षणीय आहेत. हें सर्कस पाहण्यापासून मनाला आल्हाद व करमणूक वाटेल इतकेंच नाहीं तर पुष्कळशा शिकण्या सारख्या गोष्टी कळून येतील. जनावरांचें चातुर्य व आज्ञाधारकपणा हीं ध्यानांत ठेवण्या सारखीं आहेत.

अमरावतीकर 'मित्रसमाज' मंडळीनें गेल्या बुधवारीं मृच्छकटीक नाटकाचा, व शनवारीं ताराविलास नाटकाचा प्रयोग करून दाखविला. दोन्ही प्रयोगाचवेळीं मंडळीची टापटीप विशेष दिसून आली. आणि वीरतनयाच्या प्रयोगापेक्षां हे दोन्ही खेळ अधिक चांगले वठलें असें लोक बोलतात. उत्तरोत्तर ही मंडळी सुधारणा करीत असून गाण्याचा भाग चांगला होत असतो. येत्या शनवारीं ते शारदा नाटकाचा प्रयोग करणार आहेत.

असतपूर तालुके इलिचपूर येथील जहागिरदार मे. रासत अली साहेब यांनीं शाळेतील मुलांना आंबे वाटले असें कळवितांना एक गृहस्थ सुचवितात कीं, ठिकठिकाणच्या सभ्य गृहस्थांनीं शाळेंतील मुलास उपहाराला वगैरे बोलावून त्यांना निरनिराळे खेळ खेळायास लावावें, व अशा रीतीनें त्यांस प्रोत्साहन द्यावें.

वणीहून एक बातमीदार कळवितात कीं, राज्याभिषका निमित्त तेथें एक मोठा जलसा झाला, आणि तेथील सर्वांनीं गेल्या गुरुवारचा दिवस मोठ्या आनंदांत घालविला. वणी प्रमाणेंच पुष्कळ ठिकाणीं असेच उत्सव करण्यांत आले. तारायंत्रापासून दूर असलेल्या भागांमध्यें एडवर्ड बादशहाच्या प्रकृतीच्या अवस्थपणाची बातमी न कळल्यामुळें तेथें ठरल्या प्रमाणें आनंदोत्सव करण्यांत आले. भावी राज्याभिषेकाची हीं प्रसाद चिन्हेंच होत.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १०० |
| सोनें | २४। |
| चांदी | ६६ |
| जवस | १४५ |
| जवारी | ५८-६१ |
| गहू | १२२ |
| चण | ७७॥ |
| मोठ | ३॥- रु. मण |
| बाजरी | ३। रु. मण |
| तूप | ८ रु. मण |
| तेल | ६॥।- रु. मण |

---

आकोला ता० २९।६।०२

एक प्रेक्षक आपल्या पत्रानें कळवितात कीं, काल रात्रीं "तारा–विलास" नाटकाचा प्रयोग चांगला झाला हा खेळ पाहून तर सर्व मंडळी खुष झाली असें त्यांच्या चर्येवरूनच खास दिसून आलें. कारण खेळांत कोठेंही न्यून दिसल्यास अकोलेकर मंडळी तें दाखविल्या शिवाय रहात नाहींतच.

ह्या खेळांत तारा व विलास यांनीं आपल्या गाण्यानें व उत्तम हावभावानें प्रेक्षक जन थक्क करून टाकिला. यांचे खालोखाल कुमार, कनक, फकीर, व जयपाळ यांनीं आपलीं कामें केलीं. बळसिंव्हाचें थोडेंच काम बरेंच वठलें. या पात्राचे अंगीं गाण्याचा बराच गुण असावा असें दिसतें. मालतीनें आपले वया माफक काम केलें.

तारेच्या आईचें पात्र दिसण्यांत पोक्त पाहिजे होतें. व त्या पात्राची भाषाही जितकी पाहिजे तितकी शुद्ध नव्हती. मंडळीनें पडद्याकडे, कपड्याकडे, व सिनरीकडे लवकरच लक्ष्य दिलें पाहिजे.

---

## वर्तमानसार

कृत्रिम रेशीम— सांप्रत जर्मनींत कापसाचें रेशीम तयार होऊं लागलें आहे. उत्तम कापसास कांहीं रसायन देऊन त्यापासून रेशीम तयार करीत आहेत. ह्या रेशमास त्यांनीं एलबरफील्ड ग्लाझेसाई असें नांव दिलें आहे. दुसऱ्या एका तऱ्हेनें जें कृत्रिम रेशीम तयार होतें त्यांत व ह्यांत फरक इतकाच आहे कीं ह्या रेशमास रंग दिला असतां ह्याची तकाकी बिल्कुल नाहींशी होत नाहीं. हें रेशीम हातांत घेऊन पाहिलें असतां खऱ्या रेशमाप्रमाणें तें हलकें व मृदु भासत नाहीं. या रेशमास अतोनात् मागणी येत आहे. कपडे, जर, बुट्टी वगैरे कामांत ह्या रेशमाचा फार उपयोग होतो.

जमिनींत बुजलेलें शहर.— नुकेंच दोघां फ्रेंच प्रवाशांनीं सयामच्या दक्षिणेस कंबोजिया नांवाच्या द्वीपकल्पांत अंगकोर नांवाचें एक प्राचीन हिंदुराजधानीचें शहर शोधून काढलें आहे. या शहरा भोंवतालचा प्रदेश दाट जंगलानें झांकून गेला आहे. आणि तें शहरही घरांच्या तीन चतुर्थांश उंचीपर्यंत मातींत बुडून गेलें आहे. या शहरांत मोठमोठें वाडे देवळें व रस्ते आहेत. देवळें जगांतील मोठमोठ्या देवळांशीं तुलना करण्या सारखीं मोठीं व सुंदर आहेत. हीं देवळें तेथल्या प्राचीन वैभवाची साक्ष पटवीत आहेत. तेथील नक्षी व खोदकाम अप्रतीम आहे. वेशीचे दरवाजे पितळेचे असून त्यांतून अंबारीसह हत्ती जातील येतील येवढे ते मोठे आहेत. तेथें क्मेर नावाचे राजे राज्य करीत होते असें दिसतें. या शहरांत बौध्यधर्माविषयीं कोठेंही कांहीं उल्लेख सांपडत नाहीं, यावरून ह्या कालाच्या पूर्वीचें तें शहर असलें पाहिजे असा ह्या फ्रेंच प्रवाशांचा तर्क आहे.

पिण्याच्या दारूच्या गोळया:—पिण्याच्या दारूच्या गोळ्या अमेरिकेंत निघाल्या आहेत. दारू पिणारास आतां बाटली व ग्लास याची जरूर उरली नाहीं. सोय चांगली झाली!

विचित्र मूल— ब्रह्मदेशांत ओकपो नांवाच्या गांवीं एका बाईला मूल झालें. त्याच्या डोक्यावर गाईचें डोकें आहे. आई, बाप त्या मुलाला गांवोगांवीं हिंडवून पैसे मिळवीत आहेत.

घोडा सोडणार:—कौरव पांडवांचें युद्ध झाल्यावर पांडवांनीं अश्वमेध करून घोडा सोडला होता त्या प्रमाणें बादशहा सातवे एडवर्ड साहेब राज्यारोहणाच्या वेळीं एक घोडा सोडणार आहेत. ज्याच्या अंगांत धमक असेल त्यानें धरावा असें फर्माविण्यांत येणार समजतें. रण कंदन न माजो ह्मणजे झालें.

हिंदुस्थानांतील नेटिव वर्तमानपत्रें सरकारावर टीका करून व मुद्दाम सरकारच्या हेतुचा गैरसमज उत्पन्न करून लोकांस राजद्रोही बनवितात; यासाठीं सरकारानें दरमहा २–२॥ हजार रुपये पगारावर ठिकठिकाणीं एडिटर नेमून सरकारच्या वतीचीं देशी दैनिक पत्रें काढावीं, अशी मि० थॉबर्न यांनीं सूचना केली आहे! स्वजातिदुरतिक्रमा!

वेस्ट इंडीज बेटांत ज्वालामुखीचा क्षोभ होण्याचें प्रो. फाल्ब नांवाच्या शास्त्रज्ञानें आधींच भविष्य केलें होतें असें ह्मणतात. ज्वालामुखीच्या आसपासच्या रानांतील पक्षी, जनावरें व सापसुद्धां वरील प्रळयाचे आधीं बरेच दिवस दुसरीकडे निघून गेले होते. व शहरांतील जनावरें व कुत्रां सारखीं ओरडून लांब पळून जाण्याचा प्रयत्न करीत होतीं, असें ह्मणतात! पुढें येणारें संकट या जनावरांस कोणत्या तरी रीतीनें समजलें होतें काय?

लार्ड किचनेर यांस ट्रान्सवालच्या लढाई प्रीत्यर्थ पारितोषिक द्यावयाच्या ठरावा विरुद्ध आयरिश सभासद मि. रेडमंड ह्मणाले कीं 'बायका मुला बरोबर लढणारा' असा लार्ड किचनेर यांच्या नावापुढें शेरा इतिहासांत मारला जाईल. नुसत्या तोंडानें वल्गना करणें सोपें आहे. लढाई ह्मणजे काय व ती कशाशीं खातात हें ह्या वीरास पण माहीत. तें इतरांचें काम नव्हे!

खुद लढाईचे वेळीं आयर्लंडानें बोअर लोकांस मदत केली नाहीं तथापि आतां पार्लमेंटांतून आयरिश सभासद सर्व कांहीं त्यांस मदत करतील असा पुष्कळांचा समज झाला आहे. ऐरिश लोक हे इंग्रज राष्ट्राचे बरभेदेच आहेत यांत संशय नाहीं.

अनुकरणीय उदाहरण — जपानांतील टॉकियोच्या कालेजांत शिकण्यासाठीं आठ कुलीन गृहस्थांस नेपाळ सरकारनें आपल्या खर्चानें पाठविलें आहे. ते तेथून कांहीं तरी कसब शिकून येतील. हेंच वळण दुसऱ्या राजेरजवाड्यांनीं घ्यावें व आपला देश भाग्यास चढवावा.

फार योग्य हुकूम— कोणत्याही वर्तमानपत्राच्या द्वारें आपल्या बडोदें संस्थानच्या राज्यकारभारावर होणाऱ्या टीकेचा योग्य विचार होऊन रयतेच्या तक्रारी दूर करण्याचा शक्य तितका प्रयत्न अवश्य करावा. असा एक हुकूम श्री० सयाजीराव महाराजांनीं नुकताच केलेला आहे असें ह्मणतात. हें जर खरें असेल तर प्रजाहितैकदक्षतेबद्दल सदर्हू महाराजांची स्तुति जितकी करावी तितकी थोडीच होणार आहे.

स्थान महात्म वाढलें— दिल्लीस होणाऱ्या राज्यारोहण समारंभाचे वेळीं तेथें राहण्या करितां हैदराबादचे निझाम साहेब यांणीं ७५००० रुपये भाडें देऊन एक हॉटेल घेतलें आहे. कोचीनच्या राजे साहेबांनीं २५००० रुपये खर्च करून धावयाचें एक घर बांधण्याची व्यवस्था केली आहे. त्रावणकोरच्या राजे साहेबांनीं तीन दिवसां करितां एका घराचें भाडें ५०००० रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

## राजद्रोष्टे ऐरिश लोक

त्यांचे अप्रासंगिक उद्गार:– "ज्या लोकांना त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या जमिनीमधून हुसकून लावण्यांत आलेलें आहे अशा लोकांनीं इंग्लंडचा राजा गादीवर बसत आहे ह्मणून आनंदाच्या गर्जना करण्याच्या तयारीला आतां मोठ्या जलदीनें लागावें. कारण ही त्यांनीं आनंद मानण्याचीच वेळ आलेली आहे. जे कोणी लोक दारिद्र्यानें उपाशी मरत आहेत त्यांनीं इंग्लंडचा राजा गादीवर बसत आहे ह्मणून झालेल्या आनंदाचें प्रदर्शन करण्याकरितां उडवावयाचें दारूकाम तयार करून ठेवावें. राज्यारोहणाची शपथ घेण्याचे वेळीं मूर्तिपूजक ह्मणून ज्यांची अवहेलना करण्यांत येईल त्यांनीं खरोखर राजांबद्दलच्या प्रार्थनेची गीतें जरूर गायिली पाहिजेत. ज्यांच्या अंतःकरणांमधून कृतज्ञताबुद्धि अगदींच नाहींशी झालेली नाहीं अशा आपण सर्वांनीं ह्या राज्यारोहणाच्या दिवशीं दारिद्य, उपासमार जुलुम इत्यादि जे अनेक फायदे आपल्याला झाले आहेत त्यांचें अवश्य स्मरण केलें पाहिजे. आणि ह्या फायद्यांबद्दल उतराई होण्यासाठीं आपण आयर्लंडच्या प्रत्येक डोंगरावर मोठा जाळ पेटविला पाहिजे. आणि अशा रीतीनें आपण आपली राजनिष्ठा सर्व जगाला जरूर व्यक्त करून दाखविली पाहिजे." ह्या व्याजोक्तीवरून आयरिश लोकांच्या मताचा कल कसा आहे हें स्पष्ट दिसून येत आहे.

"आयर्लंडमध्यें असे लोक आहेत कीं, ज्यांना इंग्लंडनें आपला अत्यंत सुपीक देश धुळीस नेऊन मिळविला असूनही फिरून त्याच इंग्लंडला राजनिष्ठा दाखवावी असें वाटत आहे. आयर्लंडमध्यें असले बैलासारखे रेकणारे आणि गुलामांच्या मानाला योग्य असे लोक सदा सर्वदा असतातच. एखाद्या राष्ट्राला राजकीय पारतंत्र्य प्राप्त झालें ह्मणजे त्यामध्यें असले लोक निर्माण व्हावयाचेच. अशा लोकांना राजे क्षणभर आपल्या कामापुरतें हातीं धरितात आणि त्यांच्या कडून आपल्या देशाशीं आणि आपल्या देशबंधूशीं विश्वासघाताचें जें काम करून घ्यावयाचें असतें तें झाल्यावर असले लोक त्याच राजांकडून फिरून कसपटासमान मानले जातात. असल्या लोकांनीं इंग्लंडमधील आपल्या धन्यापुढें जाऊन नाकें घासलीं तर त्यांत कांहीं मोठीशी क्षिति नाहीं. असल्या लोकांच्या शिवायही आमच्या राष्ट्राच्या प्रगतीचा मार्ग खुला राहूं शकेल."

काळ.

## पाऊस पाणी

पावसा संबंधानें सरकारी भविष्य झालें आहे त्या प्रमाणें पाहतां पाऊस अगदींच काटेकोर व मोजका होईल व तोहि सर्वत्र होईलच असा भरंवसा नाहीं. पावसा संबंधानें चोहोंकडील बातम्या ऐकून मनास फार चिंताच उत्पन्न होते. सर्वत्र पावसाचा चातका सारखा लोक धावा करीत आहेत. गेल्या दोन दुष्काळांनीं सर्वांचीं अंतःकरणें पोळलीं आहेत. आणि जर कां खरोखरीच पावसानें विलंब केला तर लोकांचे डोळे निराशेनें व भावी ओढवणाऱ्या दुःखांच्या कल्पनांनीं फाटून जातील यात शंका नाहीं. सरकारास आपली सर्वस्वी काळजी आहे व कांहीं केल्या ते आपणांस अंतर देणार नाहींत असा सर्वांचा भरंवसा आहे. अद्यापच मोठीशी चिंता करण्याचें प्रयोजन नाहीं. तरी चित्तवृत्ती साशंक व अस्वस्थ होणें सहाजिक आहे.

## नोटीस

बेशमी शेख अब्दुल वल्लद शेखचांद लोंढारी राहणार पळसोद, ता. आकोट, पोस्ट दहिहंडा यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, आपण तारीख १ माहे फेब्रुवारी सन १९०२ ईसवी रोजी 'वऱ्हाड समाचार' पत्रातून मला नोटीस दिली ती पावली. त्या नोटिशी अन्वयें मी रा. रा. शंकरलाल नरसिंगदास मारवाडी साहू दुकान आकोट यांजकडेस तुह्मी अनामत ठविलेले रु. १५०० मागण्यास गेलों होतों, तेव्हां त्यांनीं गहाणखत परत मागितलें. पण तें गहाणखत मला परत देतां येत नाहीं कारण तुमच्या कडून फसली सन १३१० व १३११ या दोन सालाबद्दल व्याज देणें आहे. त्याची तडजोड आपण कशी काय करितां हें कळल्या खेरीज दस्तैवज परत देतां येत नाहीं. अर्थात् दस्तैवज न दिल्यामुळें मला तुह्मी अनामत ठवलेली रकम मिळाली नाहीं. मी रकम घेऊन पावती देण्यास तयार आहे. पण माझ्या दोन वर्षांच्या व्याजाचे रकमे बद्दल योग्य तजवीज केल्या खेरीज मी गहाणखत परत देऊं इच्छित नाहीं. सर्व रुपये मला मिळेपर्यंत व्याज बंद होणार नाहीं, व याची सर्व जबाबदारी तुमच्यावरच आहे. नोटिशीचें उत्तर चार दिवसांत द्यावें, न आल्यास आह्मी योग्य ती तजवीज करूं आणि सर्व खर्च तुह्मावर पडेल. कळावें ता. २६ माहे जून सन १९०२ सही

केशव कृष्ण कुळकर्णी राहणार पळसोद दस्तुर खुद.

## नोटीस

बेशमी— हनोती वल्लद सूर्यभान पाटील राहणार चांदखेड, ता० दर्यापूर, पोस्ट दहिहंडा. यांस:–

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, तुमची मुलगी ह्मणजे माझी लग्नाची बायको नामें पन्यान हिला तुह्मी माहेरी ह्मणून घेऊन गेला. त्या गोष्टीस आज दोन तीन वर्षे होत आलीं. मध्यतरी ४–५ वेळां आह्मी तिला घेऊन जाण्या साठीं आलों होतों पण तुह्मी तिला धाडीत नाहीं. इतके दिवस मी तुमची गय केली पण तुमची नियत मला बरोबर दिसत नाहीं. तुमच्या मनांतून तिचा दुसरा गंधर्व लावून पैसे मिळविण्याचा दिसतो. असो. यापुढें मी माझी बायको तुमचे घरीं एक क्षणहि ठेवूं इच्छित नाहीं. सबब या जाहीर नोटिशीनें कळवितो कीं, नोटीस पोचल्यापासून चार दिवसांचे आंत तिला माझ्या घरीं आणून घालावें. तुह्मी तिला नेले ते वेळीं तिच्या अंगावर अदमासें २०० रुपयाची चीजवस्त होती तीहि तिजबरोबर आणावी. असें वरील मुदतींत करण्यास चुकाल तर सरकारांत फिर्याद करून मी माझी बायको ताब्यांत घेईन. व या कामासाठीं जो खर्च व जी नुकसानी होईल ती सर्व तुमच्याकडून भरून घेतली जाईल. कळावें. तारीख २५ जून सन १९०२ इसवी.

सही

शिवराम वल्लद बापूजी पाटील आखरे राहणार शिरसोली ता. आकोट, पोस्ट अडगांव— दस्तुर खुद्द.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.